सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २५ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २९५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्रात काहीतरी अघटित घडवण्याचे कारस्थान

## मुख्यमंत्री शिंदे यांचा विरोधकांवर गंभीर आरोप

● एकनाथ शिंदे यांनी यवतमाळ येथे साधला संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**यवतमाळ, २४ ऑगस्ट-**

विरोधक वेडे झालेत, पागल झालेत. आपल्या या योजनेमध्ये एवढ्या गतीने कोणी पैसे दिले होते का? विरोधक वारंवार बांगलादेशचे उदाहरण देत आहेत. हा महाराष्ट्र आहे. बांगलादेशसारखी आरजकता माजवायची आहे का? काय तुमचे म्हणणे आहे. या बंदच्या मागून काहीतरी अघटीत या महाराष्ट्रात घडवण्याचे कारस्थान सुरू आहे, असाही गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केला.

बदलापूर प्रकरणी राज्यभर संतापाचे वातावरण असून महाविकास आघाडीकडून शनिवार, २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला होता. परंतु, मुंबई उच्च न्यायालयाने या संपाला विरोध केल्याने महाविकास आघाडीने हा संप मागे घेऊन निषेध नोंदवला. यावरून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीवर टीका केली आहे. ते आज यवतमाळ येथे आयोजित केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' प्रचार व प्रसार कार्यक्रमात बोलत होते. विरोधक म्हणाले लाडक्या बहिणी आणल्या, लाडक्या भावांचे काय? आपण लाडके भाऊही आणले. सुशिक्षित बेरोजगारांना काम देण्याचे काम केले. आता तीन सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटी हा संसाराचा गाढा कसा चालवायचा, कुटुंब कसे चालवायचे याची चिंता भगिनींना आहे. महिना कसा घालावयाचा. मी गरिबी पाहिली आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

विरोधकांविरोधात टिका करताना ते म्हणाले, आज तोंडाला पट्टे बांधून बसले आहेत. लोकशाहीत आंदोलनाला मनाई नाही. पण आंदोलनाच्या नावाखाली समाजाला वेठीस धरता येणार नाही. आम्ही सांगितलं की न्यायालयाने जो निर्णय दिलाय त्याचं पालन सरकार करेल. पण कोर्टाने त्यांच्या विरोधात निकाल दिल्याने त्यांनी कोर्टावर आरोप केले, ताशेरे मारले. तुम्ही कोर्टाला बदनाम करता. सुप्रीम कोर्टाला बदनमा करता. तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे निर्णय झाला की व्यवस्था चांगली. निर्णय विरोधात गेला की व्यवस्था वाईट. असे कधी लोकशाहीत कधी पाहिले का? तुम्ही तोंड उघडले असते तर तोंडाला काळी पट्टी बांधण्याची वेळ आली नसती, अशी टीकाही त्यांनी केली.

### दुर्दैवी घटनेचे राजकारण करणे त्यापेक्षाही दुर्दैवी

तुम्हाला या योजना बघवत नाहीत. बदलापूरला झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. वेदना देणारी आहे. अशा नराधमांना मृत्यूदंड दिला पाहिजे, अशाप्रकारची भावना सरकारची आहे. पण तुम्ही राजकारण करत आहात. दुर्दैवी घटनेचं राजकारण करणं यापेक्षा दुर्दैवी आहे. कुठे फेडणार हे पाप.. असं कधी आंदोलन असतं? आठ-दहा तास आंदोलन असतं का? रेल्वे रोखून ठेवणं. नवनवीन टीम येत होती. पोलिसांकडून माहिती मिळत होती. नवीन टीम बोलावून आंदोलन सुरू ठेवलं जात होतं. गिरीश महाजन गेले. आंदोलक अटक करा म्हणाले, अटक केली. कलम लावा म्हणाले, कलम लावले. एसआयटी लावली. संस्थेवर कारवाई केली. सरकारी वकील नेमले. फास्ट ट्रॅकवर केस घेतली. फाशीची शिक्षा मागितली, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# शरद पवारांनीच जाती-जातीत विष कालवले : राज ठाकरे

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, २४ ऑगस्ट-**

राष्ट्रवादीच्या जन्मापासूनच राज्यात फोडाफोडी, जातीयवादाचे राजकारण सुरू झाले. त्यांनीच जातीपातींत विष कालवण्याचे काम केले, असा आरोप मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. ते नागपूरमधील पत्रकार परिषदेत बोलत होते.

राज ठाकरे यांनी शनिवारी येथील रवीभवन येथे मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विद्यमान सरकार व महाविकास आघाडीवर विशेषतः शरद पवारांवर टीका केली. राज ठाकरे म्हणाले की, राज्यात फोडाफोडीचे राजकारण शरद पवारांनी सुरू केले. पुलोदच्या स्थापनेपासून हा प्रकार सुरू झाला. त्यांनी गणेश नाईक, नारायण राणे, छगन भुजबळ असे अनेक नेते फोडले. त्यानंतर जातीचे विषही त्यांनीच कालवले. १९९९ मध्ये राष्ट्रवादीचा जन्म झाला. त्यावेळचा महाराष्ट्र पाहिला तर राष्ट्रवादीच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात केव्हाच महापुरुष व संतांची जाती-पातींत विभागणी झाली नव्हती. पण १९९९ नंतर असे घडण्यास सुरुवात झाली.




# एकनाथ शिंदे म्हणजे कंसमामा : उद्धव ठाकरे

● एकीकडे बहिणींवर अत्याचार अन् दुसरीकडे हे कंसमामा राख्या बांधत फिरत आहेत



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, २४ ऑगस्ट-**

बदलापूर लैंगिक शोषणाच्या मुद्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी महायुती सरकारवर विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेची झोड उठवली. एकीकडे राज्यात बहिणींवर अत्याचार होत आहेत आणि हे कंसमामा राज्यभर फिरून राख्या बांधून घेत आहेत. आपल्याला ही विकृती महाराष्ट्रातून हद्दपार करायची आहे, असे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दुपारी दादर येथील शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाबाहेरील चौकात भर पावसात बदलापूरच्या लैंगिक शोषणाच्या घटनेविरोधात तोंडाला काळी पट्टी बांधून आंदोलन केले.

यावेळी त्यांच्यासोबत आदित्य ठाकरे व खासदार संजय राऊत यांच्यासह शेकडो शिवसैनिक उभे होते. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, अजूनही महाराष्ट्रात जिवंत मनं आहेत, हे तुम्ही दाखवून दिले. राज्यात सध्या घटनाबाह्य सरकार राज्य करत असून, त्याची मला किव येते. हे सरकार नराधमांवर पांघरून घालून त्यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहे. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, एका बाजूला बहिणीवरती अत्याचार होतोय आणि एका बाजूला कंसमामा राख्या बांधत फिरत आहेत. आजचे आंदोलन विकृती विरुद्ध संस्कृतीचे आहे.

यामुळे आता मी महामहीम राष्ट्रपतींना विनंती करतो, धूळ खात पडलेला 'शक्ती कायदा' अंमलात आणा अशी मागणी त्यांनी केली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, बदलापूर प्रकरणी सरकारने खणखणीत बाजू घ्यायला पाहिजे होती. पण जेव्हा दारे बंद होतात तेव्हा जनतेला रस्त्यावर उतरण्याखेरीज पर्याय नसतो. सरकार निर्लज्जपणे वागत आहे. ह्या सरकारला घालवावच लागेल. आपल्या बहिणीची सुरक्षा करावीच लागेल. सरकारमध्ये हिंमत नाही. गुन्हेगारांना ते पाठीशी घालत आहेत.निर्ढावलेलं सरकार आपल्यावर राज्य करत आहे.

### तेव्हा बंदला विरोध नाही

उद्धव ठाकरे म्हणाले की, मी काल कोर्टाला धन्यवाद दिला. आपली केस सर्वोच्च न्यायालयात अडीच वर्ष सुरू आहे. न्याय मिळेल याचा विश्वास आहे. पण कोर्ट त्वरेने हलू शकतं हे काल कोर्टाने दाखवलं याचं अभिनंदन करतो. कोर्टाने ठरवलं तर निर्णय घेऊ शकतं. बंदला बंदी केली असली तरी राज्यातील प्रत्येक हृदयात तुमच्या विरोधात मशाल धगधगत आहे. महिलांना सुरक्षा पाहिजे म्हणून बंद केला. त्यात अडथळा आणला. गेल्या आठवड्यात भारत बंद झाला. इतर राज्यात रेल्वेही बंद झाल्या होत्या. तेव्हा याचिका कर्ते कुठे गेले होते. तेव्हा बंदला विरोध केला नाही.

# पुणे, सातारा, रायगडसह 'या' जिल्ह्यांना रेड अलर्ट

**पुणे, २४ ऑगस्ट-**

किनारपट्टीसह घाटमाथ्यावर पावसाचा जोर राहण्याचा अंदाज आहे. पुणे, सातारा, रायगड जिल्ह्यांच्या घाट परिसरात अतिजोरदार पावसाचा अंदाज आहे. किनारपट्टीवर पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असून तीन जिल्ह्यांना हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे.

दक्षिण गुजरातपासून केरळपर्यंत हवेच्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे अरबी समुद्रातून किनारपट्टीवर वेगाने बाष्पयुक्त वारे येत आहेत. यामुळे जोरदार पाऊस पडत आहे.

### रविवारसाठी पावसाचा इशारा

**रेड अलर्ट-** रायगड, पुणे, सातारा. **ऑरेंज अलर्ट-** रत्नागिरी, मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, जळगाव. **यलो अलर्ट-** सिंधुदुर्ग, कोल्हापूर, नंदूरबार, धुळे, नगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, विदर्भ.

## ▶▶ महत्त्वाचे...

### सिमकार्ड काढण्याची पीन फुफ्फुसात अडकली

**दापोली :** मोबाईलचं सिम कार्ड काढण्याच्या नादात तोंडात ठेवलेली पिन श्वसन नलिकेतून फुफ्फुसाच्या एका कोपऱ्यात अडकलेल्या महिलेवर डेरवण येथील वालावलकर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून ती पिन बाहेर काढली. रत्नागिरी येथील एका २३ वर्षीय महिलेने मोबाईलचं सिम बदलताना सिम कार्ड बदलण्याची पिन तोंडात ठेवली होती. चुकून ती पिन गिळल्यामुळे, त्या महिलेला श्वास घेण्यास किंवा गिळताना काही त्रास होत नसल्याने, ती डॉक्टरांकडे न जाता रात्री घरीच राहिली. ही घटना २० ऑगस्ट रोजी घडली.

### जनावराला वाचवण्यासाठी धावले सिंधुदुर्ग प्रशासन

**सिंधुदुर्ग :** पावसामुळे जिल्ह्यात कोणतीही हानी होऊ नये यासाठी यंत्रणा कायम सतर्क आहे. अशातच सकाळी पोलीस पाटलांनी कुडाळ रेल्वे स्टेशन शेजारील सिद्धिविनायक हॉल परिसरात काही जनावरे पाण्यात अडकल्याचे कुडाळ उपविभागीय अधिकारी ऐश्वर्या काळुसे यांना दूरध्वनीद्वारे माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत उपविभागीय अधिकारी ऐश्वर्या काळुसे, तहसीलदार विरसिंग वसावे, पोलीस निरीक्षक राजेंद्र मगदूम, नायब तहसीलदार प्रतीक आढाव, एनडीआरएफचे पथक प्रमुख प्रमोद राय सतर्क झाले. पाण्यात अडकलेल्या एक म्हैस आणि एक रेड्याला बाहेर काढले.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### विरोधकांच्या दुटप्पी भूमिकेच्या निषेधार्थ भाजपातर्फे राज्यभरात प्रतिआंदोलन

**मुंबई, दि. २४ ऑगस्ट-**
बदलापूर घटनेतील पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच महिला अत्याचार प्रकरणात महाविकास आघाडीच्या नेत्यांची दुटप्पी भूमिका उघड करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्यभरात ठिकठिकाणी शनिवारी धरणे आंदोलन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ,आ. प्रवीण दरेकर, आ. प्रसाद लाड आदी नेत्यांनी यात सहभाग घेतला. बदलापुरात घडलेल्या दुर्दैवी घटनेतील पीडिताबाबत यावेळी संवेदना व्यक्त करण्यात आल्या. मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या नेतृत्वाखाली भर पावसात मुंबईतील मादाम कामा रोड येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ मविआ नेत्यांचा निषेध करणारे फलक हाती घेऊन आंदोलन करण्यात आले. यावेळी ठाकरे सरकारच्या कार्यकाळात राज्यात विविध ठिकाणी घडलेल्या महिला अत्याचाराच्या घटनांबद्दल देखील बोला, अशा आशयांचे फलक घेऊन उद्धव ठाकरे, शरद पवार, सुप्रिया सुळे, नाना पटोले, विजय वडेटटीवार, अंबादास दानवे, जयंत पाटील यांना लक्ष्य करण्यात आले. या आंदोलनात जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, मंजुषा कुद्रुमुती, मंजुषा जोशी, निलेश देवगीरकर आदी सहभागी झाले होते. प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील सायन सर्कल येथे झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळ्याजवळ धरणे आंदोलन करण्यात आले.



### शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी क्रांतीवीर किसान सेनेचे निवेदन

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**
शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी क्रांतीवीर किसान सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. गेल्या सहा महिन्यापासून शेतकऱ्यांचे ऊस बिल हे साखर कारखादारांनी देण्यास टाळाटाळ करून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात ढकलण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादन खर्च वाढल्याने शेती परवडत नसल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. त्याचबरोबर खतांच भाव व भेसळयुक्त खते व ओषधे यामुळे शेतीमालेचे आतोनात नुकसान झाले आहे. तसेच संघटनेच्यावतीने अनेकदा शेतीमालाच्या हमीभावासाठी स्वामीनाथन आयोगाची मागणी करून सुद्धा शासन कुठल्याही प्रकारचे शेतीमालाला दिलेले नाहीत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिंगडगाव, आचेगाव, होटगी या गावांना जोडणारा प्रमूख रस्ता अत्यंत खराब झाला असून तो त्वरीत करावा. त्याचबरोबर ऊस बिल व्याजासह मिळावे तसेच बिल बूडविणाऱ्या साखर कारखान्याचा परवाना रद्द करावा व त्यांना काळ्या यादीत घालावे. यांसह विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले. मागण्यांवर आठ दिवसाच्या आत कार्यवाही न झाल्यास संघटनेच्यावतीने रास्तारोको आंदोलन करणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक करणराजे गडदे, राहूल सावंत शेखर बंगाळे, निखिल घोडके, चंद्रशेखर पाटील, बनसिध्द सलगर, संदीप कांबळे, गोवर पवार उपस्थित होते.

### प्रा. सच्चिदानंद लाळसंगी यांचे सेट परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**



सावित्रीबाई फूले पुणे विद्यापीठ यांच्याकडून घेण्यात आलेल्या आणि महाविद्यालयीन सहाय्यक प्राध्यपक पदासाठी आवश्यक असलेल्या महाराष्ट राज्य पात्रता परीक्षेमध्ये (सेट) विंचूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील प्रा. सच्चिदानंद आप्पासाहेब लाळसंगी हे इतिहास विषयातील सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यापूर्वी त्यांनी शिक्षणशास्त्र आणि इंग्रजी अशा एकूण चार विषयातील सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. सेट परीक्षेतील या यशामुळे विविध सामाजिक स्तरावरून त्यांचे कोतुक होत आहे.

### महालक्ष्मी देवालय गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी श्रीकांत मंगळारम

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**



स्वामी समर्थ पाटिल नगर येथील श्री महालक्ष्मी म्हसोबा देवालय गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी श्रीकांत मंगळारम व सचिवपदी विपूल गोडा यांची एकमताने निवड करण्यात आली. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुत्तीकोंडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बेठकीत निवड करण्यात आली. उपाध्यक्ष रमेश श्रीमल, खजिनदार महेश दासरी, मिरवणूक प्रमूख नरेश कनकी यांची निवड करण्यात आली. सभेसाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### होलार समाजातील गुणवंतांचा आज सत्कार

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**
अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या वतीने समाजातील दहावी, बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थांचा सत्कार दि. २५ ऑगस्ट रोजी समाजकल्यान केंद्र, रंगभवन येथे आयोजित केला आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास सर्व समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घोषणाबाजी, भाषण, आरोप अन् संतापाने परिसर दणाणला

## बदलापूर घटनेचा सोलापुरात निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**
ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे एका शाळेमध्ये दोन चिमुकल्या विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ शनिवारी राज्यभरात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. परंतु उच्च न्यायालयाने महाराष्ट्र बंद करू नये असा आदेश दिल्यानंतर केवळ एक तास काळ्या फिती लावून मुक निषेध आंदोलन करण्यात आले. एक तासानंतर या घटनेच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात येऊन महायुतीच्या सरकारने राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात आली. जमायत ए तंजीम संघटनेच्या वतीने या मुक आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला.

सोलापुरातील जिल्हा परिषदेसमोरील पूनम गेट येथे शनिवारी सकाळी झालेल्या मुक आंदोलनात काँग्रेस, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने एक तास तोंडाला, मनेला, दंडाला काळ्याफिती लावून मुक आंदोलन करण्यात आले.

मुक आंदोलनानंतर मार्क्सवादीचे माजी आमदार आडम मास्तर, शिवसेनेचे अजय दासरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे बेरिया, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी आपल्या भाषणातून घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला. घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी करताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी करताना उच्च न्यायालयाच्या कारभारावर नेत्यांनी ताशेरे ओढले.

या आंदोलनात माजी आमदार दिलीप माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, काँग्रेसचे बाबा मिस्त्री, सुदीप चाकोते, उदय चाकोते, राष्ट्रवादीच्या शहराध्यक्ष सुनिता रोटे, काँग्रेसच्या फिरदौस पटेल, काँग्रेसच्या अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, काँग्रेसचे विनोद भोसले, गणेश डोंगरे, जुबेर कुरेशी, सुशील बंदपट्टे, अंबादास करगुळे, शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, काँग्रेसचे महादेव कोगनुरे, माजी महापौर मनोहर सपाटे, काँग्रेसचे अशोक निम्बर्गी, माकपचे एम एच शेख, अशोक देवकते, मकबूल मोहोळकर, संध्या काळे, राष्ट्रवादीचे प्रमोद गायकवाड, शिवसेनेचे प्रताप चव्हाण, अलका राठोड, पुनम बनसोडे, श्रीशैल रणधिरे, एन. के क्षिरसागर, माकपचे अनिल वासम यांच्यासह चारही पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





### संघर्ष सेनेच्यावतीने डॉ. आंबेडकर पुतळा येथे ठिय्या आंदोलन

कोलकत्ता, बदलापूर, कोल्हापूर येथील बलात्कार प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी संघर्ष सेनेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी संघर्ष सेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.कोलकत्ता, बदलापूर, कोल्हापूर येथील बलात्कार प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, तसेच पिडीता व त्यांच्या कुटुंबियांना संरक्षण द्यावे, सदरच्या शाळेची मान्यता रद्द करावी, महिलांसाठी संरक्षित बहिण यासाठी कृतीप्रणाली व स्वसंरक्षणासाठी महिलांसाठी शस्त्र परवाना मिळावा, शाळा परिसरात व शिक्षक स्टाफ रूम तसेच मुख्याध्यापक यांच्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, महाराष्ट्रातील बेपत्ता मुलींच्या शोधासाठी विशेष पथक नेमण्यात यावे, विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा पथक नेमण्यात यावे आदी मागण्यां यावेळी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आल्या. यावेळी संघर्ष सेनेचे शेखर बंगाळे, राहुल सावंत, सुप्रिया कापुरे, विद्या हावळे, जयश्री गवळी, शशिकला कसपटे, माधुरी पारपल्लीवार, सुनिता दळवी, शोभा राऊत, अलका ताटे, माधवी धाटे, विलास पाटील, माधवी पोतदार, काशिनाथ पोतदार, संदीप कांबळे, निखिल घोडके, चंद्रशेखर पाटील, करणराज गडदे आदी उपस्थित होते.

### आंदोलनकर्त्यांपेक्षा पोलिसांची संख्या जास्त...

महाविकास आघाडीच्यावतीने पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंद मागे घेण्यात आलेला असतानादेखील पोलिसांकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पूनम गेट येथील महाविकास आघाडीच्या मुक आंदोलनावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिस उपायुक्त, सहायक आयुक्त, पोलि निरीक्षक, इतर पोलिस अधिकारी, पुरुष व महिला कर्मचारी, गुप्तचर विभागाचे अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. आंदोलनस्थळी आंदोलनकर्त्यांपेक्षा पोलिसांची संख्याच जास्त असल्याचे दिसून येत होते.

## मानस अंधारे यांना देशातील सर्वोत्तम मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**



मानस विजय अंधारे यांना देशातील सर्वोत्तम मेडिकल कॉलेज ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस नागपूर येथे प्रवेश मिळाला आहे.

मानस यांना देशातील नीट परीक्षेमध्ये ७०२ गुण ९९.९८ टक्के मिळाले होते. सोलापूर सेंटरमधून ते पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. देशभरातील २३.८ लाख विद्यार्थ्यांमधून जनरल कॅटेगिरीत त्यांचा ५२१ वा नंबर आला होता. देशातील १००० विद्यार्थ्यांमध्ये त्यांचे गुणक्रमांक आल्याने त्यांना अत्यंत प्रतिष्ठित मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे. या कॉलेजमध्ये सर्व अत्याधुनिक फॅसिलिटी असूनही फी मात्र नाममात्र ५८५० रुपये असते. मानस अंधारे हे डॉक्टर विजय अंधारे हृदय शल्य विशारद यांचे सुपुत्र आहेत. अश्विनी विजय अंधारे या ऑटिस्टिक मुलांसाठी ट्रेनिंग करण्याचे पेरेंट कौन्सिलिंग करण्याचे काम करतात.

## हसापुरे यांची मुंबईतून विधानसभेसाठी फिल्डिंग

### महामेळावा ठरला फायद्याचा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. २४ ऑगस्ट-**
काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांनी काँग्रेसच्या महामेळाव्यासाठी मुंबईला उपस्थिती लावून विधानसभेच्या उमेदवारीसाठी फिल्डिंग लावल्याची चर्चा कार्यकर्त्यांमधून सुरू आहे.

सुरेश हसापुरे यांनी लोकसभा निवडणुकीत खासदार प्रणिती शिंदे यांना दहा हजारांचे मताधिक्य देण्यात मोठा वाटा असल्याचे सांगत विधानसभेसाठी तयारी सुरू केली आहे. गत वीस वर्षांतील जनसंपर्क व विकासकामांच्या जोरावर यंदाची विधानसभा लढविणारच म्हणत हसापुरे यांनी जोरदार फिल्डिंग लावली आहे. शिंदे परिवाराच्या



गळ्यातील ताईत बनलेले हसापुरे यांची गाडी सध्या सुसाट सुटली आहे. जिल्हा परिषद, डीसीसी बँक, बाजार समिती व दूध संघ या संस्थांच्या माध्यमातून हसापुरे यांनी कार्यकर्त्यांची जाळे तयार केली आहे. सर्वसमावेशक व सर्वधर्मसमभावाचे नेतृत्व म्हणून हसापुरे यांची ओळख आहे. शिवाय माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारून दक्षिणच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. कार्यकर्त्यांच्या आग्रहस्तव हसापुरे 'अभी नही तो कभी नही' म्हणत विधानसभा लढविणारच असा



चंग बांधून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात असल्याचे सांगण्यात येत आहे. हसापुरे यांनी मुंबई येथे काँग्रेसच्या महामेळाव्याला उपस्थिती लावून पक्षाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी विधानसभा उमेदवारीसाठी चर्चा केल्याची सांगण्यात येते. शिवाय उमेदवारी मिळण्यासाठी फिल्डिंग लावल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे हसापुरे यांनी तयारी सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे.

अनेक वर्षांपासून काँग्रेसमध्ये सक्रीय असलेले हसापुरे पक्षाच्या विविध कार्यक्रम व मेळाव्यास उपस्थित असतात. त्यामुळे मुंबईमधील काँग्रेसचा महामेळावा हसापुरे यांच्यासाठी फायद्याचा ठरला असल्याची चर्चा सुरू आहे.

## सभासदांना किमान 10 टक्के लाभांश देणार

**अध्यक्ष गणेश गाडगीळ यांची ग्वाही**

### सांगली अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. २४ ऑगस्ट-**
सांगली अर्बन बँकेची ८८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भावे नाट्यमंदिर येथे संपन्न झाली. बँकेने संचित तोटा भरुन काढून बँकेला निव्वळ नफा ६ कोटी ८२ लाख झाला आहे. पुढील वर्षीपासून सभासदांना किमान १० टक्के इतका लाभांश देण्याची ग्वाही अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी दिली.

ठेवी, कर्ज, गुंतवणूक, वसुली अंतर्गत कामकाज या चौफेर प्रगतीमुळे बँकेस अ वर्ग मिळाला असल्याची गाडगीळ यांनी जाहिर केले. गाडगीळ म्हणाले, यावर्षी सांगली अर्बन बँकेने मागील वर्षाअखेरचा पूर्ण संचित तोटा १७ कोटी ४२ लाख इतका भरुन काढून ३१ मार्च २०२४ अखेर ६ कोटी ८२ लाख इतका निव्वळ नफा मिळवला आहे. यावर्षी बँकेने आतापर्यतच्या इतिहासातील उल्लेखनिय कामगिरी केली आहे. बँकेचे नेट एन.पी.ए चे प्रमाण कमी होऊन १.७८ टक्के पर्यत खाली आहे, ठेवीमध्ये ७५ कोटी ८४ लाख व कर्जामध्ये ४४ कोटी ७ लाखाची वाढ झाली आहे. गणेश गाडगीळ म्हणाले, मार्च २०२४ अखेर बँकेच्या ठेवी ११८१ कोटी १९ लाख इतक्या झाल्या आहेत, कर्जे ६९४ कोटी ५४ लाख इतकी दिली आहेत. बँकेची गुंतवणूक ४९१ कोटीची झाली आहे. बँकेचा एकूण व्यवसाय १८७६ कोटी झाला आहे. बँकेचे निव्वळ एनपीए चे प्रमाण मागील वर्षाच्या २.९४ टक्केवरुन १.१६ टक्केनी कमी होऊन १.७८ टक्के झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार यावर्षी नेट एनपीए चे प्रमाण ३ टक्केच्या आत आहे, पुढीलवर्षी बँकेने शून्य टक्के एनपीए करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. बँकेने सभासदांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. आय.एफ.एस.सी कोड, भांडवली खर्च, नविन शाखा, डाटा सेंटर यासह अनेक गोष्टी सक्षम करणार आहे. सुरुवातीला बँकेचे अध्यक्ष गाडगीळ, उपाध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांनी बँकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषयाचे वाचन केले. यावेळी श्रीकृष्ण माळी, जगदीश कालगावकर, हरिदास पाटील, एस.एल. पाटील आदी सभासदांनी कामकाजात सहभाग घेतला त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना गाडगीळ यांनी उत्तरे दिली.

यावेळी संचालक सी.ए अनंत मानवी, डॉ. रविंद्र आरळी, हणमंत पाटील, संजय पाटील, शैलेंद्र तेलंग, संजय धामंगावकर,रणजित चव्हाण, कालिदास हरिदास, सागर घोंगडे, सतीश मालू, विश्वास चितळे, स्वाती करंदीकर, सौ.अश्विनी आठवले, रविंद्र भाकरे, मनोज कोरडे, सी.ए सागर फडके आदी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर, सत्यविजय बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब पवार, दीपक बाबा शिंदे, प्रा.रजपूत, डी.एस.जोशी, श्रीरंग मोरे, उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप कुलकर्णी यांनी केले.

## डॉ. दिलीप पटवर्धन यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**
जीवनविद्या मिशन शाखा यांच्या वतीने तूच आहेस तुझ्या जिवनाचा शिल्पकार असा संदेश देणारे विश्वसंत, ज्ञानयोगी, कर्मयागी थोर समाजसुधारक व जीवनविद्येचे प्रणेते सदगूरू पे यांचे सतशिष्य डॉ. दिलीप पटवर्धन सांगली यांचे जीवन जगणे ही एक कला या विषयावर निर्मलकुमार फडकुले सभागृहात दि.२५ ऑगस्ट रोजी सांय. ६ ते ८ या वेळेत होणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जीवनविद्या मिशन शाखेच्यावतीने करणयात आले आहे.

# मुंबईमध्ये मविआकडून चक्क भर पावसात मूक आंदोलन

## राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २४ ऑगस्ट-**
बदलापूर बालिका अत्याचारासह राज्यभरातील महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्यावतीने शनिवारी करण्यात आलेल्या मुक आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुंबई , ठाणे, पुण्यासह विविध ठिकाणी आघाडीचे नेते व पदाधिकाऱ्यांनी तोंडाला व दंडाला काळ्याफिती बांधून या घटनांचा व सरकारचा निषेध केला. भरपावसात झालेल्या या आंदोलनात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबई शिवसेना भवनासमोर तर, शरद पवार यांनी पुण्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड, राजेंद्र विचारे यालेभर पावसात मुक आंदोलनात हजारों कार्यकर्त्यासह सहभागी होते..

'कंस मामा राख्या बांधत फिरत असताना दुसरीकडे बहिणीवर अत्याचार होत आहेत, अशी टीका' उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर करीत राज्यभरात' लाडकी बहिण सुरक्षित तर घर सुरक्षित,' ही मोहीम राज्यभरात राबविण्याचे आवाहन केले.तर शरद पवार यांनी महिलांच्या सुरक्षाबाबत आंदोलकांना जाहीर प्रतिज्ञा दिली.

बदलापुरात बालिका वर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र उच्च न्यायालयात त्याविरोधात दाखल याचिकेवर न्यायालयाने निर्णय देताना बंद बेकायदेशीर ठरवीत कोणत्याही राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नसल्याचे जाहीर केले व त्याविरोधात संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते.

त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बंदचे आवाहन मागे घेत त्याऐवजी राज्यभरात ठिकठिकाणी मूक आंदोलन करण्याचे जाहीर केले होते.त्यानुसार आज सकाळी मुंबईत शिवसेना भवनास्मोर ठाकरे गटाने तर धारावीत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी दंडाला काळी फित व तोंडाला काळी पट्टी बांधून आंदोलन केले.

यावेळी त्यांनी याचिकाकर्त्यांवरही जोरदार टीका केली. गेल्या काही महिन्यापूर्वी भारत बंद करण्यात आला होता. पण त्या विरोधात कोणीही कोणीही कोर्टात गेले नाही. पण इथे काही सरकारचे 'सदा'आवडते आहेत. त्यांच्या माध्यमातून हा बंद होवू नये ,यासाठी कोर्टात गेले. कोर्टात गेलेले हे सरकारचे चेलेचपाटेच होते. महिलांवर अत्याचार होतात. या विरोधात आवाज उठवण्यासाठी बंद पुकारला जातो. त्यालाही विरोध केला जातो. अशा वेळी जे याचिकाकर्ते कोर्टात जातात तेही तेवढेच विकृत आहे. जे एखाद्या पापावर पांघरूण घालतात तेही तेवढेच दोषी असल्याचे ठाकरे म्हणाले.

यावेळी त्यांनी कोर्टाला धन्यवाद देत चिमटेही काढले. आमचीही केस कोर्टात गेली दोन वर्षापासून सुरू आहे. त्यावर अजूनही काही निर्णय आलेला नाही. पण बंदच्या केसमध्ये कोर्टाने तात्काळ निर्णय दिला. त्यांचे त्याबद्दल आभार मानतो.

### 'बहिण सुरक्षित तर घर सुरक्षित'

हे आंदोलन थांबता कामा नये असे आदेश उद्धव ठाकरे यांनी यावेळी शिवसैनिकांना दिले आहे. तुमच्या गावात, तालुक्यात, शहरात जिथे असेल तिथे एक अभियान राबवा. बहीण सुरक्षित तर घर सुरक्षित. यावर लोकांच्या स्वाक्षऱ्या घ्या. या स्वाक्षऱ्या आपण दिल्लीला कोर्टात पाठवणार आहोत, असे ठाकरे म्हणाले.

### शक्ती कायदा मंजूर करा

स्वाक्षरी अभियानातून आम्हीं बंद का करत होतो, हे कोर्टाला सांगणार आहोत, आमचा आवाज बंद करता येणार नाही. तसं झालं तर तो आवाज आणखी मोठा होईल . शक्ती कायदा महाविकास आघाडीच्या काळात मंजूर झाला. तो आता राष्ट्रपतींकडे धुळ खात पडला आहे. तो मंजूर करावा , अशी मागणी उध्दव ठाकरे यांनी यावेळी केली.

## महत्त्वाचे

### अर्थव्यवस्थेचा वेग मंदावण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** सरकारी खर्चात झालेल्या कपातीचा हवाला देत गेल्डमॅन सॅचने भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग मंदावण्याची शक्यता वर्तवली आहे. यंदा आणि पुढील वर्षासाठी देशांतर्गत उत्पादनाच्या पूर्वानुमानात २० अंकांची कपात केली आहे. २०२४ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ६.७ आणि २०२५ मध्ये ६.४ टक्के राहील, असा अंदाज गोल्डमॅनने व्यक्त केला आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत एप्रिल ते जून या तिमाहीत सरकारी खर्चात ३५ टक्के कपात होऊ शकते, असे या अहवालात म्हटले आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग किंचित मंदावण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, २०२४-२५ मध्ये आर्थिक विकासाचा वेग ७.२ टक्के राहील, अशी शक्यता भारतीय रिझर्व्ह बँकेने या महिन्याच्या सुरुवातीला वर्तवली आहे.

### पद्म पुरस्कारांसाठी नामांकनाची अंतिम तारीख १५ सप्टेंबर

**नवी दिल्ली :** दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा होत असते. ही प्रथा पुढे नेत यावर्षीही पद्म पुरस्कारांची नामांकने केंद्रीय गृह मंत्रालयाने सादर करण्याचे आवाहन केले आहे. ही प्रक्रिया १ मेपासून प्रारंभ होत असून, अंतिम तारीख १५ सप्टेंबर आहे. पद्म पुरस्कारांसाठीचे नामांकने राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवरही ऑनलाईन सादर करता येणार आहे. पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असून, कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, सामाजिक कार्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी, सार्वजनिक सेवा, नागरी सेवा, व्यापार, औद्योगिकी अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जातात. प्रत्येक भारतीय नागरिक, वंश, व्यवसाय, स्तर, किंवा लिंगाचा अपवाद न करता या पुरस्कारांसाठी पात्र आहे. सरकार सर्व नागरिकांना स्वत:चे नामांकन करण्याचे आणि इतर योग्य व्यक्तींच्या शिफारसी सादर करण्याचे आवाहन करीत आहे. विशेषत: महिला, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, आणि निस्वार्थ सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या शोधासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### हरयाणात काँग्रेस स्वबळावर लढणार

**नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

हरयाणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष आम आदमी पार्टीसोबत आघाडी करणार नाही. ही निवडणूक आम्ही स्वबळावर लढणार आहोत, असे पक्षाच्या वरिष्ठ नेत्या कुमारी शेलजा यांनी स्पष्ट केले. हरयाणात काँग्रेस पक्ष मजबूत स्थितीत आहे. त्यामुळे आम्हाला कुणाच्याही आधाराची आवश्यकता नाही. ९० सदस्यीय हरयाणा विधानसभेत काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळणार असून, त्रिशंकू स्थिती निर्माण होण्याची कुठलीही शक्यता नाही, असे त्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. जननायक जनता पार्टीने हरयाणातील जनाधार गमावला आहे. या पक्षाला आगामी निवडणुकीत कुठलेही भवितव्य नाही. हा पक्ष संपलेला आहे, अनेक आमदार आणि नेते पक्ष सोडून गेले आहेत, असे शेलजा म्हणाल्या.भारतीय राष्ट्रीय लोकदल आणि बसपा यांच्यात आघाडी होण्याची शक्यताही शेलजा यांनी फ टाळून लावली आणि आघाडी झाली तरी, ती प्रभावी ठरणार नाही. या दोन्ही पक्षांची ताकद आता राहिलेली नाही. त्यांच्याकडून आम्हाला कुठलेही आव्हान मिळण्याची शक्यता नाही, असे त्यांनी सांगितले.

# शेवटच्या मूळ पगाराच्या ५० टक्के निवृत्तिवेतन

### युनिफाईड पेन्शन योजना लागू

### केंद्र सरकारची कर्मचाऱ्यांना नवी भेट

**नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

केंद्र सरकारने आज एकीकृत निवृत्तीवेतन योजनेची (युनिफाईड पेन्शन स्कीम) घोषणा केली. सरकारने कर्मचाऱ्यांना दिलेली गणेशोत्सवाची ही मोठी भेट मानली जात आहे. या योजनेचा देशभरातील लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. १ एप्रिल २०२५ पासून ही योजना लागू होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन्, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव या निर्णयाची माहिती दिली.



या योजनेनुसार एखाद्याने सलग २५ वर्षे नोकरी केली तर, त्याला त्यांच्या शेवटच्या १२ महिन्यांच्या मूळ पगाराच्या ५० टक्के एवढे पेन्शन मिळणार आहे. निवृत्तीवेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबाला त्या निवृत्त कर्मचाऱ्याला त्याच्या मृत्यूच्या शेवटच्या महिन्यात जे निवृत्तीवेतन मिळाले, त्याच्या ६० टक्के निवृत्तीवेतन मिळणार आहे. कोणी दहा वर्षांनंतर नोकरी सोडली तर, त्याला दहा हजार रुपये निवृत्तीवेतन मिळेल.

१० वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्या प्रमाणात निवृत्तीवेतन मिळेल. या निवृत्तीवेतनावर केंद्र सरकारतर्फे वेळोवेळी जाहीर होणारा महागाई भत्ताही मिळणार आहे. त्याचप्रमाणे ग्रॅच्युटीशिवाय एकगठ्ठा रक्कमही मिळेल.

केंद्र कर्मचाऱ्यांना नवी पेन्शन योजना आणि युनिफाईड पेन्शन योजा यातील एक पर्याय निवडता येईल. नव्या पेन्शन योजनेचे कर्मचारी युनिफाईड पेन्शन योजनेचा पर्याय घेऊ शकतील.

नवीन पेन्शन योजनेत बदल करण्याची मागणी कर्मचारी संघटनांनी केली होती. या मागणीची दखल घेत नवीन निवृत्तीवेतन योजनेचा आढावा घेत त्यात सुधारणा सूचवण्यासाठी केंद्र सरकारने डॉ. सोमनाथ समिती स्थापन केली होती. या समितीने एनपीएसमध्ये बदल करण्याच्या शिफारसी केल्या होत्या. या शिफारसी मान्य करीत केंद्र सरकारने आज एकीकृत निवृत्तीवेतन योजना लागू केली. (तभा वृत्तसेवा)

#### अशी आहे युनिफाईड पेन्शन योजना

- १ एप्रिल २०२५ पासून अंमलबजावणी
- २५ वर्षे काम केल्यास निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या १२ महिन्यांच्या सरासरी वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळणार
- पेन्शनधारकाचे निधन झाल्यास मृत्युसमयी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम कुटुंबाला मिळेल
- १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडल्यास १० हजार रुपये पेन्शन
- सुमारे २५ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ
- निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पेन्शनच्या अनुषंगाने आणली नवी योजना



#### केंद्राची बायो ए३ योजना

कॅबिनेट बैठकीत बायो ए३ योजनेला मंजुरी देण्यात आली. तसेच, विज्ञानधारा योजनेलाही बैठकीत मंजुरी देण्यात आली. पुढील काळात बायो क्रांती, बायोटेक्नोलॉजीच्या वापरास चालना देण्यात येणार असल्याचे अश्विनी वैष्णव म्हणाले.

### पंतप्रधान मोदी आज जळगावमध्ये

**नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

आपल्या सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात ठसा उमटवणाऱ्या ११ लाख नवीन लखपती दीदींचा सत्कार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी महाराष्ट्रातील जळगावला येणार आहेत.



नरेंद्र मोदी २,५०० कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. यामुळे ४.३ लाख बचत गटांच्या सुमारे ४८ लाख सदस्यांना फायदा होईल, असे निवेदनात म्हटले आहे. मोदींच्या हस्ते पाच हजार कोटी रुपयांचे बँक कर्ज वितरित केले जाईल. त्यामुळे २.३५ लाख बचत गटांच्या २५.८ लाख सदस्यांना फायदा होईल. लखपती दीदी बनवण्याची योजना सुरू झाल्यापासून वार्षिक एक लाख रुपये कमावणाऱ्या बचत गटांच्या सदस्य असलेल्या एक कोटी महिला या श्रेणीत सामील झाल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# खाजगी हेलिकॉप्टरला अपघात, चार जखमी



मुंबईहून हैदराबादकडे घेतले होते उड्डाण

**पुणे, २४ ऑगस्ट**

मुंबईहून हैदराबादकडे उड्डाण घेणाऱ्या एका खाजगी कंपनीच्या हेलिकॉप्टरला पुण्याजवळ अपघात झाला. यात चार जण जखमी झाले असून, त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुण्याचे पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी या घटनेची माहिती दिली. ग्लोबल वेक्ट्रा कंपनीच्या मालकीचे हे हेलिकॉप्टर होते. जखमी झालेल्यांपैकी तिघांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईच्या जुहू येथून हेलिकॉप्टर हैदराबादकडे निघाले होते. पुणे जिल्ह्यातील मुळशी तहसीलच्या पौड भागात ते कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. यातील कॅप्टन आनंद यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. अन्य तीन जखमींमध्ये दीर भाटिया, अमरदीपसिंग आणि एस. पी. राम यांचा समावेश आहे.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि मदत व बचाव कार्य हाती घेतले. हेलिकॉप्टरला नेमका अपघात कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झाले नसून, अपघाताच्या चौकशीचा आदेश देण्यात आला आहे. तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाला असण्याची शक्यता सुरुवातीच्या तपासात व्यक्त करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# अशी शिक्षा हवी की पुन्हा असे कृत्य करणार नाही

### उपमुख्यमंत्री अजित पवारांचा संताप

**यवतमाळ, २४ ऑगस्ट**

बदलापूरच्या शाळेतील दोन विद्यार्थिनींवर अत्याचार करण्यात आला. शासनाकडून त्याच्यावर कठोर कारवाई म्हणजे फाशीचीच शिक्षा होईल. मात्र, माझ्या भाषेत सांगायचे झाले, तर त्या आरोपीचे कापूनच टाकायला पाहिजे. म्हणजे पुन्हा असा विचारही करायची कोणी हिंमत करणार नाही, असे परखड मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे व्यक्त केले.



भगव्या फेट्यांनिशी उत्साहाने उपस्थित लाडक्या बहिणी

यवतमाळजवळील किन्ही येथे महिला सशक्तीकरण कार्यक्रमात ते शनिवारी बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही यवतमाळात स्त्री शक्तीला वंदन करण्यासाठी आलो आहोत. लाडकी बहीण योजनेत शेवटचा अर्ज येईल, तोपर्यंत ही योजना सुरूच राहणार आहे. महायुती सरकारने बहिणींना एसटीचे तिकीट अर्धे केले आहे. बचत गटासाठी मोठ्या प्रमाणात निधीचे वाटप करण्यात आले आहे.

आपल्या सरकारने 'नदी जोडो' योजना सुरू केली आहे. यात जवळपास ५५० किलोमीटर नद्या जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेती मोठ्या प्रमाणात पाण्याखाली येणार आहे. आपले सरकार हे जनतेचे सरकार आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास हेच आपले स्वप्न आहे, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

**'लाडकी बहीण'मुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली**

(वृत्त शेवटच्या पानावर)

### विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत गुरुवारपर्यंत पाऊस

**मुंबई, २४ ऑगस्ट**

बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रातही कमी दाबाचे पट्टे तयार होत असल्याने मान्सूनचे वारे प्रचंड वेगाने सक्रिय झाले आहेत. त्यामुळे शनिवार ते मंगळवार या कालावधीत राज्यात मान्सून जोरदार बरसणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत गुरुवारपर्यंत पाऊस बरसेल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली.

हवामान विभागाने अकोला आणि अमरावतीसाठी शनिवारी ऑरेंज अलर्ट दिला होता, तर उर्वरित जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट दिला आहे. भंडारा, चंद्रपूर गडचिरोली, गोंदिया आणि नागपुरात बुधवार आणि गुरुवारी पावसाची शक्यता आहे. राज्यात पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, साताऱ्यासाठी हवामान विभागाने 'रेड अलर्ट' दिला आहे. राज्यात मान्सून सक्रिय होत आहे. (वृत्तसंस्था)

# मोदी-योगींची स्तुती केल्याने पत्नीला तिहेरी तलाक

### अयोध्येतील विकासकामांच्या कौतुकाने संताप अनावर

**लखनौ, २४ ऑगस्ट**

अयोध्येच्या विकासाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची स्तुती केल्याने उत्तरप्रदेशातील एका महिलेला तिच्या पतीने तिहेरी तलाक दिला. या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीनंतर सात जणांना अटक करण्यात आली आहे.

उत्तरप्रदेशच्या बहराइचमधील एका १९ वर्षीय विवाहितेने आरोप केला की, तिने राज्य आणि केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारचे कौतुक केल्यामुळे पतीने तिहेरी तलाक दिला तसेच पतीसह सासू आणि इतर सासरच्या लोकांनी अमानुष छळ केला. पीडितेच्या तक्रारीनंतर पती अर्शद, दीर फरहान आणि शफाफ, जाऊ सिमरन, सासू रईसा, सासरे इस्लाम, पतीची बहीण कुलसुम आणि एका नातेवाईकाच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला. या सर्वांना अटक करून त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. बहराइचच्या पोलिस अधीक्षक वृंदा शुक्ला यांनी सांगितले की, येथील मरियम शरीफचे मागील वर्षी अयोध्येतील अर्शदशी लग्न झाले होते. तिने आरोप केला की, अयोध्येत मोदी आणि योगी आदित्यनाथ यांनी केलेल्या विकासकामांचे कौतुक केले, तेव्हा तिचा पती संतापला. अर्शदने पत्नीला आधी तिच्या माहेरी पाठवले आणि नंतर तलाक दिला तसेच तिच्या अंगावर गरम मसूर डाळ फेकली. जेव्हा तिचा पती तिला अयोध्येत फिरण्यासाठी घेऊन गेला; तेव्हा तेथील विकास पाहून प्रभावित झाली होती. मोदी व योगींची स्तुती केली. ती माझ्या नवऱ्याला आणि सासरच्या मंडळींना आवडली नाही. त्यांनी मला शिवीगाळ आणि मारहाण केली, असे तिने म्हटले आहे.

# दोन वर्षांत नक्षलवादाचा सफाया

### अमित शाह यांनी व्यक्त केला विश्वास

**रायपूर, २४ ऑगस्ट**


नक्षलवादी हल्ल्यांचे प्रमाण कमी झाले आहे. विकासाबाबत लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला. बिहार, झारखंड, ओडिशा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र नक्षलसमस्येपासून जवळपास मुक्त झाले आहे. नक्षल हल्ल्यांचे प्रमाण ५४ टक्क्यांनी घटले. २०२६ पर्यंत नक्षलवादाचा सफाया केला जाईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी येथे पत्रपरिषदेत व्यक्त केला.

नक्षलवादाच्या समस्येवर अमित शाह यांनी शनिवारी येथे बैठक घेतली. यात विकासाच्या मुद्यांवरही चर्चा करण्यात आली. माझा छत्तीसगड दौरा येथील नक्षलवादाच्या जुन्या समस्येचे निराकरण आणि नक्षलप्रभावी



जिल्ह्यांत केंद्र आणि छत्तीसगड सरकारच्या सर्व योजना कार्यान्वित करणे तसेच नक्षलप्रभावी क्षेत्रांमध्ये पायाभूत प्रकल्पांची प्रगतीच्या आड येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी होता, असे अमित शाह यांनी सांगितले. आजच्या बैठकीसाठी सर्वच राज्यांचे पोलिस महासंचालक आणि मुख्य सचिवांना बोलावले होते. छत्तीसगडमधील नक्षलसमस्या सोडवायची असेल, तर शेजारच्या राज्यांमधील परिसंस्था बळकट असणे आवश्यक आहे. डाव्या दहशतवादावर बळकट रणनीतीसह शेवटचा प्रहार करण्याची वेळ आली आहे, असे अमित शाह यांनी सांगितले.

माओवाद देशाच्या लोकशाही व्यवस्थेसाठी सर्वांत मोठे आव्हान असल्याच्या मुद्यावर बैठकीत सहमत झाले. मागील चार दशकांत नक्षलवादामुळे जवळपास १७ हजार लोकांचा मृत्यू झाला. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या सरकारने या समस्येचे आव्हान स्वीकारले. बस्तरपासून ते बीजापूर, दंतेवाडापासून ते धमतरीपर्यंत संपूर्ण परिसराचा विकास आणि नक्षलवादापासून लोकांना मुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे. २०२२ हे असे वर्ष होते, ज्यात चार दशकांपासून मृत्यूंची संख्या प्रथमच १०० च्या खाली गेली. २०१४ ते २०२४ या कालावधीत सर्वांत कमी माओवादी हिंसाचाराच्या घटना घडल्या. २०१९ ते २०२४ या कालावधीत नक्षलप्रभावातून काही भाग मुक्त झाले. बिहार, झारखंड, ओडिशा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचा यात समावेश आहे. महाराष्ट्राचा एक जिल्हा वगळता हे राज्य नक्षल समस्येतून मुक्त झाले, असे अमित शाह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



# वर्षभराच्या मुक्कामानंतर कुनोत रमले चित्ते

### आता मुक्तपणे वावरू लागले ● लवकरच अधिवासातून बाहेर येणार

**नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय अभयारण्यात सुमारे वर्षभरापूर्वी सोडण्यात आलेले आफ्रिकन चित्ते चांगलेच रमले असून, त्यांना या अधिवासाची सवय झाली आहे. आता त्यांना लवकरच मुक्तपणे वावरण्यासाठी अधिवासातून बाहेर काढण्यात येणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

लवकरच या सर्व चित्त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यात येणार आहे. सध्या मान्सून सुरू आहे. मध्य भारतातून मान्सूनने माघार घेतल्यानंतर आम्ही या चित्त्यांना त्यांच्या अधिवासातून बाहेर काढू आणि अभयारण्यात मोकळे सोडू, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. केंद्रीय चिता प्रकल्पाच्या सुकाणू समितीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला, असे ते म्हणाले.

सुकाणी समितीच्या सदस्यांनी आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अलिकडेच कुनोला भेट दिली होती. या भेटीत त्यांनी चित्यांना अधिवासातून बाहेर काढण्याच्या योजनेवर चर्चा केली. मान्सूनने माघार घेतल्यानंतर मोठ्या चित्यांना एकाच ट□प्यात बाहेर सोडण्यात येईल तसेच शावक व त्यांच्या आईंना डिसेंबरनंतर अधिवासातून मुक्त करण्यात येईल, असे अधिकारी म्हणाले.



यात १३ प्रौढ चित्ते आणि १२ शावकांचा समावेश असून, सर्वांची प्रकृती उत्तम आहे. सुरुवातीला ज्या मृत्यूच्या घटना घडल्या, त्या वातावरणाशी संबंधित संसर्गाच्या होत्या, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नामिबिया येथून आठ चित्यांची पहिली तुकडी सप्टेंबर २०२२ मध्ये कुनो राष्ट्रीय अभयारण्यात आणण्यात आली होती. त्यानंतर गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये आणखी १२ चिते दक्षिण आफ्रिकेतून आणण्यात आले होते.

सुरुवातीच्या काळात या सर्व चित्यांना मोकळ्या जंगलात सोडण्यात आले होते. मात्र, तीन चित्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना पुन्हा अधिवासात परत पाठविण्यात आले होते. बॅक्टेरियामुळे होणाऱ्या सेप्टिसेमिया आजारामुळे या चित्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय चाचणीत आढळून आले होते. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्याची जगाने घेतली दखल

### वर्तमानपत्रांनी प्रामुख्याने दिले स्थान

**नवी दिल्ली, २४ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या युक्रेन दौऱ्याची जगभरातील माध्यमांनी दखल घेतली आहे. दिग्गज वर्तमानपत्रांनी या दौऱ्याला प्रामुख्याने स्थान दिले तसेच त्यांनी मोदींचे कौतूक्कही केले आहे.

न्यू यॉर्क टाईम्सने नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाची स्तुती केली आहे. रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांसोबत आपले संबंध नरेंद्र मोदी अतिशय सावधगिरीने सांभाळत आहेत. नरेंद्र मोदी यांचा हा दौरा युक्रेनच्या मुत्सद्देगिरीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल असल्याचे न्यू यॉर्क टाईम्सने म्हटले आहे.

मोदींसमोर रशिया आणि युक्रेनमधील संतुलन कायम ठेवण्याचे आव्हान आहे. त्यांनी अलिकडेच व्लादिमिर पुतिन यांची भेट घेतली.

नरेंद्र मोदी यांचा युक्रेन दौरा म्हणजे राजनैतिक संतुलनाची परीक्षा असल्याचे बीबीसीने म्हटले आहे. पुतिन यांच्या भेटीनंतर मोदी युक्रेन दौऱ्यावर आल्याचे वृत्तात म्हटले आहे. नरेंद्र मोदी याच्या रशिया दौऱ्यावर पाश्चात्त्य देशांनी टीका केली होती. पाश्चात्त्य देशांना शांत करण्यासाठी मोदी यांनी युक्रेन दौरा केला. मात्र, तो भारताच्या स्वतंत्र व संतुलित परराष्ट्रधोरणाचा तो एक भाग असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

नरेंद्र मोदी यांचा युक्रेन दौरा एका मित्राच्या रूपात असल्याचे वॉशिंग्टन पोस्टने म्हटले आहे. युद्धाच्या परिस्थितीत कोणत्याही तटस्थ देशाच्या प्रमुखाचा अत्यंत आवश्यक दौरा होता, असे यात म्हटले.

मोदी यांचा युक्रेन दौरा ऐतिहासिक असल्याचे गार्डियन वृत्तपत्राने म्हटले आहे. कोणत्याही भारतीय पंतप्रधानाचा हा पहिला दौरा असल्याचे यात म्हटले. झेलेन्स्की यांनी समाज माध्यमांवर मोदी यांचा दौरा ऐतिहासिक म्हटले आणि भारताच्या भूमिकेचे कौतुक केल्याचे वृत्तात म्हटले.

मोदी यांनी अलिकडेच केलेल्या रशिया दौऱ्यानंतर युक्रेनला भेट दिली, असे सीएनएनने वृत्तात म्हटले आहे. भारताने सातत्याने संघर्षविरामाचे आवाहन केले; मात्र रशियावर टीका केलेली नाही, असे या वृत्तात म्हटले आहे. रणांगणात कोणत्याही समस्येचे समाधान शोधता येत नाही, या मोदींच्या वक्तव्याची दखल घेतली. भारत रशियाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे, असे यात म्हटले आहे.

## रोखठोक

दिनेश गुणे

# झोपी गेलेला जागा झाला...

माणसाच्या शरीरातील अनेक अवयव हे दृश्य असतात, त्यांच्या हालचाली करता येतात आणि इतरांस त्या हालचाली जाणवतात; पण काही अवयव अदृश्यदेखील असतात, त्यांच्या हालचाली साहजिकच पाहता येत नाहीत, तरीही इतरांस जाणवतात. 'मन' नावाचा असाच एक अदृश्य अवयव असतो. या मनाच्या हालचाली संवेदनांच्या परिमाणात मोजल्या जातात. काही संवेदना तीक्ष्ण असतात तर काही संवेदना बोथट असतात. यामुळेच पाहता न येणाऱ्या या अवयवास कातडी असते, असे म्हटले जाते. तीक्ष्ण संवेदनशील मनांची कातडी नाजूक असते तर बोथट संवेदनांच्या मनांची कातडी जाडजूड असते. म्हणून अशा मनाच्या माणसाला गेंड्याच्या कातडीची माणसे म्हटले जाते. या कातडीखालच्या मनात उमटणाऱ्या संवेदना काळानुरूप तीक्ष्ण किंवा बोथट होत असाव्यात. बहुतांश वेळा राजकारणात अशा मनांना मानाचे स्थान मिळालेले पाहावयास मिळते. विशेषतः राज्यकर्त्यांच्या नावाने बोटे मोडण्याची संधी जेव्हा जेव्हा विरोधकांस मिळते, तेव्हा ते राज्यकर्त्यांच्या मनाला गेंड्याची कातडी असल्याचा दावा करत असतात. पण हेच विरोधक जेव्हा राज्यकर्त्यांच्या भूमिकेत असतात, तेव्हा त्यांच्या मनाची कातडी तशीच असते, याचा त्यांना सोयीनुसार विसर पडलेला असतो.

जनतेच्या प्रश्नांची खरी जाण विरोधकांनाच असते, असे म्हणतात, ते अक्षरशः खरे आहे. जे विरोधक जनतेच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी राज्यकर्त्यांच्या विरोधात आक्रमक होतात, तेव्हा त्यांच्या मनाची कातडी संवेदनशील असते, असा राजकारणातील सार्वत्रिक अनुभव असतो. तो कालातीत असतो, हे महाराष्ट्रातील सध्याच्या राजकारणाकडे आणि राजकीय हमरीतुमरीकडे पाहिल्यास स्पष्ट होऊ शकते. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या बदलापूर नावाच्या गावात बालिकांवरील लैंगिक अत्याचाराचा प्रकार उघडकीस आल्यानंतर उफाळलेला सामाजिक असंतोष ही साहजिक बाब म्हणजे समाजाच्या संवेदनशील मनाचे स्पष्ट प्रतिबिंब होते. असे काही घडले की सामाजिक सुरक्षिततेच्या भावनांना धक्का पोहोचतो आणि असुरक्षिततेच्या भयाचे सावट समाजावर पसरते. ही भीती दूर करून त्यांच्या सुरक्षिततेची हमी राज्यकर्त्यांनीच नव्हे, तर प्रत्येक जबाबदार नेत्याने समाजास द्यायला हवी, हे अपेक्षितच असते. त्यामुळे बदलापूरच्या त्या घटनेनंतर समाजात तशी अपेक्षा व्यक्त होणे साहजिक होते. पण या अपेक्षेत संतापाचे तेल ओतून या घटनेतून सामाजिक उद्रेक उफाळण्याजोगी परिस्थिती निर्माण करण्याची संधी साधली जात असल्याचे आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्यानंतर संवेदनशीलतेचा मुद्दा ऐरणीवर आला आणि अपेक्षेप्रमाणे विरोधक या नात्याने राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आपल्या संवेदनशीलतेचे जोरदार राजकीय प्रदर्शन सुरू केले. गेल्या तीन-चार दिवसांपासून राज्यात जे काही राजकीय वादळ घोंघावताना दिसत आहे. त्यामध्ये विरोधकांनी समाजमनावर आपल्या संवेदनशीलतेची छाप पाडण्याचा विडा उचलल्याचे चित्र आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. न्यायालयाने परवानगी नाकारली नसती, तर शनिवारी राज्यात बंद पुकारून या विकृत घटनेच्या निषेधाचे राजकारण करत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात समाजात रण माजविण्याची विरोधकांची मोठी राजकीय संधी हुकली असली, तरी या घटनेच्या निमित्ताने राज्यातील समाजमनातील भयभावना जिवंत राहावी, त्यामध्ये शक्य तितकी भर पडावी आणि जनसामान्यांना सुरक्षिततेची हमी देण्याची जबाबदारी पेलण्यात राज्यकर्ते असमर्थ असल्याची भावना जनमानसात रुजवून त्याचा राजकीय लाभ उठवावा यासाठी आता प्रयत्नांची जोरदार शर्थ सुरू झाली आहे. न्यायालयाच्या मनाईनंतरही राज्यात ठिकठिकाणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उघडलेली आंदोलनांची आघाडी पाहता, बदलापुरातील त्या घटनेचे हाती आलेले कोलीत वापरून राजकीय पोळी भाजून घेण्याची व सामाजिक भयभावनेचा फायदा उठविण्याची स्पर्धा सुरू झालेली दिसते. सत्ताधारी भाजपा-शिवसेना महायुतीच्या कारभारावर या दुर्दैवी घटनेचे निमित्त साधून कोरडे ओढण्याच्या या स्पर्धेत सर्वात पुढे कोण राहतो, याची एक उपस्पर्धदेखील या निमित्ताने सुरू असलेली दिसते. त्यामुळेच शनिवारच्या बंद आंदोलनाची संधी हुकल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी मुंबईत, काँग्रेसच्या नाना पटोले यांनी ठाण्यात तर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप गट) नेते शरद पवार यांनी पुण्यात आपापल्या आंदोलनाचे झेंडे उभारले. विरोधकांच्या आंदोलनामागील कारण आणि हेतू एकच असतानाही, हे एकच कारण त्यांना एकत्र आणू शकले नाही. त्यांनी आंदोलने मात्र स्वतंत्रपणे केली, तेव्हाच शक्तिप्रदर्शनाचा आणि शक्ती आजमावण्याच्या राजकारणाचा त्यांचा स्वतंत्र हेतू उघड झाला होता. न्यायालयाने मनाई केल्यामुळे सामूहिक शक्तिप्रदर्शनाची आणि त्याद्वारे सामूहिक शक्ती आजमावण्याची संधी मात्र झाकल्या मुठीसारखीच राहिली, हे विरोधकांचे सुदैव म्हणावे लागेल. अन्यथा, त्याच्या यशापयशावरून श्रेयवाद किंवा खापर फोडण्याची नवी उपस्पर्धा राज्याला पाहावयास मिळाली असती. ते टळले ही विरोधकांच्या दृष्टीने इष्टापत्ती असली, तरी समाजाच्या दृष्टीने अत्यंत नाजूक आणि संवेदनशील असलेला बदलापूर येथील त्या घटनेचा मुद्दा आता पूर्णपणे राजकीय झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शनिवारी जेव्हा महाविकास आघाडीतील तीन पक्षाचे तीन नेते राज्यात तीन ठिकाणी स्वतंत्रपणे आपापली आंदोलने करत होते, त्याच वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांची नागपुरात पत्रकार परिषद सुरू होती. बदलापूरच्या निमित्ताने त्यांनी या नेत्यांच्या संवेदनशीलतेचा बुरखा टराटरा फाडला. बदलापूरसारखी घटना यापूर्वी महाराष्ट्रात कधी घडलीच नव्हती, असा राजकीय रंग देण्याचा विरोधकांचा प्रयत्न यातून उघडा पडला आहे. अशा घटना दुर्दैवीच असतात. संवेदनशील समाजात अशा घटना घडू नयेत, अशीच सर्वांची अपेक्षा असते हे खरे असले, तरी बदलापूरच्या घटनेसही लाजवतील व संवेदनशील समाजास मान खाली घालावयास लावतील अशा संतापजनक, लज्जास्पद घटना महाराष्ट्रात यापूर्वीही घडल्या आहेत आणि आज संवेदनशीलपणाचे प्रदर्शन करत राज्यकर्त्यांच्या विरोधात आंदोलनांचे झेंडे फडकावणारे नेतेच त्या त्या काळात राज्यकर्ते होते, याकडे राज ठाकरे यांनी राज्याचे लक्ष वेधले तेदेखील योग्यच झाले. संवेदनशीलतेची कातडी काळानुसार बोथट किंवा जाड होते याचे सध्याच्या नक्राश्रूंच्या प्रदर्शनातून नेमके दर्शन आता घडू लागले आहे. पुराणात कुंभकर्णाची गोष्ट आहे. रावणाचा हा भाऊ प्रदीर्घ काळ निद्रावस्थेत असायचा आणि त्याला जाग आली की, केवळ खात सुटणे एवढेच काम करायचा, असे सांगितले जाते. रामासोबतच्या युद्धात एका निर्णायक क्षणी कुंभकर्णाची शक्ती वापरणे रावणास अपरिहार्य झाले, तेव्हा निद्रावस्थेत असलेल्या कुंभकर्णाच्या कानाशी शेकडो ढोलताशांचा अखंड गजर करावा लागला. त्याच्या कानाभोवती राक्षसांच्या भेसूर स्वरांचा गदारोळ माजवावा लागला, तेव्हा त्याने कूस बदलली. मात्र, कुंभकर्णाची झोप खरी होती. त्यामुळे या गदारोळानंतर त्याला जाग आली. जो खरोखरीच झोपलेला असतो, त्याला जागे करणे सोपे असते, पण झोपेचे सोंग घेतलेल्या कोणासही कितीही प्रयत्न केले तरी जागे करता येत नाही, अशा आशयाची एक म्हण आहे. कुंभकर्णाने झोपेचे सोंग घेतले नव्हते, म्हणून निर्णायक क्षणी त्याला जागे करण्यात रावणाला यश आले. सध्या महाविकास आघाडी नावाच्या विरोधकांच्या आघाडीला बदलापूरच्या घटनेचे निमित्त साधून जाग आलेली दिसत असली, तरी राज्यात यापूर्वी अशा भयानक घटना घडल्या तेव्हा हेच नेते कुंभकर्णासारखे खरोखरीच झोपले होते की त्यांनी त्या त्या वेळी झोपेचे सोंग घेतले होते, हा प्रश्न समोर येतो. शिवाय, आज हे सारे विरोधक जागे झाल्यासारखे भासवत असले, तरी त्यांना खरोखरीच जाग आली आहे की त्यांनी जागे असल्याचेही सोंग घेतले आहे, याचीदेखील शहानिशा काळासोबत होणारच आहे. कारण, बदलापूरच्या घटनेनंतरच्या राजकारणातून आता महाराष्ट्रातील अनेक लज्जास्पद घटनांचे पाढे वाचले जाऊ लागले असून त्याकडे मात्र आजचे आंदोलक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहेत. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असतानाच्या अल्पावधीच्या सरकारने अशी घटना किती संवेदनशीलतेने हाताळल्या किंवा अशा घटना घडल्यानंतर त्यांच्या सरकारने किती संवेदनशीलता दाखविली, ते आता समोर येऊ लागले आहे.




अगदी दोन-चार दिवसांपूर्वी, म्हणजे बदलापूरच्या अत्याचार प्रकरणावरून राजकारण तापलेले असतानाच, गेल्या गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयातील एका सुनावणीतून महाराष्ट्राच्या भूतकाळाचे याहूनही विदारक आणि लज्जास्पद चित्र उघडकीस आले. लक्षणीय बाब म्हणजे, या चित्राचा जो काही कालावधी या सुनावणीतून समोर आला आहे, ते पाहता, आज बदलापूर घटनेच्या विरोधात आंदोलन छेडणारे उद्धव ठाकरे हे स्वतः राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळत होते. या निमित्ताने न्यायालयाने सरकारला कानपिचक्या दिल्या, तेव्हा ठाकरे स्वतः बदलापूरच्या घटनेच्या निषेधाचा टाहो फोडत राज्याच्या संस्कृतीचा पंचनामा करत होते. ही विकृती नष्ट करण्याच्या गर्जना करत होते. ठाकरे यांना जाग आल्याचे हे चित्र चांगले असले, तरी ही जाग आहे की जाग आल्याचे सोंग आहे, अशी शंका या सुनावणीदरम्यानच्या माहितीमुळे दृढ होणे साहजिकही होते. ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात, म्हणजे २०१९ ते २०२१ या जेमतेम अडीच वर्षांत राज्यातील तब्बल एक लाखांहून अधिक महिला बेपत्ता झाल्या असून त्यांच्या शोधासाठी राज्य सरकारने काहीच केले नाही, अशी तक्रार या याचिकेद्वारे न्यायालयात करण्यात आली आहे. एका बेपत्ता मुलीच्या शोधासाठी वणवण भटकणाऱ्या अभागी पित्याने केलेल्या या याचिकेतून समोर आलेली आकडेवारी असुरक्षिततेच्या भावनेत कायमची भर टाकणारी आहे. ठाकरे सरकारच्याच काळात, राज्यातील १८ वर्षांखालील मुलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याची माहिती या सुनावणीदरम्यान सरकारी हवाला देऊन याचिकाकर्त्याकडून उघड करण्यात आली आहे. २०१९ मध्ये ४५६२, २०२० मध्ये ३३५६ तर २०२१ मध्ये ४१२९ मुले महाराष्ट्रातून बेपत्ता झाल्याची लोकसभेत देण्यात आलेली माहिती यावेळी न्यायालयासमोर सादर करण्यात आली. अशी प्रकरणे संवेदनशीलतेने हाताळण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये संबंधित यंत्रणांना आदेश दिले होते; त्याचे काय झाले, हा प्रश्नही या निमित्ताने अधोरेखित झाला आहे. राज ठाकरे यांनी नागपुरातील पत्रकार परिषदेत या माहितीचा हवाला दिला आणि आज आंदोलनासाठी रस्त्यावर उतरलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उमटले. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचार, बलात्कार, मानवी तस्करी, छेडछाड अशा असंख्य प्रकरणांची नोंद राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेच्या अहवालांतून वारंवार झालेली दिसते. उद्धव ठाकरे यांच्या सत्ताकाळातील अशा घटनांचा जाब देऊनच बदलापूरसाठी रस्त्यावर उतरणे योग्य ठरते. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक सुरक्षिततेचा हा गंभीर प्रश्न राजकारणाच्या आणि सत्तास्पर्धेच्या गर्तेत अडकून बेदखल होऊ नये, याची जबाबदारी त्यांना आता घ्यावी लागेल. तसे झाले, तर सत्ताकाळातील अशा घटनांच्या प्रसंगी झोपी गेलेल्या ठाकरे यांना तसेच महाविकास आघाडीच्या नेत्यांना आता खरोखरीच जाग आली आहे याची खात्री पटेल. अन्यथा, त्या काळी त्यांनी झोपेचे सोंग घेतले होते आणि आता त्यांनी जागे असल्याचे सोंग घेतले आहे, अशी जनतेची भावना तयार होईल. सत्तेच्या राजकारणासाठी एवढा जोरदार आटापिटा सुरू असताना जनतेच्या मनात अशी भावना बळावणे त्यांच्यासाठी हिताचे नाही.

महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. सत्तेच्या राजकारणातून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांनी कळस गाठलेला असताना, महाविकास आघाडीत नेतृत्वावरून सुरू असलेली धुसफूस लपून राहिलेली नाही. महाविकास आघाडीने मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव जाहीर करावे यासाठी ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी जोरदार आटापिटा सुरू केला असला, तरी शरद पवार गट किंवा दिल्लीपासून मुंबईपर्यंतच्या काँग्रेसी नेतृत्वाने त्याची फारशी गंभीर दखल घेतलेली नाही. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांना नेतृत्व सिद्ध करून आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवारीवर दावा करावा लागणार आहे. बदलापूरच्या घटनेमुळे आघाडीच्या हाती आलेल्या सरकारविरोधात जनमानस तयार करण्याच्या संधीचे सोने करण्याकरिता विरोधकांच्या आघाडीतील सर्वांनीच चंग बांधला असल्याने, उद्धव ठाकरे यांच्या दावेदारीलाही आव्हान तयार झाले आहे. यातून परस्परांचे दोर कापण्याचा नवा खेळ सुरू होतो. शनिवारच्या बंदच्या आवाहनानंतर न्यायालयाने दिलेल्या मनाई आदेशाचे निमित्त करून शरद पवार यांनी बंद मागे घेतल्याचे जाहीर केले. पाठोपाठ काँग्रेसचे नाना पटोले यांनीही बंदमधून अंग काढून घेतले. उद्धव ठाकरे यांनी आयोजित केलेल्या बंद आंदोलनाची हवा अशी काढून घेऊन पवार गटाने तसेच काँग्रेसने ठाकरे यांच्या नेतृत्वाची संधी साधण्याच्या प्रयत्नांनाच टाचणी लावली, असे आता बोलले जात आहे. निवडणुकीच्या काळात असे राजकारणातील डाव-प्रतिडाव चालतच राहणार. कुरघोडी, कात्रजच्या घाटाची सैर घडविण्याचे प्रयत्नही होतच राहणार. त्यात गैर नाही, पण अशा खेळात भयग्रस्त व असुरक्षिततेच्या भावनेने अगोदरच हतबल झालेल्या सामाजिक संवेदनशीलतेस वेठीस धरले जाऊ नये, एवढीच जनतेची अपेक्षा आहे.

dineshgune@gmail.com

# संवेदनशीलता हरपत चाललेली व्यवस्था चिंताजनकच

## चिंतन

प्रशांत माने, मुख्य संपादक

छत्रपती शिवरायांचा इतिहास सांगणाऱ्या महाराष्ट्रात आज महिला, मुलीच काय पण चिमुरड्याही सुरक्षित नसतील तर मग आपण छत्रपतींचा आदर्श काय फक्त जयंती आणि मिरवणुकांपुरताच घेणार आहोत का? घटनेचा अभिमान बाळगणारे आपण बाबासाहेबांच्या स्वप्नांचा चुराडा होताना पाहणार का? असा परखड प्रश्न जर आज प्रत्येकाच्याच मनाला पडत असेल तर मग खरोखरच आपण आणि आपल्या कुटुंबांचे भवितव्य किती सुरक्षित आहे, याचे चिंतन प्रत्येकानेच करणे अनिवार्य ठरणार आहे. यापेक्षा भयानक वास्तव म्हणजे घटनेने ज्यांच्यावर नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी दिलेली आहे त्या पोलिसांचे कार्य पाहता महाराष्ट्राची चिंता आणखीनच वाढवणारी स्थिती दिसून येते. याला अपवाद देखील अनेक चांगले राजकारणी, अधिकारी, पोलिस अधिकारी व कर्मचारी निश्चितच आहेत. पण एकूणच सरकारी प्रशासकीय व्यवस्था आणि पोलिसिंगचे चित्र पाहता कुठे तरी संवेदनशीलता हरपत चालल्याचेच चिंताजनक चित्र आहे. बदलापूरचा प्रकार पाहता आणि नागरिकांच्या संतापाचा उद्रेक पाहून कुठे चाललाय माझ्या शिवरायांचा महाराष्ट्र असे प्रत्येकालाच वाटणं साहजिकच आहे.

बदलापूरसारखी घटना केवळ एक आहे का तर त्याचे उत्तर नक्कीच नाही असे आहे. महिला, युवतींसह लहान मुली आणि मुलेही आजच्या महाराष्ट्रात सुरक्षित नाहीत हे भयावह वास्तव आहे. ह्युमन ट्रॉफिकिंग, महिला तस्करी आदीचे चित्र देखील भयानकच आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात महिला, युवती आणि लहान मुलांवर होणारे अत्याचार, अन्याय ही नित्यनियमाचीच बाब असल्याचे येणाऱ्या वृत्तांवरून स्पष्ट होते. मग केंद्र आणि राज्यात सरकार कोणाचे का असेना यात तसा फारसा फरक पडलेला नाही आणि पडत देखील नसल्याचे कटू वास्तव आहे. राज्यात घडणारी एखादीच घटना प्रकाशझोतात येते आणि असुरक्षिततेची भावना तीव्र झाल्याने नागरिकांचा उद्रेक देखील पहावयास मिळतो. सामान्य नागरिकांच्या चर्चेतून हेच समोर येते की, राजकारणी काय करतात याकडे तितकेसे गांभीर्याने लक्ष न देता आम्ही न चुकता मतदान करतोच की आणि पोलिस ठाण्यात काय चालते हे माहिती असून देखील कायद्याचा आदर सामान्य माणूस राखतोच. मग या सरकारला कररुपी जगण्याचा महसूल आम्ही देत असतानाही का बरे आम्ही आणि आमचे कुटुंब आज सुरक्षित नाही. सरकार आणि सरकारी यंत्रणा जर का इतक्या असंवेदशील होत असतील तर मग सामान्यांनी जगताना कोणाकडे अपेक्षेने पहावयाचे हा मोठा गंभीर प्रश्न असुरक्षित वाटणाऱ्या प्रत्येकांसमोरच आज आहे.

पोलिस ठाण्यात घटनेच्या रक्षणकर्त्या अधिकाऱ्यांसमोरच गोळीबार होतो अन् तो देखील घटनेच्या रक्षणाची शपथ घेणाऱ्या लोकप्रतिनिधीकडून होतो यापेक्षा आणखीन दुर्दैव या पुरोगामी महाराष्ट्राचे काय असू शकते. बदलापूर असो की कोलकत्ता या ठिकाणी नुकत्याच घडलेल्या अमानवी, अमानुष घटनांमुळे आई, बहिण म्हणवणाऱ्या माता-भगिनींची सुरक्षा तर सोडाच पण आज देखील तिच्याकडे एक उपभोगाचे साधन म्हणूनच पाहिले जाते आहे की काय अशी चिंताजनक भावना मनात आल्याशिवाय रहात नाही. बदलापूर घटनेत चार वर्षांच्या चिमुरड्यांवर अत्याचार झाल्यानंतरही पोलिसांनी दाखवलेल्या निर्दावलेल्या प्रवृत्तीवर दस्तूरखुद्द न्यायालयाने देखील ताशेर अधोरेखित केलेले आहेत. विशेष म्हणजे महिला पोलिस अधिकारी देखील चिमुरड्या मुलींवरील अत्याचाराच्या घटनेबाबत इतकी असंवेदनशीलता दाखवतात म्हणजे महाराष्ट्राचे पोलिसिंग आज कोणत्या थराला गेले याची भेदक कल्पना देखील करवत नसल्याचे चित्र आहे. बर यातील आणखीन चिंताजनक गोष्ट म्हणजे न्यायालयाने गंभीर ताशेर ओढले खरे; पण आता न्यायालयानेच या निर्दावलेल्या यंत्रणांवर शिक्षेचे आसूड ओढण्याची गरज प्रत्येक सामान्यांच्या मनातून व्यक्त होत आहे. बदलापूरमधील जनप्रक्षोभ सातत्याने आरोपीच्या फाशीची मागणी करताना आरोपीला आमच्या ताब्यात द्या आम्ही शिक्षा देतो असे म्हणत होता. यावरून आता लोकांचा कोणत्याच यंत्रणांवर विश्वास राहिला नाही का? अशी देखील भयावह चिंता मनाला शिवणारी आहे. बदलापूरच्या घटना काळातच अजमेरमधील एका न्यायालयाचा निकाल समोर आला. तब्बल ३२ वर्षांनंतर ६ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. विशेष म्हणजे १०० विद्यार्थिनींवर अत्याचार आणि ब्लॅकमेल केल्याचा आरोप या सहाजणांवर होता. उशिराने न्याय मिळणे देखील एकप्रकारे अन्यायच आहे. देश व राज्यातील सरकारे अनेक विकासात्मक गोष्टींवर लाखो कोटींचा खर्च करतात तो आवश्यक देखील आहे. परंतु ५ कोटी खटले प्रलंबित असलेल्या न्यायव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी देखील सरकारने गांभिर्याने कृती करण्याची आज नितांत गरज आहे. न्यायासाठी झगडणारे आज अनेकजण जग सोडून गेलेले आहेत. असे असेल तर मग या सर्व यंत्रणा कशासाठी असा भाबडा प्रश्न सामान्यांना पडल्याशिवाय राहणार नाही.

राजकारणात जेवढे गांभीर्य राजकारणी दाखवतात, भविष्यात आपलेच सरकार कसे पुन्हा सत्तेवर येईल याची दक्षता गांभीर्यपूर्वक घेतात मग मतदानाचा हक्क बजावणारी सामान्य जनता आणि तिची सुरक्षितता याबाबत सरकार आणि सरकारी यंत्रणा इतकी असंवेदनशील का? ही खरी चिंतेची आणि आत्म चिंतनाची बाब आहे.

बदलापूर घटनेनंतर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये महिला व मुलींवरील अत्याचाराच्या घटना समोर आल्या आहेत. बुलढाण्यात एका शिक्षकानेच विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. यावरूनच एकच लक्षात येते की एकदा का घटना प्रसारमाध्यमांतून येणे बंद झाले आणि घटनेची विस्मृती झाली की, कायद्यातील पळवाटांचा आधार घेत आपण वाचणार आहोत मग आपल्याला कशाची भिती असा पक्का समज असे घृणास्पद आणि मुलींचे आयुष्य उजडवणाऱ्यांचा झालेला आहे. यासाठी खरी जबाबदारी पालकांची देखील आहे की, आपल्या मुलांवर संस्कार करताना लहानपणापासूनच त्याला महिलांविषयीची आदरभावना शिकवली पाहिजे. लहानमुलांच्या मेंदूची वाढ वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंतच होते असे ऐकिवात आहे. १४ व्या वयापर्यंत जर का मुलांवर यथायोग्य संस्कार केले तर ते त्याच्यावर आयुष्यभर राहतील. वडिल आणि मुलगी तसेच आई आणि मुलगी तर बहिणी-भाऊ व बहिणी-बहिणी यांच्यातील बाँडिंग इतके मजबूत पाहिजे की, जीवनातील प्रत्येक घटना, घडामोडी ऐकमेकांना सांगितली जाईल. लहान मुले आणि मुली यांना शाळेत, क्लासला अथवा बाहेर कोणत्याही कारणास्तव पाठवताना अनोळखी माणसांबरोबर त्यांनी कसे वागावे याची देखील पालकांनी मुलांना जाण करून देणे अपरिहार्य आहे. अशा घटनांसाठी कुटुंबात कोडवर्डची भाषा वापरल्यास कोणताही मेसेज पोहचविणे शक्य होवून सजग करण्यात यश येणार हे नक्की.

एक वास्तव असे दिसून येते की, डॉक्टरसमोर प्रत्येक रुग्ण खरे बोलतो आणि काय घडले व आपल्याला काय होतय हे सांगतो. तसेच दुसरी महत्वाची व्यक्ती म्हणजे वकित होय. गुन्हेगार अथवा आरोपी जेंव्हा वकिलांकडे जातो तेंव्हा त्याला वकिलांसमोर सर्वकाही सत्य सांगणे अपरिहार्य असते किंबहुना त्याशिवाय त्याची केस लढणे वकिलांना तितकेसे शक्य नसते. मग जेव्हा आरोपी वकिलांसमोर सत्यकथन करतो आणि त्याच्या कथनात भयावहता असते त्यावेळी मात्र वकिलांनी देखील संवेदनशीलता दाखवत त्याला स्पष्ट सांगणे गरजेच की, तुला यात शिक्षा तर नक्की होणारच पण तुला खरोखर पश्चाताप असेल तर ती शिक्षा कमी होण्यासाठी प्रत्यन करू. पण शिक्षा मात्र होणारच. न्यायालयासमोर एकदा का एखादी केस सुरु झाली तर ती निकालापर्यंत कशी नित्य चालेल याची खबरदारी जर घेतली गेली तर निश्चितच अन्यायग्रस्तांना लवकरच न्याय देखील मिळणार आहे. आपली न्यायव्यवस्था आजही इतकी विश्वासार्ह आणि बळकट आहे की, सरकार व सरकारी यंत्रणांना देखील ते संवेदनशील होण्यास निश्चितच भाग पाडतील यात शंका नाही.

मो. ९८८११ ९१४४३

# शिक्षणाचा सेवायज्ञ!

**कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेद्वारा संचालित एकलव्य एकल विद्यालयातील शिक्षक-पर्यवेक्षकांचा अभ्यास वर्ग २२ ते २५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत रेशीमबाग येथील स्मृती भवनात आयोजित करण्यात आला. त्यानिमित्ताने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांचा लेख.**

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' असं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. शिक्षणाचा जेवढा जास्त प्रसार, तेवढा विकासाचा मार्ग सोपा, असं सरळ गणित आहे. या देशातील जो वर्ग जंगलांच्या सान्निध्यात राहतो, विकास पोहोचूनही शिक्षणाच्या अभावामुळे मागास आहे, आर्थिक आणि सामाजिक स्तरावरील मुख्य प्रवाहात जो वर्ग सामील नाही, अशांपर्यंत शिक्षणाचा प्रसार करण्याची गरज कालही होती आणि आजही आहे. स्व. लक्ष्मणराव मानकर गुरुजींनी हाच उद्देश डोळ्यांपुढे ठेवला आणि दलित, आदिवासी, गरीब समाजातील लहान मुलांकरिता शिक्षणाची सोय उभी केली. त्यासाठी त्यांनी अख्खे आयुष्य समर्पित केले. त्यांच्या निधनानंतर समविचारी लोकांनी एकत्र येऊन कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था स्थापन केली. आदिवासी भागांमधील एकलव्य एकल विद्यालयांच्या माध्यमातून संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील सेवायज्ञ गेली २६ वर्षे निरंतर सुरू आहे, याचे मनस्वी समाधान आहे.

नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग भारत सरकार

निसर्गाशी आपली नाळ घट्ट बांधून ठेवणारा आदिवासी वर्ग आता हळूहळू प्रगत होत आहे. सर्वांत मोठे उदाहरण द्यायचे झाले तर महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देखील आदिवासी समाजाचेच प्रतिनिधित्व करतात. प्रत्येक क्षेत्रात आदिवासी समाजातील प्रतिनिधित्व आपल्याला बघायला मिळते. तरीही शिक्षणाचा प्रसार हे कधीही न थांबणारे कार्य आहे. शहरी जीवनापासून, भौतिक सोयी-सुविधांपासून आणि माहितीच्या प्रचंड अशा प्रवाहापासून अनेक योजने दूर असलेल्या या वर्गातील नवीन पिढीमध्ये शिक्षणाचे महत्त्व रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विदर्भातील अतिदुर्गम भागांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली आणि त्याचे चांगले परिणाम आज बघायला मिळत आहेत.

गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ अशा आठ जिल्ह्यांमधील आदिवासी भागांमध्ये एकूण १ हजार ३५ एकल विद्यालये संस्थेच्या माध्यमातून चालविली जातात. आज या एकलव्य एकल विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३० हजार ३८२ एवढी आहे. यातून कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या कार्याचे यश दिसून येते. एकल विद्यालये सुरू करणे जेवढे आव्हानात्मक नव्हते, त्याहीपेक्षा जास्त आव्हानात्मक विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत आणणे होते. नक्षलग्रस्त भागांमध्ये तर शिक्षकांना वेगळ्याच आव्हानांचा सामना सुरुवातीच्या काळात करावा लागला. आज त्याच आदिवासी जिल्ह्यातील अतिदुर्गम गावांमध्ये सर्वाधिक ३४० एकल विद्यालये आहेत आणि सर्वाधिक १० हजार १२० विद्यार्थीदेखील याच भागात आहेत. आदिवासी भागांमधील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, अतिदुर्गम भागांमध्ये शिक्षणाचे वातावरण निर्माण करणे या उद्देशाने हे कार्य सुरू झाले. त्याची खऱ्या अर्थाने प्रचीती आज येत आहे.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था एक व्रत म्हणून हे कार्य करीत आहे. कुठल्याही सरकारी अनुदानाशिवाय केवळ दानकर्ते आणि नागरिकांच्या सहकार्यावर हे कार्य सुरू आहे. एखादे व्रत हाती घेतल्याप्रमाणे शाळेतील शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग काम करतोय्, ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरते. शिक्षणाच्या सेवायज्ञातील त्यांचे योगदान तेवढेच दखलपात्र ठरते. २०० ते १५०० लोकसंख्या



असलेल्या गावाची शाळेसाठी निवड करण्यात येते. त्यानंतर जिल्हा परिषद शाळेची वेळ सोडून इतर वेळी समाजभवनसारख्या सार्वजनिक ठिकाणावर शाळा भरविण्यात येते. विशेष म्हणजे गावकऱ्यांची सोय बघून सकाळी किंवा संध्याकाळी शाळेची वेळ ठरविण्यात आली आहे. शाळेसाठी शिक्षक नेमताना गावातीलच सुशिक्षित तरुणाची निवड करण्यात येते. बारावी किंवा पदवीचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला ही जबाबदारी सोपविण्यात येते. यामागे गावकरी आणि विशेषतः मुलांमध्ये अनोळखी व्यक्ती शाळेत शिकवायला येते, अशी भावना निर्माण होऊ नये, असा प्रयत्न असतो. अर्थात यातून स्थानिकांसाठी रोजगाराचेही दालन खुले होत असते. संस्थेच्या या प्रयत्नांना शंभर टक्के यश आलं आहे, हे मी आनंदाने नमूद करतो.

एकल विद्यालयात सेवा देणाऱ्या शिक्षक-पर्यवेक्षकांचा पाच दिवसांचा प्रशिक्षण वर्ग दरवर्षी नागपुरात आयोजित करण्यात येतो. त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च संस्था स्वतः करते. या प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करण्यासाठी विविध क्षेत्रांमधील नामांकित व्यक्तींना आमंत्रित करण्यात येते. उद्याचा उत्तम नागरिक घडविण्याची मोठी जबाबदारी ज्या शिक्षकांवर आहे, ते या प्रशिक्षण सत्रात अतिशय आनंदाने सहभागी होतात. यंदाही १ हजार ३५ शिक्षक आणि १३४ पर्यवेक्षक नागपुरातील प्रशिक्षण वर्गात सहभागी झाले. अतिदुर्गम भागातील नवीन पिढीला शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याच्या या कार्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यांच्या समर्पणाला अधिक प्रोत्साहन मिळावे, हाच या शिबिराचा उद्देश असतो.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे हे कार्य जितके व्यापक होईल, तेवढा आपल्या देशाचा फायदा होणार आहे. त्यामुळे या कार्याच्या मागे समाजाने सर्व सामर्थ्यानिशी उभे राहावे आणि त्यात योगदान द्यावे, असे माझे विनम्र आवाहन आहे.

## संक्षिप्त वृत्त




### ए. जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

ए.जी. पाटील तंत्रनिकेतन मध्ये ग्रंथपाल शस्त्राचे जनक डॉक्टर एस आर रंगनाथन यांच्या १३२ व्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स भारतीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी डॉक्टर सचिन सूर्यवंशी व संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉक्टर एम ए चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे प्राचार्य डॉक्टर व्ही.व्ही.पोतदार यांच्या हस्ते डॉक्टर एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून करण्यात आला. या दिनाच्या औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून विद्यार्थ्यांचे ज्ञान, लेखन व वाचन या कौशल्याचा विकास होणाच्या दृष्टीने वाचन कक्षात पुस्तक परीक्षण स्पर्धा घेण्यात आली, त्याला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामधून प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले. बक्षीसाच्या स्वरूपात रोख रक्कम, पुस्तक व प्रमाणपत्र असे देण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक आकांक्षा कुलकर्णी तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग, द्वितीय क्रमांक अस्मिता गायकवाड तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, तृतीय क्रमांक पूर्वा पाटील द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग व उत्तेजनार्थ समर्थ गुरव तृतीय वर्ष स्वील इंजिनिअरिंग व अक्षरा कोटा द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉक्टर एम. ए. चौगुले, उपप्राचार्य प्राध्यापक एस के मोहिते, ए.जी.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉक्टर व्ही व्ही पोतदार, समन्वयक एम.एम. आडम तसेच सर्व विभाग प्रमुख व शिक्षक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रस्तावना आकांक्षा कुलकर्णी व निकिता या विद्यार्थिनींनी केला. ग्रंथपाल सौ एम एम आडम यांनी पाहुण्यांचे ओळख करून दिलो. आभार सहाय्यक ग्रंथपाल एस.व्ही. कस्तुरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालय विभागातील सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### मड्डी वस्ती येथे कुमारस्वामींची जयंती साजरी

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

वारद मड्डी, भवानी पेठ येथील शिवालय येथे पपू कुमारस्वामी प्रार्थना याग मंडळाच्या वतीने कुमारस्वामी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सचिव धानप्पा अतनुरे, रेवणसिद्ध चडचणकर, निवृत्त विक्रीकर आयुक्त बी. बी. नरुणे, शिवकुमार चोळ्ळे, निर्मला लातुरे, प्रभावती किणगी, अशोक अतनुरे, सतीश जिरंकलगी गौरीशंकर अतनुरे, प्रवीण कुद्रे, बालाजी बोल्लू, रमेश मेरुगू, अभिजीत अतनुरे, अथर्व चोळ्ळे, शांताबाई मोळे, ललिता पटणे, चन्नम्मा केलूर, जगदेवी बिज्जरगी, महादेवी तेली, अप्पू स्वामी आदी उपस्थित होते. आरती झाल्यानंतर प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### नवीन आरटीओ ऑफिसजवळून दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

नवीन आरटीओ ऑफिसच्या मागे लावलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत आदम दस्तगीर मुल्ला (वय ४६, रा. होटगी गाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुल्ला यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ डीएक्स ०५७५ ही नवीन आरटीओ ऑफीसच्या मागे हॅण्डल लॉक करून पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

### भास्कर गाढवे यांचे निधन



**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

येथील अलिपूर रोड येथील रहिवासी सेवानिवृत्त कलाशिक्षक भास्कर भगवान गाढवे (वय ८९) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी रात्री ८ वा. निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी सकाळी मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिवशक्ती को-ऑप. बँक, मातृभूमी प्रतिष्ठानचे संचालक व मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. किरण उर्फ प्रफुल्ल गाढवे यांचे ते वडील होत.

# मंद्रुपच्या एका वॉर्डासाठी तब्बल ८५ लाख निधी

## आ. सुभाष देशमुख यांच्या सहकार्याने मंद्रुपचा विकास

### ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ ऑगस्ट-**

आमदार सुभाष देशमुख यांच्या सहकार्यामुळे मंद्रुपचा विकास झाला असून वॉर्ड क्रमांक एक मध्ये ८५ लाख रूपयांची विकासकामे सुरू आहेत. मंद्रुपच्या विकासात आमदार देशमुख यांचा मोठा वाटा असल्याची माहीती वॉर्ड क्रमांक एकचे ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे यांनी दिली.

जोडमोटे म्हणाले की, ग्रामपंचायतीवर भाजपची सत्ता असताना कोट्यवधीचा विकासनिधी मिळाल्याने मंद्रुपमधील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे. काँक्रीट रस्ता व बंदिस्त गटारमुळे अस्वच्छतेचे प्रमाण कमी झाले आहे. शिवाय मंद्रुप मॉडेल गाव बनविण्यासाठी आ. देशमुख प्रयत्नशील असून मंद्रुपच्या विकासासाठी मागेल त्या कामांना विकासनिधी देत आहेत. आ. देशमुख यांनी जनसुविधा व २५/१५ अंतर्गत वॉर्ड क्रमांक एकमध्ये भाजपच्या नेत्यांच्या पाठपुराव्यामुळे सकळेश्वर मंदिर सभामंडप १० लाख, काँक्रीट रस्ता नवले घर ते जोडमोटे घर १५ लाख, पाचवे दुकान ते मुगळे घर १५ लाख, विठ्ठल मंदिर ते म्हेत्रे घर १० लाख, मेनरोड ते ख्याडे घर १५ लाख, नायकोडे घर ते कामगोंडे घर १० लाख, माळी गल्ली बहुउद्देशिय सभागृह ते नंदुरे घर ५ लाख अशा विविध कामांसाठी ८५ लाख रूपयांची विकासनिधी मिळाल्याने वॉर्ड क्रमांक एक मॉडेल वॉर्ड बनल्याचे जोडमोटे यांनी सांगितले.

# मंद्रुप सीतामाई तलाव ओव्हरफ्लो

## कालव्याचे पाणी मागणाऱ्या शेतकऱ्यांवर आता पाणी नको म्हणण्याची वेळ



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ ऑगस्ट-**

मघा नक्षत्राच्या पावसाने सीतामाई तलाव परिसरात दमदार हजेरी लावल्याने चार दिवसांतच सीतामाई तलाव ओव्हरफ्लो झाला आहे. आठ दिवसांपूर्वी कालव्याचे पाणी तलावात सोडण्याची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर कालव्याचे पाणी नको म्हणण्याची वेळ आली आहे . तलाव ओव्हरफ्लो झाल्याने पाण्यामुळे अनेक शेतात पाणीच पाणी दिसून येत आहे.

आठ दिवसापूर्वी मंद्रुप परिसरात सीतामाई तलावात पंचवीस टक्के पाणीसाठा असल्याने तलावात कालव्याचे पाणी सोडण्यासाठी शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींमार्फत पाठपुरावा केला. शेतकऱ्यांची मागणी नसतानाही उजनी धरणातील अतिरिक्त पाणीसाठा कालव्यात सोडण्यात आल्याने खरीप पिकांना पाण्याचा फायदा झाला नाही. शिवाय कालव्यात जास्त दाबाने पाणी सोडल्याने सीतामाई तलावात पाणी सोडून तलाव भरण्यासाठी शेतकऱ्यांची मागणी होती. अखेर पाटबंधारा विभागाने शेतकऱ्यांच्या मागणीनुसार तलावात पाणी सोडले. बंदिस्त पाईपद्वारे पाणी तलावात सोडण्यात आले. मात्र रविवारपासून मघा नक्षत्राने दमदार हजेरी लावल्याने बांधा भरून वाहू लागले. त्यामुळे तलाव परिसरातील पाणी तलावात मोठ्या प्रमाणात आल्याने चार दिवसांतच सीतामाई तलाव ओव्हरफ्लो झाला आहे. तलाव ओव्हरफ्लो झाल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या पाण्याचा फायदा मंद्रुप, कुरघोट व माळकवठे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत झाली आहे.

### पाठपुराव्याला यश

कालव्याचे पाणी सीतामाई तलावात सोडण्यासाठी आ. सुभाष देशमुख व एमके फाउंडेशनचे महादेव कोगनुरे यांनी पाठपुरावा केला होता. तलावात पाणी आल्याने आ. देशमुख व एमके फाउंडेशनचे कोगनुरे यांनी समाधान व्यक्त केला आहे.

सीतामाई तलाव मंद्रुप परिसरातील शेतकऱ्यांसाठी वरदान आहे. या तलावातील पाण्यामुळे बागायती क्षेत्र वाढून शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती होत आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचा योग्य वापर करून आधुनिक पद्धतीने शेतीत प्रगती करावी.
**-महादेव कोगनुरे,** अध्यक्ष, एमके फाउंडेशन

मात्र तलाव ओव्हरफ्लो झाल्याने सांडव्यातून तीन दिवसांपासून पाणी वाहत आहे. त्यामुळे तलाव परिसरातील शेती पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे उडीद, तूर, मूग, भुईमूग, ऊस, सोयाबीन आदी पिके पाण्यात थांबल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे.

# श्री विठ्ठल मूर्ती संरक्षण महोत्सवात विठ्ठल भक्तीचा जागर

## पंढरीतून टाळ-मृदंगाच्या गजरात श्री विठ्ठलाच्या पादुका देगावकडे रवाना; चेअरमन अभिजीत पाटील यांच्या हस्ते महाआरती, पादुका पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ ऑगस्ट-**

पंढरपुरात मागील २० वर्षांपासून विठ्ठल मूर्ती संरक्षण दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. गुरुवार २२ऑगस्टपासून देगाव येथे महोत्सवाचे आयोजन अभिजित पाटील मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले असून विविध महाराज मंडळीचे कीर्तन, भजन, भारूडाचे आयोजन करण्यात आले आहे, तर आज संत नामदेव पायरी येथे टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल पादुकांचे प्रस्थान देगावकडे झाले.

यावेळी चेअरमन अभिजित पाटील यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची महाआरती करुन पादुका पूजन करण्यात आले. श्रावण वद्य पंचमी या दिवशी हा कार्यक्रम साजरा करण्यात येत असतो. त्याप्रमाणे मोठ्या उत्सहात देगाव येथे कार्यक्रम पार पडतो. या सोहळ्याला देगाव येथील पाटील कुटुंबातील सर्व सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धर्मांध मुस्लीम राजा औरंगदेब यांने हिंदू धर्मातील सर्व देवस्थाने उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न चालविला होता. अफजलखानाने राज्यावर स्वारी चालवत ही मोहीम आखली होती. यामध्ये पंढरीच्या विठ्ठल मंदिराचाही समावेश होता. यामुळे त्यावेळचे थोर विठ्ठल भक्त प्रल्हाद महाराज बडवे यांनी विठ्ठल मूर्तीचे संरक्षण करण्यासाठी देगाव येथील हभप सूर्याजी घाडगे-पाटील यांना विनंती केली होती. त्यामुळे ती मूळमूर्ती देगाव येथील पाटील यांच्या शेतातील विहिरीत लपवून ठेवली होती तर काही दिवस घरातील तळघरात ठेवून नित्योपचार सुरू होते. यामध्ये इस २ ऑक्टोबर १६९५ ते १३ ऑक्टोबर १६९९ या काळात या मूर्तीचे पाटील कुटुंबीयांनी संरक्षण केले होते. परकीय आक्रमक काळात श्री विठ्ठल देगाव येथे वास्तव्यास होते.




# शिक्षण घेणाऱ्यांच्या तुलनेत रोजगाराच्या संधी कमी

## दशरथ गोप; बुर्ला महाविद्यालयात कॅम्पस मुलाखत उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

शिक्षण घेणाऱ्यांच्या तुलनेत आज रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध आहेत हे खरे असले तरी ज्यांच्याकडे वैशिष्ट्येपूर्ण कौशल्य आहे त्यांना नोकऱ्या मिळू शकतात आणि अशा युवक व युवतींना रोजगार मिळावा हे विचारात घेऊनच टीसीएस बीपीएस कॅम्पस २०२४-२५ हा कॅम्पस मुलाखत उपक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी होते.

ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये टीसीएस बीपीएस कॅम्पस २०२४-२५ हा कॅम्पस मुलाखत हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दशरथ गोप बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम होते. व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. टी.एन. शिंदे, रोहन कुर्री, टीसीएस कंपनीचे विशाल रामपल्ले, अमरेश कुंभार रोहित फुगे, संस्थेचे विश्वस्त श्रीधर चिट्ट्याल, विजयकुमार गुल्लापल्ली उपस्थित होते. ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी यावेळी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. गायत्री बेनगिरी यांनी केले. यावेळी रोहन कुर्री यांनी कॅम्पस इंटरव्यू घेण्यामागीचा हेतू स्पष्ट केला. सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री पाटील यांनी केले.

### दुचाकीच्या धडकेत एकजण गंभीर जखमी

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

दुचाकीच्या धडकेने दुचाकीवरील तरूण जखमी झाला. याबाबत मो.शोएब नजीर अहमद सय्यद (वय ३६, रा. कोहिनूर अपार्टमेंट जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात महिलेविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुल्ला हे त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच १३ एआर ४३०० यावरून व्हीव्हीपी कॉलेज येथून विजापूर नाका पोलीस ठाण्याकडे जात असताना एका अज्ञात महिलेने तिच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक केए ५१ जेडी ६२२३ ही दुचाकी विरुद्ध दिशेने व निष्काळजीपणाने चालवून मुल्ला यांना धडक देऊन गंभीर दुखापत करून जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

## श्रावणमास प्रवचनमाला - १९

# संसारातून मुक्त झालेला महात्मा म्हणजेच संत होय

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ ऑगस्ट-**

संत एकनाथ महाराजांचे जीवन हे भक्ती, ज्ञान आणि वैराग्याने युक्त आहे. नाथ महाराजांचा प्रपंच हा लोकप्रपंच वाटत असला तरी अंतरंगाने त्यांचा प्रपंच विलक्षण स्वरुपाचा म्हणून पाहिला जातो. त्यांचा प्रपंच सकारणयुक्त आहे. नाथ महाराज निर्विकार आणि शांत आहेत. प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या अधिष्ठानावर आधारित नाथांचा प्रपंच आहे, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. ते आज संत एकनाथ महाराजांच्या जीवन चरित्राचे निरुपण करीत होते.

**अन्तर्नैराश्यमादाय**
**बहिराशोन्मुखेहित:।**
**बहिस्तप्तान्तराशीतो**
**लोके विहर राघव।।**

वसिष्ठ ऋषी रामाला सांगतात, जगात रहावं कसं? जगामध्ये पामर, मुमुक्षू आणि मुक्त असे तीन प्रकारचे लोक आहेत. अध्यात्माचे काही देणंघेणं नसलेला; संसारात अखंड रमलेला तो 'पामर' होय. परमार्थाकडे ओढ असलेला प्रपंचातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणारा तो 'मुमुक्षू' आणि संसारातून पूर्णतः बाहेर पडलेला मनुष्य हा 'मुक्त' होय. संसारातून मुक्त झालेला हा महात्मा म्हणजे संत होय. संत नामदेव महाराज-नरसी, संत माणकोजी महाराज-धामणगाव, संत कान्होपात्रा-मंगळवेढा, संत जळोजी-मळोजी महाराज- उदगीर, संत हरिबाबा महाराज-लोहगाव, संत गुलाबराव महाराज-अमरावती, संत मुक्ताबाई-आपेगाव यांना मुक्तावस्था प्राप्त झाली होती, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज यांनी सांगितले.

संत एकनाथ महाराजांना आता प्रपंचातील कोणत्याही प्रकारची आशा-अपेक्षा राहिलेली नाही. त्यांना प्रपंचाचे कोणतेही बंधन वाटत नाही. म्हणून, नाथबाबांचा प्रपंच हा मुक्तच आहे. म्हणजेच बाहेरुन आशावादी वाटत असले तरी आतून ते निरपेक्ष भावनेत असतात. नाथांच्या अंगी वैराग्य हा गुण सांगताना महाराज म्हणतात, ज्यांच्या अंगी त्यागाची वृत्ती आहे, ते नाथ महाराज होत. नाथांचे वैराग्य हे विवेकपूर्ण होते.

पुढे नाथांना मिळत असलेली प्रसिद्धी पाहून पैठणमधील काही लोकांना द्वेष वाटू लागला. एकदा एक सुंदर स्त्री नाथांच्या कीर्तनास येऊन बसली. तेव्हा, त्या कुडाळ लोकांनी तिच्यावर लक्ष ठेवण्याचे ठरवले. पुढे ती सुंदर स्त्री नाथांच्या दररोजच्या पुराण कथेला येऊ लागली. त्या कुडाळ लोकांचा संशय वाढत चालला. शेवटी त्यांनी तिच्यावर लक्ष ठेवले. ती स्त्री जेव्हा पुराण श्रवणानंतर नाथवाड्यातून बाहेर पडते, तेव्हा ती कोठे जाते? म्हणून तिच्या मागोमाग ते लोक गेले तर ती गोदावरी नदीच्या तीरापर्यंत जाऊन लुप्त झाली. मग, लोकांच्या लक्षात आले की, ही स्त्री सामान्य स्त्री नसून साक्षात गोदावरी म्हणजे गंगा आहे.

सर्वजण नाथांकडे जाऊन क्षमायाचना करतात. तेव्हा, नाथांना आश्चर्य वाटले की, मी पुराण कथेत अशी सुंदर स्त्री बघितलीच नाही. नाथबाबा कधीही स्त्री-पुरुष असा भेदभाव मानत नव्हते.

**आत्मत्वाचें ठायीं सर्व एकाकार।**
**नाहीं नारीनर भेद भिन्न।।**
**वर्णाश्रम धर्म जाति कुलगोत।**
**एकाकारी होत आत्मतत्त्वीं।।**
**सदोदित पाहे सर्वाठायीं आहे।**
**एका जनार्दनीं सोय धरी त्याची।।**

नाथबाबांसाठी कोणी लहान नाही, कोणी थोरही नाही; श्रीमंत नाही अन् गरिबही नाही. सर्वांना समतेच्या भावनेतूनच पाहत आहेत. नाथ महाराज त्या कुडाळ लोकांना म्हणतात, भाग्यवान आहात तुम्ही! तुम्हाला गंगामातेचे दर्शन झाले!! आत्मदृष्टी उत्पन्न झालेले नाथ महाराज आहेत. परमार्थ काय असतो? हे नाथांच्या 'चिरंजीवीपद' या ग्रंथातून कळते. साधकांनी स्वत:ला कसं जपावं? असे अनेक उपदेश या ग्रंथात केलेले आहेत, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज श्रोत्यांना मार्गदर्शन करतात.

# उत्तर तहसीलतर्फे अंतर्गत मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घेण्यात येत आहे. याअंतर्गत २५ ऑगस्ट रोजी शहर उत्तर व शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील सर्व बीएलओ हे बीएल यांच्यासोबत या परिसरात सर्व्हे करुन नवीन मतदार नोंदणी व मयत दुबार स्थलांतरित मतदार वगळणी करणार आहेत.

मतदार नोंदणीसाठी नमुना ६ भरण्यासाठी आवश्यक कागदपत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे. मतदाराचा पासपोर्ट आकारातील फोटो (फोटोच्या मागील बाजूस व्हाईट बॅकग्राऊड असावे) व मतदाराचे जन्म तारखेचा पुरावा असावा. जन्म दाखला, आधारकार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, दहावी, बारावी बोर्ड सर्टिफिकेट ज्यावर जन्म तारीख नमूद असावी, जन्म तारीख नमूद असलेला अन्य कोणताही पुरावा. रहिवासाच्या पुराव्यासाठी बँक, पोस्ट ऑफिस करंट पासबुक, रेशन कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन, इनकम टॅक्स असेसमेंट ऑर्डर, भाडे करारनामा, पाणी, दूरध्वनी, लाईट, गॅस कनेक्शन बिल, अर्जदाराचे नावे पोस्ट विभागामार्फत पोहोच झालेले कोणतेही पत्ता नमूद केलेले कागदपत्र आवश्यक आहेत.

# सोलापूरच्या बाजारात पुण्याच्या कांद्याचाच बोलबाला

## सोलापूर बाजार समितीत जुना कांदा खातोय भाव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या दोन दिवसात कांद्याच्या दरात अचानक वाढ झाली. सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांचा कांदा अद्याप शेतातच आहे. कांदा काढायला वेळ आहे. मात्र, पुण्याच्या जुन्या कांद्याला सोलापुरात चांगला भाव मिळत आहे. सोलापूर बाजार समितीत पाच हजार रुपयांचा घाऊक दर शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे सोलापूरच्या बाजारात पुण्याच्या कांद्याचाच बोलबाला दिसत आहे.

दरम्यान सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक वर्षभर मोठ्या प्रमाणात असते. राज्यात कांद्याची दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ म्हणून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला ओळखले जाते. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील कांदा व्यापाऱ्यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, मागील वर्षभरात तब्बल ८० लाख क्विंटल कांद्याची आवक झाली. त्यामुळे सोलापुरात कांदा महाबँक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सोलापूर बाजार समितीत सोलापूर जिल्ह्यासह, पुणे, अहमदनगर, विजयपूर, गुलबर्गा आदी जिल्ह्यांतून कांदा विक्रीसाठी येतो. यंदा जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात झालेली आहे. अनेक शेतकऱ्यांनी बारा महिने कांद्याची पेरणीच केली आहे. त्यामुळे येणाऱ्या हंगामात कांद्याची आवक मोठी असण्याची शक्यता आहे. सध्या सोलापूर बाजार समितीत कांद्याची आवक कमी आहे. मुळात सोलापूर जिल्ह्यात कांदा मे किंवा जास्तीत जास्त जूनपर्यंत विकला जातो. त्यानंतर आपल्याकडील कांदा व्यवस्थित राहत नाही.



### कांद्याचे दर वाढले तर खर्च वजा जाता उत्पन्न मिळेल

आम्ही बारा महिने कांद्याची लागवड करतो आहे. पुण्यापेक्षा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याला चांगला दर मिळतो.त्यामुळे सोलापूर बाजार समितीमध्ये नेहमी कांदा विक्रीसाठी आणत असतो. येणाऱ्या काळात आवक घटल्यास कांद्याचे दर आणखीन वाढतील आणि त्यामुळे खर्च वजा जाता उत्पन्न हातात मिळेल.
**- बळी काडे, शेतकरी**

### वाढलेल्या दराचा फायदा पुण्यातील शेतकऱ्यांना होणार

सध्या पुणे, अहमदनगर जिल्ह्यांतून कांद्याची आवक सुरू आहे. सरासरी १०० ते १५० ट्रक इतका कांदा आता पावसाळ्यात सुरू आहे. मागील दोन दिवसात अचानक दरात वाढ झाली आहे.निर्यातबंदी उठवल्यानंतर कांद्याला सरासरी पाच हजारांपर्यंत दर मिळत होता. मात्र, मागील दोन दिवसात सोलापुरातील दर पाच हजारांपर्यंत पोहोचला आहे. सरासरी दरही चार हजारांपर्यंत आहे. मात्र, या वाढलेला दराचा फायदा पुण्यातील शेतकऱ्यांना होणार आहे.
**- सादिक बागवान,** कांदा अडत व्यापारी, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

## संक्षिप्त वृत्त



### युवा शक्तीच्या प्रगतीसाठी रॅगिंगवर आळा घालणे आवश्यक ॲड : सरोजनी तमशेट्टी

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

विद्यार्थिनींनी कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. कारण युवकांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळावे. म्हणून रॅगिंग विषयक कायद्याची तरतूद करण्यात आली आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सरोजनी तमशेट्टी यांनी केले. ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अँटी रॅगिंग कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अँटी रॅगिंग सप्ताहनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अँटी रॅगिंग डे प्रसंगी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तुकाराम ना. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, व प्रा. सुरेखा बत्तुल उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलाने करण्यात आले. प्राचार्य डॉ. तुकाराम ना. शिंदे म्हणाले की, विद्यार्थी जीवनात कमीत कमी चुका करण्याचा आपण प्रयत्न करावा. कारण समाज चुकांवर बोट ठेवत असतो. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रंजना बनसुडे तर प्रास्ताविक प्रा. सुरेखा बत्तुल यांनी केले. आभार प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी मानले.



### कुमठा नाका येथील बालाजी मूकबधिर, मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

मुमताज नगर कुमठा नाका येथील बालाजी मूकबधीर व मतिमंद शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना माजी नगरसेविका राजश्री चव्हाण, भाजपाचे जेष्ठ समाजसेवक अनिल चव्हाण यांच्या वतीने गणवेश वाटप करण्यात आले. प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.अध्यक्षस्थानी श्री स्वामी समर्थ अपंग सेवा मंडळाच्या सचिवा एल.के. इटकर तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श माजी नगरसेविका राजश्री चव्हाण व गिताताई पाटोळे या होत्या. संस्था सदस्य श्रीनिवास इटकर, मुख्याध्यापक शामराव वाघमारे, अरविंद कुलकर्णी, इरफान चौधरी उपस्थित होते. गिताताई पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना सुखरूप सेवा देणारे रिक्षाचालक अशोक गुतीकॉंडा व कटारे तसेच रेहमान त्याचबरोबर पालकांचा दिव्यांग विद्यार्थ्यांसह सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन भगवान चौगुले, आभार सुरेश इटकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी दिकॉंडा, अजित पवार, विजय साळुंखे, म. इक्बाल जमादार इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




### पिलीव मंडलात तीन नवीन मतदान केंद्रे

**पिलीव, दि. २४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव मंडल विभागातील बीएलओची बैठक मंडल अधिकारी विजय एकतपुरे यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविणयात आली होती. यावेळी सुळेवाडी व काळमवाडी या दोन गावात मतदान केंद्राची संख्या वाढली आहे. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये म्हणून निवडणूक आयोगाने नवीन मतदार नोंदणीचे काम हाती घेतले आहे. तालुक्यातील काही ठिकाणच्या मतदान केंद्राच्या ठिकाणात बदल करणयात आला आहे. पिलीव मंडल विभागात तीन नवीन मतदान केंद्रे निर्माण करण्यात आली आहेत. पिलीव मंडलात सुळेवाडी २१०, काळमवाडी ३१५ व पिलीव येथे तीन मतदान केंद्रे वाढली आहेत. अतिम मतदार यादी ३० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. सर्व बीएलओनी जास्तीत जास्त नवीन मतदानाची नोंदणी करावी. लोकसभा निवडणुकीत अनेक मतदारांची नावे मृत, गैरहजर व स्थलांतरित प्रकारातून वगळणयात आली होती, याची बीएल ओनी घरोघरी जाऊन फेरतपासणी करावी. चुकून वगळलेल्या नावासाठी ६ नंबर फार्म भरुन नावे यादीत समाविष्ट करावित.सर्व मतदारांना बंद झालेल्या केंद्राविषयी सविस्तर माहिती द्यावी, अशी सूचना यावेळी मंडलाधिकारी एकतपुरे यांनी बीएलओंना दिल्या. यावेळी पिलीव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, कोळेगाव या गावातील बीएलओ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दर्शनाळमधील १२ जणांना मिळाल्या शिधापत्रिका

**अक्कलकोट, दि. २४ ऑगस्ट-**

दर्शनाळचे ग्रामपंचायत सदस्य आकाश पाराप्पा माने यांच्या प्रयत्नातून गावातील गरजू १२ व्यक्तींना शिधापत्रिका मंजूर करून १५ ऑगस्ट दिवशी त्यांना रेशन वाटप करण्यात आले. त्यामुळे त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रगतीशील शेतकरी अप्पू विभूते, पंढरी माने, शाहू माने, सुभाष माने, जीवन माने, मिलिंद तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांसह दीक्षा भूमी महिला बचत गटाच्या सदस्य उपस्थित होते.

# बदलापूर घटनेचा मूक संताप

## आरोपीला फाशी देण्याची मागणी; सरकारच्या भूमिकेबाबत जिल्ह्यात संताप, सर्वस्तरातील नागरिकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

**बदलापूर येथील घटनेचा निषेध करण्यासाठी पुकारण्यात आलेल्या भारत बंदला न्यायालयाने बेकायदेशीर ठरविले. तरीही महाविकास आघाडीसह विरोधी पक्ष आणि सर्वस्तरातील नागरिकांनी मूक निषेध व्यक्त केला. आरोपीला फाशी देण्याची मागणी करण्याबरोबरच सरकारच्या भूमिकेबाबत संताप व्यक्त केला.**



### टेंभुर्णीत काळ्या फिती लावून मूक आंदोलन

**टेंभुर्णी, दि. २४ ऑगस्ट-**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन अल्पवयीन शालेय बालिकेवर लैंगिक आत्याचार केल्याप्रकरणी व पोलीस प्रशासनाने संशयित आरोपीवर कारवाई करण्यास दिरंगाई केल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने करमाळा चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यासमोर बसून काळ्या फित लाऊन मूक निषेध आंदोलन करण्यात आले.

या निषेधार्थ टेंभुर्णी शहरातील व परिसरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी सर्वांनी तोंडाला काळी फित व काळे झेंडे हातात घेऊन या घटनेचा शांततेत निषेध नोंदवला.घडलेल्या घटनेच्या विरोधात शहारातील बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. सरकारच्या विरोधात मागण्याचे निवेदन टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे एपीआय गिरीश जोग, पोसई राजेंद्र डांगे यांना देण्यात आले. या मूक निर्दशनात शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख मधुकर देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष औदुंबर देशमुख, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, टेंभुर्णीचे माजी सरपंच प्रमोद कुटे, टेंभुर्णी शिवसेना शहर प्रमुख सुरेश लोंढे यांनी निषेध व्यक्त केला. आरोपीला फाशीची शिक्षेची मागणी केली. यावेळी शिवसेनेचे अमोल धुमाळ, पप्पू पवार, टेंभुर्णी गट प्रमुख भीमराव नांगरे, टेंभुर्णी शहर उपाध्यक्ष प्रशांत सोणवणे, संतोष खैरमोडे, युवा सेनेचे किशोर देशमुख, आझाद फाउंडेशनचे



अध्यक्ष अझीज शेख, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सचिन खुळे, सचिन जाधव, चेअरमन विलास देशमुख, रमेश देशम ुख, समाधान महाडिक-पाटील, बाबा म हाडिक, वडार समाजचे भीमराव बंडगर, जयवंत कोळपे, तेजेस निंबाळकर, संदीप कुटे, काका डावरे, सतीश पवार, नवनाथ महाडिक, दीपक भोसले, सुनील माने, चंद्रकांत कोठावळे, रवींद्र बेंद्रे, संदीप शिंदे, पांडुरंग देशमुख, रणजीत पवार, हनुमंत दिघे, सचिन देशमुख, रमेश चोपडे, प्रवीण जाधव, इम्तियाज सय्यद, सोमनाथ चांदगुडे, दत्तात्रय खडके आदी उपस्थीत होते.

### सांगोल्यात महाविकास आघाडीकडून निदर्शने

**सांगोला, दि. २४ ऑगस्ट-**

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ सांगोल्यात महाविकास आघाडीकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील प्रांगणात काळे झेंडे फडकवत व काळ्या फीती बांधून निदर्शने करण्यात आली.

यावेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांनी मनोगतात बदलापूर येथील घडलेल्या घटनेचा व सरकारचा निषेध व्यक्त केला. याप्रसंगी महाविकास आघाडीचे बाबुराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब देशमुख, सूर्यकांत घाडगे, अरविंद पाटील, डॉ. धनंजय पवार, कमरुद्दिन खतीब, सुभाष भोसले, गोरख यजगर, तुषार इंगळे, शंकर मेटकरी, सौरभ चव्हाण, दत्तात्रय चव्हाण, संतोष चव्हाण, रघुनाथ ऐवळे, बाळासाहेब बनसोडे, सुरेश पारसे, सिद्धू पवार, दत्तात्रय होनमाने, तानाजी गोडसे, चंदन जाधव, सुरेश गाडेकर, शफी इनामदार, राजू मगर, सुशील गवळी, अस्लम मुलाणी, संतोष खडतरे, संतोष टाकळे उपस्थित होते.

### न्यायालयाने आरोपीला तात्काळ शिक्षा द्यावी : माजी मंत्री म्हेत्रे

**अक्कलकोट, दि.२४ ऑगस्ट-**

महाविकास आघाडीचा संप ज्या तत्परतेने न्यायालयाने बेकायदा ठरविला. त्याच तत्परतेने बदलापूर घटनेतील आरोपीला एका महिन्याच्या आत शिक्षा ठोठावून लोकांच्या मनातील भावना पूर्ण कराव्यात, अशी मागणी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी केली.

बदलापूर येथे घडलेल्या घृणास्पद घटनेबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी




महाविकास आघाडीच्या वतीने शनिवारी मूक आंदोलन करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. एव-न चौकातील हुतात्मा स्तंभासमोर माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली तोंडावर काळी पट्टी बांधून निषेध व्यक्त करण्यात आला. सुमारे दोन तास महाविकास आघाडीच्या वतीने ठिय्या मारून मूक आंदोलन केले. यावेळी जि. प. चे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बंदेनवाज कोरबू, शहराध्यक्ष राम जाधव, माजी नगरसेवक अश्पाक बळोरगी, बाबासाहेब पाटील, आनंद बुक्कानुरे, मल्लिकार्जुन काटगांव, प्रथमेश म्हेत्रे, आनंद बुक्कानुरे, राम जाधव, काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा शितल म्हेत्रे, सिद्धार्थ गायकवाड, रामचंद्र समाणे, लाला राठोड आर्दीसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### पंढरपुरात काळ्या फिती लावून निदर्शने

**पंढरपूर, दि. २४ ऑगस्ट-**

बदलापूर येथील घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने बंद मागे घेत मूक आंदोलन करीत काळ्याफिती लावून निषेध व्यक्त केला त्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथेही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, काँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन केले.

साईनाथ अभंगराव यांनी राज्य सरकार तसेच गृह विभागाच्या अनास्थेवर संताप व्यक्त करीत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली तर जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे यांनी राज्यात अनेक घटना घडल्या असल्याचे सांगत गृह विभाग बघ्याची भूमिका घेत असल्याने या घटनेचा निषेध व्यक्त केला. यावेळी तालुकाप्रमुख बंडू घोडके, शहर प्रमुख रवी मुळे, सुधीर अभंगराव, सिद्धेश्वर कोरे, काकासाहेब बुरांडे, किरण घाडगे, विनय वनारे, सचिन बंदपट्टे, उत्तम कराळे, अर्जुन भोसले, कल्याण कदम, अनिल रोंगे, अनिल कांबळे, ॲड. पूनम अभंगराव, संगीता पवार, पूर्वा पांढरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




# उत्तरचे पाणी मोहोळला देण्याच्या निर्णयाला विरोध

## शिवसेना उबाठा आक्रमक पवित्र्यात; तीव्र आंदोलन करण्याचा पौळ यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

शिरापूर उपसा सिंचन योजनेमधून उत्तर सोलापूर तालुक्याच्या हक्काचे पाणी मोहोळ तालुक्यामध्ये घेऊन जाण्याचा जो शासनाने घेतलेला निर्णयाचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे संजय पौळ यांनी निषेध व्यक्त केला आहे.

उत्तर सोलापूर तालुका हा सततचा दुष्काळी तालुका असल्यामुळे या तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला पाहिजे, यासाठी शिवसेनेचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या योजनेला मंजुरी दिली असून तालुक्याला पाणी मिळावे यासाठी तालुक्यातील जनतेने अनेक वर्षे आंदोलने केली. विविध स्तरावर मागणी करून योजना मार्गी लागली आणि योजना शेवटच्या टप्प्यात असताना व पाणी दृष्टीपथात असताना हे सरकार मोहोळ तालुक्यासाठी पाणी पाळवण्याचा दुर्दैवी निर्णय घेत असेल तर हा दुर्दैवी निर्णय हाणून पडल्या शिवाय राहणार नाही, असा इशाराही पौळ



यांनी दिला आहे. अशा पद्धतीने मोहोळ तालुक्यातील एखाद्या वजनदार नेत्याला खुष करण्यासाठी आ. यशवंत माने यांच्या काळात जर निर्णय होत असेल तर या विरोधात शिवसेना पक्ष प्रमुख यांच्या शिकवणुकीप्रमाणे शेतकऱ्यांच्या हितरक्षणासाठी शिवसेना संपर्क प्रमुख अनिल कोकीळ व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्या आदेशानुसार रस्त्यावर उतरून शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलनाचा लढा उभारला जाईल. मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी पाण्याची आवश्यता असेल तर स्वतंत्र मान्यता घेऊन पाणी न्यावे; परंतु उत्तर तालुक्याच्या हक्काच्या पाण्याला हात लावू नये, अशी मागणी पौळ यांनी केली आहे.

**तर विधानसभेला धडा शिकवू**

उत्तर तालुक्याच्या हक्काच्या एका थेंबाला जरी हात लागला तर उत्तर तालुक्यातील शेतकरी येत्या विधानसभा निवडणुकीत धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. त्याचबरोबर तालुक्यातील कोंडी व साखरेवाडी गावाला पाण्याची गरज असताना त्यांना पाणी देणे तर सोडाच परंतु आहे हे पाणी मोहोळ तालुक्याला पळवण्याचा घाट कदापी यशस्वी होऊ देणार नाही, असेही पौळ यांनी सांगितले.



### मुलींच्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत बार्शीचे शिवाजी महाविद्यालय प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

वैराग येथील विद्यामंदिर हायस्कूलमध्ये पार पडलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी या संघाच्या १९ वर्षे वयोगटातील मुलींनी तालुक्यामध्ये अंतिम सामन्यात शेळगाव जुनिअर कॉलेज या संघाचा तब्बल २६ गुणांनी पराभव करीत तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. सर्व विजयी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य संजय पाटील यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पंढरपूरच्या माजी नगराध्यक्षांची नवी रणनिती

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यास उत्सुक, जयंत पाटलांची घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ ऑगस्ट-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष साधना भोसले यांना पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी म्हणून शिष्टमंडळाने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतली आहे. यामुळे आता पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात इच्छुक उमेदवारांची संख्या वाढू लागली असल्याचे दिसू लागले आहे.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित केले, त्यांनी राजकीय खेळी करून सोलापूर व माढा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी केले. यामुळे जिल्ह्यात महाविकास आघाडीची ताकद वाढली आहे. यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळावी म्हणून अनेक पक्षातील नेते मंडळी शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी करत आहे. काही दिवसांपूर्वी माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या कट्टर समर्थकांनी बार्शी येथे जाऊन शरद पवार यांची भेट घेऊन परिचारिकांना उमेदवारी मिळावी अशी मागणी केली होती. त्यातच आता पंढरपूर नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष साधना भोसले या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. त्यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी म्हणून शिष्टमंडळाने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन उमेदवारी मिळावी अशी मागणी केली आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात विद्यमान आ. समाधान आवताडे यांनी पुन्हा निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. माजी आ. प्रशांत परिचारक, विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके हेदेखील निवडणूक लढविण्यावर ठाम अहेत. मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांची उमेदवारी तर दस्तुरखुद्द राज ठाकरे यांनीच जाहीर केली आहे. यातच आता माजी नगराध्यक्ष साधना भोसले यांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून कोणाला उमेदवारी मिळणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.



**अनिल सावंत अन् शरद पवार भेटीमुळे चर्चेला उधाण**

राज्याचे आरोग्य मंत्री व शिवसेनेचे नेते तानाजी सावंत यांचे पुतणे अनिल सावंत यांनी शनिवारी सकाळी पुणे येथे जाऊन शरद पवार यांची भेट घेतली. लोकसभा निवडणुकीत खा. शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित केले होते, त्यांनी योग्य प्रचार यंत्रणा राबवून सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघातील दोन्ही जागा महाविकास आघाडीला मिळवून दिल्या आहेत. यामुळे महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढले आहे. याबरोबरच इतर पक्षातील नेतेमंडळी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी मिळावी, यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यातच शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# पालक-मुलांमध्ये मनमोकळा संवाद व्हावा

**● उद्योगवर्धिनीच्या प्रमुख चंद्रिका चौहान** | **शाळा, महाविद्यालयात सेवापाथेय प्राजेक्टची सुरुवात**

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

**संस्कारांचं नातं हे संवादातून रुजतं, संवादात वाढतं आणि संवादातच टिकत असतं. त्यामुळे संस्कारांबरोबरच पालक आणि मुलांमध्ये मनमोकळा संवाद होणे गरजेचे आहे. संवादाम ुळे नात्यातील लवचीकता, आपापसातील संबंध आणि पुन्हा उभी राहण्याची जिद्द ही ताणतणावापासून दूर ठेवण्यास मदत करते. आई-बाबांनी त्यांच्या आयुष्यात घडलेल्या वाईट घटना मुलांना सांगितल्या पाहिजेत. त्यामुळे मुलेही वाईट गोष्टी पालकांना उघडपणे सांगतील, असे उद्योजिका तथा उद्योगवर्धिनीच्या सर्वेसर्वा चंद्रिका चव्हाण यांनी सांगितले.**



उद्यागवर्धनी महिलांसाठी काम करणारी संस्था आहे. गेल्या १७ वर्षांपासून ही संस्था काम करत आहे. बदलापूर आणि कोलकाता येथील घडलेल्या घटना निश्चितच निषेधार्ह आहेत. अशा घटना घडल्यावरच समाज पेटून उठतो. मात्र या घटना घडू नये, म्हणूनच सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी मुला-मुलींना संस्काराबरोबरच पालकांशी संवादही साधला पाहिजे. हा संवाद आज मोबाईलमुळे होत नाही, त्यासाठी आता उद्योगवर्धिनीकडून सेवापाथेय प्रोजेक्ट सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून १५ सेवाव्रती महिला प्रत्येक शाळेत जाऊन मुलींशी संपर्क करणार आहेत. सुरुवातीला मुलींना बौद्धिक खेळ, कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना बोलते करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यानंतर मुलींना गुड टच आणि बॅड टच याची माहितीही देण्यात येणार आहे. शहर आणि जिल्ह्यातील प्रत्येक शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्याचा उद्योगवर्धिनीचा मानस आहे. सध्या सोनामाता आदर्श विद्यालयात हा उपक्रम राबवत असून अजून पाच शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्याची मागणी होत आहे. या उपक्रमासाठी सर्वांची साथ आवश्यक आहे.

अत्याचाराच्या घटना घडू नये यासाठी सामाजिक संघटना, पोलीस, शासकीय, निमशासकीय यंत्रणांनी कमिटी स्थापना करावी. विशाखा समितीकडे मुली, महिला तक्रार करत नाहीत. मुलींनीही न्यूनगंड मनात न ठेवता आपल्या भावना पालकांकडे अथवा आपल्या जवळच्या व्यक्तींकडे व्यक्त केल्या पाहिजेत. उद्योगवर्धिनी सामाजिक संस्था यासाठी प्रयत्न करत आहे, याला सर्वांची साथ आवश्यक आहे.

### खर्चिक सेवापाथेयला सहकार्याचे आवाहन

सामाजिक दायित्व म्हणून उद्योगवर्धिनी सामाजिक संस्था सेवापाथेय उपक्रम सुरू करत आहे. मात्र हा उपक्रम मोठा खर्चिक आहे. त्यामुळे याला मर्यादा येतात. यासाठी विविध संस्था, संघटना आणि दानशूर व्यक्तींनी या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन चंद्रिका चव्हाण यांनी केले.





# सोनामाता विद्यालयातील विद्यार्थिनींना स्व-संरक्षणाचे धडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

लहान वयामध्ये मोबाईलसारखे यंत्र हातात आले आहे. त्यांचा योग्य तो वापर करावा. मोबाईल वयोमानानुसार बघा. तुमच्याशी गैरवर्तन करत असेल तर त्याला विरोध करा आणि याची माहिती आईला किंवा शिक्षकांना सांगा. शारीरिक, मानसिक, बौद्धिक दृष्टीने सक्षम होणे ही काळाची गरज आहे, असे मत जेलरोड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक ज्योत्स्ना भांबिस्टे यांनी केले.

सोनामाता आदर्श विद्यालयात आनंदी शनिवार अंतर्गत प्रत्येक शनिवारी उद्योगवर्धिनीमार्फत सेवापाथेय शनिवारमध्ये विविध कौशल्य कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी चंद्रिका चौहान यांनी मुलींना सद्य परिस्थितीबरोबरच लाडकी बहीण योजना व बदलापूर येथील घटनांची मुलींना माहिती आहे का ते जाणून घेतले. पौष्टिक खाऊ अंतर्गत मुलींकडून पूनम मालपाणी व मीनाक्षी सलगर यांनी आठवीच्या विद्यार्थ्यांसोबत सँडविच तयार करून खाऊ वाटप केले. भांबिस्टे यांनी गुड टच लव्ह टच आणि बॅड टच कसा ओळखायचा याविषयी माहिती दिली. आभार डॉ. वृषाली कुलकर्णी यांनी म ानले. यावेळी मीनाक्षी सलगर, पूनम मालपाणी, स्मिता लाहोटी, गीतांजली चव्हाण, सुतार, घोगले उपस्थित होते.

## वैभव हेगडे यांचे आज व्याख्यान

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

श्रीकष्ण जयंती प्रित्यर्थ वैभव हेगडे यांचे रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी श्री शुभराय महाराज मठात दुपारी ४:३० ते ६:०० या वेळेत व्याख्यान होणार आहे. पूर्वी एकत्र कुटुंब पध्दतीत घरातून यासाठीचे संस्कार आपसुकच मिळत होते. आताचा काळ वेगळा आहे. पण गुणवंत बाळ हवे ही गोष्ट आजही सर्वाना सुखावून टाकते. यासाठी मानसिक, भावनिक, कोटुंबिक स्तरावर आपण कशी तयारी करणार याचे विवेचन व्याख्यानातून हेगडे करणार आहेत. नवविवाहित आणि अजून बाळ झाले नाही अशा सर्व दाम्पत्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महिलेवर अत्याचार करणाऱ्यास पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

महिलेवर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्यास एमआयडीसी पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यास २७ ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. निलेश कन्ना (रा. सोलापूर) असे पोलिस कोठडी मिळालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०२१ ते मागील १ वर्षाच्या दरम्यान निलेश कन्ना याने पिडीतेला फोनवर बोलून तसेच व्हिडीओ कॉल करून दोघांचे रिलेशन घरच्यांना सांगतो अशी धमकी देत अश्लिल कृत्य करण्यास सांगून दमदाटी केली. तसेच पिडीता ही महाविद्यालयात शिकत असताना कन्ना याने त्याचा मित्र राहुल पासंगिर याच्या घरी नेऊन तसेच पोलिस हेडक्वार्टरसमोरील निलेश याच्या दुकानात पिडीतेशी जबरदस्तीने शरीरसंबंध करून अत्याचार केला. म्हणून पिडीतेच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मलि सहायक पोलिस निरीक्षक नीलम घोरपडे पुढील तपास करीत आहेत.



# जवाने जानेमन, हसीन दिलरुबाने जिंकली मने...

**● कराओके मंचच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद; एकापेक्षा एक सदाबहार गाण्यांनी रसिक मंत्रमुग्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

जीवनात छंद जोपासने हा एक वेगळा आनंद असून यामुळे आजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःच्या जीवनातील आनंद जोपासला जातो. कराओके मंचने सुरेल गायक व गायिकांनी सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या सिनेमातील सदाबहार गीते सादर करून श्रोत्यांमध्ये जोश निर्माण केला. स्वसुखासाठी छंद जोपासणाऱ्या कराओके मंचच्या सर्व गायक-गायिकांचे मनापासून कौतुक आहे, असे प्रतिपादन दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले.

कराओके मंच सोलापूर आयोजित अमिताभ बच्चन गीतांचा कराओके कार्यक्रमाचे उद्घाटन हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात शनिवारी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या अनोख्या व हटके कार्यक्रमाचे बहारदार निवेदन अविनाश पत्की आणि धर्मेश राडिया यांनी केले. महानायक अमिताभ बच्चन यांच्या सिनेमातील एकापेक्षा एक सरस आणि सदाबहार अशा विविध गाण्यांचे सादरीकरण यावेळी विविध गायक कलाकारांनी केले. सभागृहात मंचावर गायककांच्या मागे मोठ्या स्क्रीनवर गायल्या जाणाऱ्या गाण्यांची चित्रफीत आणि समोर कराओके मंचच्या गायकांनी दमदारपणे गाणे गायली. गाणे म्हणत म्हणतच कधी ठेका धरला तर डान्सही केला. विविध स्फूर्तीदायी आणि जोशपूर्ण गाण्यांना उपस्थित रसिकांनी भरभरून दाद दिली. कधी टाळ्या वाजवून तर कधी वन्स मोअर म्हणत रसिकांनी कार्यक्रमात रंग भरला. या अनोख्या कार्यक्रमाची संकल्पना संदीप कुलकर्णी यांची आहे. गायक कलाकार उमेश थोब्बी, राजन वोरा, संजय नोगजा, पायल जाजू , श्रुती गुजर, निशिथ मेहता, जितू पटेल, कपिल अध्यापक, हिना सिंगी, अरुणा गुजर, शफिक शेख, तृप्ती कुलकर्णी आदींनी विविध सदाबहार गीते सुरेल आवाजात सादर केली. जवाने जानेमन, हसीन दिलरुबा, ओ साथी रे... दिलबर मेरे कब तक मुझे तडपाओगे... बने चाहे दुश्मन जमाना हमारा... आदमी जो कहता है.... इम्तिहान हो गई... परदेसिया यह सच है पिया... दिल्लगी ने दिया हवा.... छूकर मेरे मन को... अरे दिवानो मुझे पहचानो यासह विविध सदाबहार गीते सुरेख आणि गोड आवाजात सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय (आबासाहेब) माने, प्रा. शिवाजीराव देशमुख, उद्योजक किशोर चंडक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून उपस्थित होते.








# उमानगरी येथील नाल्यात दुचाकीसह पडलेल्या इसमाचा झाला मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

मुरारजी पेठ येथील उमा नगरीतील नाल्यात दुचाकीसह पडलेल्या इसमाचा मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे.

राजअहमद सलीम शेख (वय ३४, रा. मनोहर , निराळे वस्ती, सोलापूर.) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, उमा नगरी येथील श्री मारुती मंदिरालगत असलेल्या नाल्यामध्ये दुचाकीसह एक इसम पडल्याची माहिती मि ळाली असता पोलिस घटनास्थळी दाखल झाले. हा इसम बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. आज सकाळी ७.३५ वाजता अग्निशाम क दलाच्या चार जवानानी त्यास बाहेर काढले. फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या पोलिसानी त्यास सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच इसम मयत झाला. मध्यरात्री ही घटना घडली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळी बघण्यासाठी लोकांची मोठी गर्दी झाली होती. उमा नगरी येथील नाल्यामध्ये दुचाकीसह एक इसम नाल्यात पडल्याची माहिती मिळाली. तत्काळ अग्निशामक दलाचे चार जवान दाखल झाले. त्यास बाहेर काढले, अशी माहिती महापालिका अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी दिली.


### ● नाल्यावरील पुलाला संरक्षक कटडा बांधण्याची गरज

उमा नगरी येथील नाल्यावरील पुल अरुंद आहे. त्यातच या पुलाला संरक्षक कठडा नाही. यामुळे रात्री अंधारात अंदाज न लागल्याने वाहने थेट नाल्यात जाण्याची भीती आहे. त्यामुळे या पुलावर संरक्षक कठडा बांधावा. तसेच हा पुल फार वर्षांपूर्वी बांधला आहे. वर्दळ वाढली आहे. तेव्हा या पुलाची रुंदी वाढवण्याची मागणी होत आहे.

# महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ; अल्पवयीन मुलगा पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट -**

शहरातील एका प्रसिध्द महाविद्यालयातील विद्यार्थीनीचा लैंगिक छळ करणाऱ्या अल्पवयीन मुलाविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्या मुलास ताब्यात घेतले आहे.



याबाबत पिडीत विद्यार्थीनीच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही एका म हाविद्यालयात शिकत आहे. मागील १५ दिवसापूर्वी तिच्या वर्गात मागील बेंचवर गोंधळ सुरु असताना पिडीतेने वळून पाहिले होते. त्यावेळी यातील अल्पवयीन मुलाने पिडीतेला हाताच्या बोटाने इशारा करून पुढे बघ अशी धमकी दिली होती. त्यानंतर १७ ऑगस्ट रोजी दुपारी यातील अल्पवयीन मुलाने पिडीतेला अश्लिल बोलून तिच्या मनाज लज्जा वाटेल असे कृत्य केले. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी सकाळी त्या अल्पवयीन मुलाने म हाविद्यालयातील वॉशरूमजवळ पिडीतेचे बॉडी शेपिंग करून तिच्या मनाज लज्जा वाटेल असे कृत्य केले. म्हणून अखेर पिडीत विद्यार्थीनीने याबाबत पालकांना सांगितले. त्यानंतर पिडीतेने पालकांसह पोलिस ठाण्यात येऊन फिर्याद दाखल केली. पोलिसांनी यातील अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले असून पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

Shanti Education Society's
**A. G. Patil Institute of Technology**
**Affiliated to DBATU, Lonere, Approved by AICTE & Recognized by Govt of Maharashtra.**
18 (2/2A) /2, Pratap Nagar, Near S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur - 413 008
Ph. No. : 0217- 2342499 Website : www.agpit.edu.in Email Id : contact@agpit.edu.in
(NAAC Accredited "B++" Grade)

**APPOINTMENTS**

Applications are invited for the following posts in various departments of out Institute.

| Sr. No. | Branch/Subject with Specialization | Post: Professor | Post: Associate Professor | Post: Assistant Professor | Total Post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | --- | --- | --- | 01 |
| 2 | Mechanical Engineering | 01 | 03 | 08 | 12 |
| 3 | Electronics & Telecommunication Engineering | 01 | 02 | 07 | 10 |
| 4 | Computer Engineering | 01 | 02 | 07 | 10 |
| 5 | Civil Engineering | 01 | 02 | 08 | 11 |
| 6 | Engineering Mathematics | --- | --- | 02 | 02 |
| 7 | Engineering Physics | --- | --- | 02 | 02 |
| 8 | Engineering Chemistry | --- | --- | 02 | 02 |
| 9 | Communication Skills | --- | --- | 02 | 02 |
| 10 | Librarain | --- | --- | --- | 01 |
| 11 | Director of Physicall Education | --- | --- | --- | 01 |

1. Qualification and Pay scale as per AICTE/ Govt. of Maharashtra / DBATU University norms issued from time to time.
2. Applications are invited along with attested photocopies of all certificates with Resume in prescribed format. The same should reach to the office with within 15 days from the date of publication of this advertisement.
3. Experienced candidates will be preferred.
4. Physically Handicapped candidates can also apply.
5. Those who are already in service should apply through proper channel.

**Shri. S.A. Patil**
**President**
Shanti Education Society

# सोलापूर शासकीय विश्रामगृहातील खोलीमध्ये तरुणीचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दिश २४ ऑगस्ट -**


शहरातील सात रस्ता परिसरातील शासकीय विश्रामगृहाच्या खोलीमध्ये तरूणीचा विनयभं करून पिडीतेची फसवणूक करणाऱ्या ७ जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन फैजान परवेज शेख, परवेज शेख, राफिया शेख, सुफियान सय्यद, यासीन कांबळे, परवेज शेख याची बहिण व एक अनोळखी व्यक्ती (सर्व रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



५ जुलै रोजी दुपारी सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृह येथील आर एक्स ५ या खोलीमध्ये पिडीता असताना फैजान शेख हा आला. त्याने पिडीतेला जबरदस्तीने मिठी मारून तिच्याशी अश्लिल कृत्य करीत तिचा विनयभंग केला. त्यावेळी पिडीतेने फैजान यास अश्लिल कृत्य करण्यास विरोध केल्याने त्याने पिडीतेशी एंन्गेजमेंट करून ठरलेले लग्न मोडून पिडीतेची फसवणुक केली. त्यानंतर १३ जुलै रोजी सकाळी सोलापूर रेल्वे स्टेशनसमोरील एका स्टॉलवर फैजान याने पिडीता, तिची आई, लहान भाऊ यांना नेऊन त्याठिकाणी फैजान याची आई राफिया शेख, वडील परवेज शेख, नातेवाईक मित्र सुफियान सय्यद, यासीन कांबळे, परवेझ शेख यांची बहिण आणि एका अनोळखी व्यक्ती होते. यावेळी सुफियान सय्यद व यासीन कांबळे यांनी मोबाईलमध्ये व्हिडीओ चालू ठेऊन फैजानची आई राफिया यांनी पिडीतेच्या आईस, तुम्ही दिलेले दागिने हेच आहेत का असे विचारले.

त्यावेळी पिडीतेच्या आईने हो म्हणाल्यावर राफिया यांनी ते दागिने पिडीतेच्या आईच्या हातात दिले आणि सोबत आणलेल्या कोणत्यातरी कागदावर सही घेतली व व्हिडीओ शुटींग बंद केले. त्यानंतर त्यांनी पिडीतेच्या आईच्या हातात दागिने देऊन निघून गेले. यावेळी पिडीता व तिचा भाऊ मध्ये पडले असता सर्वांनी मिळून त्यांना धक्काबुक्की करून पिडीतेच्या भावास मारहाण केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
फुल्ल ॲक्शनचा डबल धमाका








१२॥, ३॥ वा. | ६॥, ९॥ वा.
स्वस्त तिकीटदर १०० आणि १३०

भागवत उमामंदिर एअर कुल्ड
हाऊसफुल्ल २रा आठवडा




12.30/30.30/6.30/09.30PM
Book The Ticket At BookMyShow
तिकिट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
रविवार, २५ ऑगस्ट २०२४
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अंतराळ संशोधनात भारताने केलेले उत्तुंग कार्य अभिमानास्पद: डॉ. आर. एम. मोहिते

**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

भारताने २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशावर विक्रम लँडरचं यशस्वी लँडिंग करुन ऐतिहासिक कामगिरी केली. दक्षिण ध्रुवीय प्रदेशावर उतरावणारा भारत हा जगातील पहिला देश बनला. प्रग्यान रोव्हरसह विक्रम लँडरनं चंद्राच्या पृष्ठभागावर स्पर्श केला आणि भारताच्या अंतराळ संशोधनाच्या प्रयत्नांमध्ये महत्त्वपूर्ण यश मिळवलं. भारत सरकारने अवकाश संशोधनातील भारताच्या वाढत्या पराक्रमाचे स्मरण म्हणून २३ ऑगस्ट हा राष्ट्रीय अतंराळ दिवस म्हणून घोषित केला. भारताने अंतराळ संशोधनात उत्तुंग असे कार्य केले आहे, असे प्रतिपादन भौतिकशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. आर. एम. मोहिते यांनी केले. अध्यापिका विद्यालयात आयोजित राष्ट्रीय अंतराळ दिवस या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचाया चौगुले होत्या. यावेळी डॉ. एस. एस. मुळे, प्रा. बजरंग वाघमोडे, प्रा. सोमनाथ देंडे, प्रा. सुभाष माळी आणि प्रा. प्रमोद मांडे उपस्थित होते. प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. अशोक घुले यांनी केले. अंतराळ या विषयावर विद्यार्थिनींनी तयार केलेल्या प्रतिकृती व चित्रे यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच एनसीईआरटी युट्युब चॅनेलवरील अंतराळासंबंधी विविध व्हिडिओ प्रोजेक्टरद्वारे विद्यार्थिनींना दाखविण्यात आले. अंतराळ या थीमवर आधारित विद्यार्थिनींची प्रश्नमंजुषादेखील घेण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. रतिकांत हामणे यांनी केले तर आभार प्रा. जीवन लोखंडे यांनी मानले.



### शेतकऱ्यांना लुटणाऱ्या कारखानदारांना सुळावर चढवा : शंकर गायकवाड

**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांची ऊस बिले थकवलेली असल्यामुळे आम्ही सोलापूर साखर सहसंचालक येथे आलो असता ते गैरहजर असल्यामुळे कार्यालयात त्यांच्या रिकाम्या खुर्चीला निवेदन देऊन बोंबाबोंब आंदोलन केल्याचे सांगून, असे शेतकऱ्यांना लुटणारे व शेतकऱ्यांचे रक्त पिऊन निगरगट्ट झालेल्या साखर कारखानदार सुळावर चढवा, अशी घणाघाती टीका शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांनी सोलापूर येथील विभागीय साखर सहसंचालक कार्यालय येथे झालेल्या बोंबाबोंब आंदोलनातून केली. राज्यभरातील बहुसंख्य साखर कारखानदार शेतकऱ्यांना एफआरपी अधिक व्याजासह नफा अशी कायदेशीर पद्धतीने ऊस बिले न देता शेतकऱ्यांना लुटत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची थकलेली ऊस बिले लवकर न दिल्यास पुणे येथील साखर आयुक्त यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशाराही यावेळी गायकवाड यांनी दिला. यावेळी गणेश मोरे, अमोल लोंढे, आतिश लोंढे, शंकर डोईफोडे, समर्थ डोईफोडे, कुमार फोपले, बाबासाहेब फोपले, नवनाथ आगलावे, परमेश्वर सातपुते, दादासाहेब आगलावे आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.



### महंत रामगिरींच्या वक्तव्याचा मोहोळमध्ये निषेध

**मोहोळ, दि. २४ ऑगस्ट-**

महंत रामगिरी यांनी नाशिक येथे प्रेषित मोहंमद पैगंबर यांच्या चारित्र्याविषयी अपशब्द वापरून मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल त्यांचा निषेध करत त्यांना त्वरित अटक करावी तसेच कोलकाता व बदलापूर येथील नराधमांना फाशीची शिक्षा द्यावी, मागणी मुस्लीम समाजाच्या वतीने करण्यात आली. मोहोळ येथील मुस्लीम समाजाचे वतीने आदर्श चौकातील महिबूब सुबहानी दर्गा येथून मुक मोर्चा काढण्यात आला. हा मोहोळ शहरातून बाजार पेठ, गवत्या मारुती चौक, डॉ. आंबेडकर चौकमार्गे मोर्चा मोहोळ तहसील कार्यालयावर आल्यानंतर तहसीलदार सचिन मुळीक तसेच पोलिस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर माजी सरपंच बिलाल शेख, जिब्राईल बागवान, रफीक हरणमारे, अनिस कुरेशी, रियाज शेख, रिजवान शेख आदींसह मुस्लीम समाजातील अबाल वृद्ध बहुसंख्येने सहभागी झाले होते.



### मांडवे येथे विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

**नातेपुते, दि. २४ ऑगस्ट-**

अनुपम आय हॉस्पिटल अकलूज व रत्नत्रय परिवारातर्फे रत्नत्रय इंग्लिश मेडिअम स्कूल, विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मांडवे येथे अनंतलाल रतनचंद दोशी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त घेतलेल्या शिबिरात विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देणे, व्यवस्थित गणवेशांमध्ये उपस्थित राहणे, स्वतःबरोबर शाळा आणि शाळेचा परिसर यांचीही स्वच्छता ठेवणे, विद्यार्थी दशेमध्येच शिस्तीचे व नियमांचे पालन करणे व चांगले गुण अंगीकारणे हे विद्यार्थ्यांचे नैतिक कर्तव्य आहे, असे मार्गदर्शन डॉ. निखिल गांधी यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. निखिल महावीर गांधी, रत्नत्रय परिवाराचे सर्वेसर्वा अनंतलाल दोशी, संस्थेचे मार्गदर्शक वीरकुमार दोशी, सचिव प्रमोद दोशी, सदस्य बबन गोपणे, सुरेश धाईंजे, अभिजीत दोशी, अजय गांधी, दत्ता भोसले, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे उपस्थित होते.

# भांडण-तंटे सोडा... विकासासाठी मने जोडा

## आ. राजेंद्र राऊत यांचे आवाहन; पिंपळगाव धस येथे १७ कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन अन् लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील पिंपळगाव धस येथे आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते १६ कोटी ६७ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. विविध योजनांच्या म ाध्यमातून विकासकामे मंजूर केल्याबद्दल गावकऱ्यांच्यावतीने आ. राजेंद्र राऊत यांचा कृतज्ञता सोहळ्यातून नागरी सत्कार करण्यात आला. भांडण-तंटे, मतभेद सोडा आणि गावाच्या सर्वांगिण विकासासाठी दुभंगलेली मने जोडा, एकत्र या, असे आवाहन आ. राजेंद्र राजेंद्र राऊत यांनी केले.



पिंपळगाव धस येथे आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते चांदणी नदीवर मोठा पूल बांधणे ७ कोटी, देवगांव सिरसाव हद्द, पिंपळगांव, खडकलगांव रस्ता किमी ०/०० ते ६/०० सुधारणा करणे ७ कोटी ९० लाख, २५/१५ योजनेंतर्गत रस्ते व सभामंडप बांधणे ५० लाख रुपये मंजूर कामांचे भूमिपूजन व जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना ७९ लाख, ३०५४ अंतर्गत पिंपळगाव धस ते भांडगांव रस्ता ८ लाख, पिंपळगांव ते जगदाळे वस्ती १० लाख, जनसुविधा अंतर्गत भूम रोड ते जगदाळे वस्ती शिवरस्ता १० लाख, भूम रोड ते चिपडे वस्ती रस्ता २० लाख रुपये मंजूर निधीतून पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक विलास रेणके, माजी जिल्हा परिषद सदस्य हनुमंत धस, माजी पंचायत समिती सदस्य रामेश्वर मांजरे, केशव घोगरे, सुरेश धस, उपसरपंच अण्णासाहेब धस, हनुमंत जगदाळे, बप्पा चिपडे, भाऊ वस्ताद, संभाजी पवार, धनाजी पवार, राहुल धस, धनाजी वाघमोडे, बालाजी जगदाळे, सरपंच तुळजाराम वायकर, विठ्ठल पवार, शिवाजी भोळे, नागनाथ सावंत, सुनील कुलकर्णी, शरद धस, अमर धस, किरण कोकाटे तसेच पिंपळगाव धस येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विकासाची जबाबदारी माझ्यावर : आ. राऊत

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून बार्शी तालुक्यातील विविध विकासकामे करण्यासाठी प्रयत्नशील असून गावा-गावांतील भांडणतंटे विसरुन जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन त्या समस्या सोडवूया, असा सल्ला देत पिंपळगाव धस गावातील ज्याज्या समस्या असतील त्या मला सांगा तसेच बार्शी तालुक्यातील जनतेने लोकप्रतिनिधी म्हणून जी विकासकामांची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. ती सोडवण्यासाठी मी पूर्णपणे प्रयत्न करत आहे, अशी ग्वाही आ. राजेंद्र राऊत यांनी दिली.

# समाज उभारणीत रासेयो स्वयंसेवकांचे योगदान

## राजेंद्र वडजे : मंद्रुप येथील संतोष पाटील महाविद्यालयात कार्यक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ ऑगस्ट-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यम ातून स्वयंसेवकास समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर करणे, योग्य मार्गदर्शन करून चांगली ओळख तयार करणे व व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचा हेतू राष्ट्रीय सेवा योजनेचा आहे. देश, समाज उभारणीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे योगदान आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले.



मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात रासेयोच्या नियमित कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. चनगोंडा हविनाळे होते. यावेळी संस्थेचे सचिव व्यवस्थापन परिषद सदस्य एम. डी. कमळे, इको नेचर क्लबचे डॉ. मनोज देवकर, प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. राजेंद्र वडजे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजाचे ओझे वाहणारे, रंजल्या-गांजल्यांचे ओझे वाहणारे स्वयंसेवक निर्माण करावयाचे आहेत. पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जागृती करत समाजाच्या हिताचे काम करावे. त्यातून समाजात आपली चांगली ओळख निर्माण होईल. डॉ. सी. जी. हविनाळे म्हणाले, रासेयो स्वयंसेवकांनी स्वत:ची प्रतिमा तयार करावी. हे वय जीवनाचा टर्निंग पॉइंट आहे. या काळातच मन आणि बुद्धीवर संस्कार करण्याची गरज असते. संस्कार शिक्षण, आरोग्य शिक्षण याचा उपयोग जीवन समृद्ध करण्यासाठी करावा. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. एल. जाधव यांनी प्रास्ताविक केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संगमेश्वर निंबर्गी यांनी आभार मानले.

### जागृतीसाठी पुढाकार घ्या

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्तवाचा विकास साधला जातो. विविध अभियानांच्या माध्यमातून समाजात जागृती करण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी केले.



# माजी आ. नारायण पाटील यांच्या वाढदिनी विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

माजी आ. नारायणआबा पाटील यांच्या ५८ व्या वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी जेऊर येथे कार्यक्रम स्थळी भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध उपक्रम राबविण्यात आले.

आ. रोहित पवार, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, बारामती ॲग्रो उपाध्यक्ष सुभाष गुळवे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष संतोष वारे, प्रवीण कटारिया, शिवसेना तालुकाप्रमुख सुधाकर लावंड, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, पैलवान सुभाष गुळमे, पै. शहाजी नलावडे, बाजार समितीचे संचालक बापूराव रणसिंग, माजी उपसभापती जालिंदर पानसरे, आदिनाथ माजी संचालक शहाजी देशमुख, माजी संचालक बापूराव देशमुख, संजय खाडे, मकाई माजी उपाध्यक्ष रमेश कांबळे, पंचायत माजी उपसभापती संजय जाधव, अजित तळेकर, सरपंच भास्करराव भांगे उपस्थित होते.

# तंत्रज्ञानामुळे बेकरी व्यवसायात सुलभता येण्यास मदत : सुरेश हलमे

### बार्शीत बेकरी असोसिएशनची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ ऑगस्ट-**

पूर्वी बेकरी व्यवसायात उत्पादनापासून ते वितरणापर्यंत खूप कष्ट होते; पण आता नवनवीन तंत्रज्ञानामुळे बेकरी व्यवसायात सुलभता आली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ बेकरी व्यावसायिक सुरेश हलमे यांनी व्यक्त केले.



बार्शीत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या बेकरी असोसिएशनच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जेष्ठ नेते रमजानभाई पठाण, अशोक नान्नजकर, अच्युत कुलकर्णी, जहांगीर पठाण, असोसिएशनचे नूतन अध्यक्ष मोहन श्रीरामे, उपाध्यक्ष सुरेश इरेगौडा, वसीमभाई पठाण, सचिव मुजम्मील पठाण, जमीर शेख आदी उपस्थित होते. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन नोंदणी प्रमाणपत्राचे अनावरण करण्यात आले. हलमे पुढे म्हणाले की, ताजा पाव ही बार्शीतील बेकरीची ओळख आहे. त्यामुळेच पूर्वीच्या काळातसुद्धा रेल्वेने लातूरपर्यंत माल जायचा. आता बाजारात नवनवीन उत्पादने आलेली असली तरी आपण जर ग्राहकांना दर्जेदार माल वेळेवर दिला तर आपल्याला भविष्य चांगले आहे. रमजान पठाण म्हणाले की, घरच्यापेक्षा वेळेवर खायला मिळणारे हक्काचे ठिकाण म्हणजे बेकरी आहे आणि असोसिएशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक म ोहन श्रीरामे यांनी केले. सूत्रसंचालन नीता देव यांनी तर आभार सुधाकर नान्नजकर यांनी मानले.

# यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचारांची गरज

### डॉ. सुरेश साबू : रोटरी क्लब ऑफ करकंब आयोजित हस्ताक्षर स्पर्धेत ५५२ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २४ ऑगस्ट-**

जो सकारात्मक विचार आणि दूरदृष्टी ठेवून काम करतो, तोच जीवनात नक्कीच यशस्वी होतो. विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम पालकांबरोबरच शिक्षकांचेही असले तरी रोटरीसारख्या संस्था त्यांना बळ देण्याचे काम करत असतात, असे मत रोटरीचे प्रांतपाल डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू यांनी व्यक्त केले.



करकंब रोटरी क्लबच्यावतीने काढण्यात आलेल्या प्रांतपाल भेट विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सहाय्यक प्रांतपाल विश्वास आराध्ये, करकंब रोटरीचे अध्यक्ष डॉ. अक्षय मोरे, सचिव शार्दुल शहा, क्लब डायरेक्टर रघुनाथ जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांतकुमार मोरे, धनंजय इदाते, निर्मला साबू उपस्थित होते. अध्यक्ष डॉ. अक्षय मोरे यांनी चांगले काम करण्याची ग्वाही दिली. डॉ. विनोद शिंगटे, राहुल बनकर, विश्वजीत मोरे, वरुण पुरवत, खंडू परदेशी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुनील दुधाणे यांनी तर आभार लक्ष्मण जाधव यांनी मानले. परीक्षक म्हणून लक्ष्मण जाधव, दत्तात्रय खंदारे, विजयकुमार जाधव यांनी काम पाहिले. या स्पर्धेत ५५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

### हस्ताक्षर स्पर्धेचा निकाल

लहान गट- पहिली ते चौथी प्रथम अर्णव गोंधळी, द्वितीय आरोही शिंदे, तृतीय रणवीर देशमुख. मध्यम गट- पाचवी ते सातवी प्रथम स्वरा टकले, द्वितीय सुप्रिया सलगर, तृतीय जनश्री वडतिले. मोठा गट- सातवी ते बारावी प्रथम अनुष्का पुजारी, द्वितीय कादंबरी शेटे, तृतीय रितिका टकले.

# जनसेवक महादेव कोगनुरे शेतकऱ्यांच्या बांधावर

## शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याचे शेतकऱ्यांना आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ ऑगस्ट-**

आठवडाभरापासून दक्षिण सोलापूर तालुक्यात सतत पाऊस पडत आहे. या भागात दमदार व ढगफुटी सदृश पाऊस होत असल्याने या भागातील बहुसंख्य खरीप पिके सध्या पाण्यात उभी आहेत. यामुळे एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर तालुक्याचे जनसेवक महादेव कोगनुरे यांनी आज शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांची पाहणी करुन शेतकऱ्यांना धीर दिला.



यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच एम. के. फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. सतत पडणाऱ्या पावसामुळे सध्या खरीप पिके धोक्यात आल्याचे चित्र पहायला मिळत आहे. अशावेळी महादेव कोगनुरे यांनी आज दक्षिण सोलापूर तालुक्यातील येळेगाव येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांची पाहणी करुन हळहळ व्यक्त केली. यावेळी पीक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारी दरबारी म ांडून भरपाई मिळवून देणार असल्याचे सांगितले. यावेळी शेतकर्यामधून कोगनुरे यांचे व्यक्त करण्यात आले. यावेळी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतकरी बांधवांना वर्षभर शेतात काबाडकष्ट करावी लागते. परंतु दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक व नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.

**-महादेव कोगनुरे, अध्यक्ष, एमके फाउंडेशन**

# नातेपुतेतील शाळांमधील सुरक्षेचा पोलिसांकडून आढावा

### शाळेच्या आवारात टवाळखोरी आढळल्यास पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे सपोनी महारूद्र परजने यांचे आहवान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २४ ऑगस्ट-**

राज्यातील अनेक ठिकाणी शाळांमध्ये विविध प्रकारच्या घटना घडत आहेत. काही घटनांमुळे पालकवर्ग भयभीत झाले आहेत. या अनुषंगाने नातेपुते येथील शाळांम धून पोलिस यंत्रणेकडून विद्यार्थांच्या सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही शाळांमधील विद्यार्थी सुरक्षित असल्याचे पाहायला मिळाले.

नातेपुते शहरातील डॉ. बा. ज. दाते प्रशाला, एस. एन. डी. इटरनॅशनल स्कूल, चंद्रप्रभू इग्लिश मीडियम, रत्नप्रभा मोहिते-पाटील विद्यालय या शाळांना पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भेटी देऊन पहाणी केली. या गावांतील संस्कृती, पालकांचे व ग्रामस्थांचे असणारे लक्ष आदी कारणांमुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा या दोन्ही शाळांम धील विद्यार्थी सुरक्षित असल्याचे पाहायला मिळाले.

या दोन्ही शाळांमधील तक्रारपेटी, विशाखा समिती, सखी सावित्री समिती, चांगल्या व वाईट स्पर्शाचे प्रशिक्षण, विद्यार्थिनींच्या तक्रारी ऐकून घेऊन त्याचे निराकरण करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी होणारे पोलिसांचे मार्गदर्शन व चर्चासत्र आदी उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. शहरातील अनेक शाळांमधील सीसीटीव्ही सक्षम व सुस्थितीत आहेत. शाळेच्या आवारात टवाळखोरी करताना आढळल्यास त्याचा फोटो काढून अथवा पोलिस ठाण्याला ११२ किंवा ०२१८५२६२३६५ फोन करण्याचे आवाहन नातेपुते पोलिस स्टेशनचे सपानि महारूद्र परजने यांनी सांगितले.

## कर्तव्यात कसूर करणाऱ्यांची गय नाही

**पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी : वैराग पोलीस ठाण्याला भेट**



**वैराग, दि. २४ ऑगस्ट-**

कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही. पोलिसांच्या समस्या व अडचणी जाणून घेऊन त्या दूर केल्या जातील. या पुढील काळात जनतेच्या सुरक्षेची काळजी घेतली जाईल व गुन्हेगारी करणाऱ्यांवर वचक ठेवला जाईल, असा इशारा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिला.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी वैराग येथील पोलीस ठाण्याला भेट देऊन येथील कामकाजाची माहिती घेतली, यावेळी ते बोलत होते. पोलीस अधिक्षकांनी नवीन पोलीस स्टेशन इमारतीच्या कामाची पाहणी करून मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले. वैराग भागात कायदा व सुव्यवस्था व्यवस्थितपणे रहावी, ग्रामीण भागातील अवैध धंदे बंद करावेत. मी कार्यालयात बसून काम न करता प्रत्यक्ष ग्रामीण भागाची पाहणी करणार असून अचानक पोलिस स्टेशनला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी जालिंदर नालकुल, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी हाळे, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### अक्कलकोट महाविद्यालय सेवक पतसंस्थेचा साडेआठ टक्के लाभांश

**अक्कलकोट, दि. २४ ऑगस्ट-**

अक्कलकोट महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महाविद्यालयाच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात व उत्साहात पार पडली. यावेळी सभासदांना साडेआठ टक्के लाभांश वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. नीलकंठ धनशेट्टी होते. यावेळी उपप्राचार्या वैदेही वैद्य, पतसंस्थेचे चेअरमन सुहास होटकर, सचिव प्रा. दत्तात्रय होटकर, संचालक डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, राजीव राठोड, रमेश पुजारी, संचालिका प्रा. यशोदा इळगेर, प्रा. दीपा वलेकर उपस्थित होते. प्रास्ताविक संचालक डॉ. गुरुलिंगप्पा धबाले यांनी केले. सभासदांचे स्वागत संस्थेचे संचालिका प्रा. यशोदा इळगेर यांनी केले.पतसंस्थेचे सचिव प्रा. दत्तात्रय होटकर यांनी अहवाल वाचन केले. सभेचे सर्व ठराव सभासदांनी एकमुखाने मंजूर केले. संस्थेच्या एकूण भागभांडवल, निधी, ठेवी, इतर देणी, गुंतवणूक, राखीव व इतर निधी मोठ्या प्रमाणात आहे. सध्या पतसंस्थेची खेळते भांडवल ३ कोटींहून अधिक असून सभासदांचे हित लक्षात घेऊन संस्थेच्या ठेवी यावर्षी वाढविण्याचा संकल्प यावेळी चेअरमन सुहास होटकर यांनी मांडला. सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. शेवटी संचालिका प्रा. दीपा वलेकर यांनी आभार मानले.



### पंढरपुरातील द. ह. कवठेकर प्रशालेमध्ये गुड टच, बॅड टचवर विद्यार्थ्यांना समुपदेशन

**पंढरपूर, दि. २४ ऑगस्ट-**

येथील द. ह. कवठेकर प्रशालेत नुकत्याच स्थापन झालेल्या सखी सावित्री समितीच्या वतीने गुड टच व बॅड टच यावर माहितीपूर्ण समुपदेशन आयोजित करण्यात आले होते. यावेळी समितीच्या डॉक्टर प्रतिनिधी असणाऱ्या डॉ. संगीता पाटील यांनी गुड टच व बॅड टच यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आठवी ते दहावीमधील मुलींना आपले स्वतःचे रक्षण कसे करावे, कठीण परिस्थितीतून कसे स्वतःला सावरावे, आणीबाणीच्या काळात कोणती दक्षता घ्यावी, यावर मार्गदर्शन केले. स्त्री शरीराची शास्त्रीय माहिती दिली. यावेळी अनेक मुलींचे शंकानिरसन केले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा दीपाली सतपाल उपस्थित होत्या. प्रास्ताविक भक्ती रत्नपारखी यांनी केले तर आभार आयाचित यांनी मानले. यावेळी एस. एस. कुलकर्णी, बाड, फडके, उपमुख्याध्यापक एन. बी. बडवे, आर. एस. कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी सखी सावित्री मंचची स्थापना करण्यात आली. याबाबत मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी सीसीटीव्ही, तक्रारपेटी, नियमित निर्भया पथक भेट, हंगामी कर्मचारी माहिती व त्यांचे समुपदेशन याची माहिती दिली.



### पिलीव येथील नागरी आघाडी पार्टीचे भीव घाटातील शुक्राचार्य डोंगरावर स्नेहसंमेलन

**पिलीव, दि. २४ ऑगस्ट-**

पिलीव येथील नागरी आघाडी पार्टीचे भीव घाटातील शुक्राचार्याच्या डोंगरावर पार्टीचे अध्यक्ष आरिफखान पठाण यांच्या नेतृत्वाखाली स्नेहसंमेलन झाले. जीवनात बचतीची सवय लागावी म्हणून बचत गटाची स्थापना करण्यात आली. यावेळी अध्यक्ष आरिफखान पठाण, उपाध्यक्ष डॉ. मिलींद गुळभिले, माजी सरपंच अमोल मदने, संग्राम पाटील, नानासाहेब देशमुख, राहुल मदने, कुमार भैस, दत्तात्रय भैस, कल्याण जावळे, दादासाहेब वगरे, विजय माळी, विठ्ठल करांडे, दशरथ काळे, सदाशिव खरात, संतोष पडळकर, लक्ष्मण काळे,संजय रोकडे, सागर शेंडगे, रघुनाथ नरळे, राजेंद्र जामदार, शंकर शेंडगे, युवराज मदने, पंकज मदन उपस्थित होते.

### भालगांवच्या दोन डॉक्टरांची एमडीसाठी निवड

**गौडगाव, दि. २४ ऑगस्ट-**




भालगांवनगरीचे दोन डॉक्टर वैद्यकीय शिक्षणातील सर्वोत्कृष्ठ एम. डी. शिक्षणासाठी निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. वैभव विकास दराडे एआयआर ९१२ तर डॉ. महेश लिंबाजी एआयआर २६८ रँक प्राप्त करुन यश मिळविले. हे दोन्ही पुत्र जि. प. शिक्षकांची मुले आहेत. या दोन्ही डॉक्टरांचे एमबीबीएसचे शिक्षण जीएस मेडिकल कॉलेज मुंबई येथे पूर्ण झाले आहे. डॉ. वैभव दराडे यांचे वडील विकास दराडे हे जि. प. शाळा ढेकरी येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत तर डॉ. महेश घुगे यांचे वडील जि. प. शाळा भालगांव येथे मुख्याध्यापकपदी कार्यरत आहेत. बार्शी तालुक्यात सर्वांत जास्त नोकरदार होण्याचे प्रमाण भालगाव येथे होत आहे. गेल्या आठवड्यात पाच आरोग्य सेवकपदी निवड झाली तर एक पोलीस खात्यात रुजू झाले आहेत.

# भारतात रस्ते अपघातात दगावण्याचे प्रमाण सर्वाधिक

- पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक
- २,३५७ अपघातग्रस्तांवर उपचार केलेले डॉ. अमित पडवळ यांनी सादर केला शोधनिबंध

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि. २४ ऑगस्ट –**

**बार्शीतील भगवंत सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे प्रमुख न्यूरोसर्जन डॉ. अमित पडवळ यांनी २,३५७ रुग्णांच्या शास्त्रीय अभ्यासावर आधारित बत्तीसाव्या राष्ट्रीय न्यूरोसर्जन व ट्रॉमा युनिट संचालकांच्या परिषदेत संशोधकीय शोधनिबंधाचे सादरीकरण केले आहे. त्यामध्य त्यांनी अपघातांची विविध कारणे, रुग्णांना दाखल करतानाची स्थिती, रुग्णांचे अपघातावेळी शरीरातील अमली पदार्थांचे प्रमाण, वाहन चालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण व आसन पद्धत, रुग्णालयात दाखल करताना लागलेला कालावधी अशा विविध सूक्ष्म पातळ्यांवर अभ्यास करुन हा अहवाल मांडला आहे. यात भारतामध्ये रस्ते अपघातात दगावण्याचे प्रमाण अधिक असल्याचे मांडले आहे.**



डॉ. पडवळ यांनी ग्रामीण भागातील अपघातग्रस्तांचा अभ्यास करुन मांडलेल्या या अहवालाचे परिषदेत कौतुक झाले. या परिषदेत बार्शीसारख्या ग्रामीण भागातील श्री भगवंत सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अँड न्यूरो ट्रॉमा केअर सेंटरच्या माध्यमातून महानगरांच्या बरोबरीने उपलब्ध करुन दिलेल्या उपचार शस्त्रक्रिया व औषध सेवेमुळे रुग्ण मृत्यू दर हा पाच टक्के इतका कमी असल्याचेही दिसून आले आहे. डॉ. पडवळ यांनी या संशोधन अहवालामध्ये सादर केलेले निष्कर्ष विकसनशील देशांमध्ये रस्ते अपघातांमध्ये मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण सर्वाधिक. ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या भागांमध्ये तसेच जिल्हा, राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरही निकृष्ट दर्जाचे रस्ते, वाहन सुस्थितीमध्ये नसणे, वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष अशा विविध कारणांमुळे अपघात होताना दिसतात. स्त्रियांची पारंपारिक मानसिकता बदलली पाहिजे व त्यासाठी पुरुषांनी स्त्रियांना प्रवृत्त केले पाहिजे. कारण ८.६ टक्के मृत्यूदर हा महिलांमध्ये आढळतो. दुचाकी वाहनांवर सहप्रवासी असणाऱ्या स्त्रियांनी तोल सांभाळताना अडचणींचा व असह्य होईल असा पोशाख परिधान करु नये. वाहनावर बसताना एका बाजूला बसण्याच्या पद्धतीमुळे सहप्रवासी स्त्रियांचा तोल जातो हे लक्षात घेऊन त्यांनी वाहनांवर दोन्ही पाय दोन्ही बाजूला सोडून बसावे. पोशाखाबाबत नऊवार साडी,



काष्टा पद्धत अशारीतीने वाहनांवर बसल्यास स्त्रियांना तोल सांभाळणे सुसह्य होईल. तसेच स्त्रियांनी जड सामान व अपत्ये वाहनांवर घेऊन बसताना आपली कसरत होणार नाही याची गंभीरपणे दक्षता घ्यावी. हेल्मेट वापरणे अत्यावश्यक, राष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक निर्णयाची गरज, मद्य सेवन करुन वाहन चालविणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण. १३ टक्के लोक मद्यसेवन करुन वाहन चालवतात. अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळण्याचा कालावधी कमीत कमी झाला पाहिजे. कारण २० टक्के जखमा अतिगंभीर स्वरुपाच्या असतात, या निष्कर्षातून त्यांनी काळजीचा सल्लाही दिला आहे.

> **अपघातात युवकांचे मृत्यू :** विकसनशील असलेल्या आपल्या देशात युवकांची सर्वाधिक संख्या असून, महासत्ताक होण्यासाठी आपली पावले पुढे पडत असताना अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये युवकांची संख्या सर्वात जास्त आहे, हे दुर्दैवी चित्र बदलले पाहिजे यासाठी समाजाच्या विविध स्तरात व सर्व वयोगटांमधील स्त्री-पुरुषांमध्ये स्वयंशिस्त तसेच दुसऱ्याच्या जीविताचे मूल्य ओळखण्याची परिपक्वता निर्माण झाली पाहिजे. युवकांचे मृत्यू हे अमूल्य नुकसान आहे. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी सर्व आघाड्यांवर सर्व घटकांमध्ये पुरेशा काळजीची अन् जागरूकतेची गरज आहे. पुरेशी काळजी घेतली तर अपघात टाळता येतील.
>
> **- डॉ. अमित पडवळ,**
> न्युरोसर्जन, भगवंत सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, बार्शी

### ही आहेत अपघातांची कारणे

- अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त
- सुस्थितीमध्ये नसलेल्या दुचाकींचा वापर
- हेल्मेट वापराबाबतची उदासीनता
- वाहन चालक व दुचाकीस्वारांमध्ये मद्यसेवनाचे प्रमाण
- गतिरोधकांचे प्रमाण अपघातास कारणीभूत
- अपघातग्रस्तांना दाखल करण्यापूर्व कालावधी (गोल्डन अवर्स) व मृत्यूदर

### अपघात टाळण्यासाठी हे करावे

- रस्ते व वाहतूक नियमांचे पालन गरजेचे
- ९६ टक्के अपघात दुचाकीच्या भरधाव चालवण्यामुळे होतात
- ७६ टक्के अपघातात डोक्याला इजा होण्याचे प्रमाण आहे
- स्त्रियांची दुचाकीवर बसण्याची चुकीची पद्धत बदलणे गरजेचे

### आपल्यावरही येऊ शकते वेळ

अपघात कोणाच्याही जीवनामध्ये घडू शकतो आणि अशा अपघातप्रसंगी आपली संवेदनशीलता व मानवता धर्माचे पालन करत अपघातग्रस्तांना तातडीने शक्यतो जवळच्या ट्रॉमा युनिटमध्ये दाखल करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

### दिल्ली, बेंगलोरच्या तोडीच्या उपचार सुविधा बार्शीत

ग्रामीण भागात ७० टक्के लोकसंख्या वास्तव्य करत असल्यामुळे ग्रामीण जनतेला अपघातानंतर महानगरातील अत्युच्च दर्जाच्या उपचार सुविधा मिळणे गरजेचे आहे व श्री भगवंत ट्रॉमा युनिटच्या माध्यमातून या दिल्या जाणाऱ्या सुविधांचा दर्जाही दिल्ली व बेंगलोर येथील राष्ट्रीय उपचार संस्थांच्या तुलनेत तितकाच अत्युच्च आहे. तसेच या ग्रामीण भागातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वात मोठ्या ट्रॉमा युनिटमध्ये रुग्णांचा मृत्यूदर महानगरातील उपचार संस्थांच्या तुलनेत सारखाच आहे, असे या अहवालातून सिद्ध होते.

## पिलीव परिसरात बंदबाबत नरमाईची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात महाविकास आघाडीने बदलापूर येथे दोन चिमुकलीवर झालेल्या लैंगिक आत्यचाराच्या विरोधात बंद पुकारला होता. पिलीव परिसरातही महाविकास आघाडीचे कार्यकर्ते बंद ठेवणयाच्या मनस्थितीत होते खरे. पण हाय कोर्टाने बंदच्या विरोधात जो दणका दिला व याच्या बातम्या सर्वत्र पसरल्या यानंतर महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपली बंदविषयची भूमिका बदलत नरमाईचे धोरण स्वीकारत बंदचा निर्णय बदलला.

महाविकास आघाडीचे कार्यकर्ते खासगीत बोलताना म्हणत होते, सर्वोच्च न्यायालयाने बंदला परवानगी नाकारली. यामुळे हा बंद आम्ही माघारी घेतल्याचे बोलले जात होते. पिलीव भागात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा प्रभाव आहे. पण हाय कोर्टाच्या निर्णयामुळे आपली बंदची भूमिका व शरद पवार यांनीही बंद मागे घेण्याचे केलेले आवाहन यामुळे बंद पाळण्यात आलाच नाही, तर महाविकास आघाडीचा घटक पक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटही याबाबत उदासीन दिसून आला. यामुळे महाविकास आघाडीने आज पुकारलेला बंद पिलीव परिसरात पाळलाच नाही. यामुळे पिलीव परिसरातील सर्व व्यवहार दररोजप्रमाणे सुरळीतपणे सुरु होते.

## आरोग्य योजनेचे सेवक गायब, पंढरीत रुग्णांचे हाल

**● पंढरपुरात पडसाद** कोलकाता येथील महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ ऑगस्ट-**



वैद्यकीय सेवा औषधोपचार ही सेवा नेहमीच रुग्णासाठी अत्यावश्यक सेवा असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून गोरगरीब जनतेसाठी राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले आरोग्य जनजीवन योजना ही सेवा देणारे कर्मचारी संपामुळे विविध हॉस्पिटलमध्ये येत नसल्याने पंढरपूर तालुक्यातील व शहरातली शेकडो रुग्णांचे शस्त्रक्रिया व इतर अत्यावश्यक उपचार होत नसल्याने शारीरिक वेदना सहन करीत हॉस्पिटलमध्ये खितपत पडावे लागत आहे.

कोलकाता येथे एका महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ तसेच पगारवाढ करण्यात यावी, निवासी डॉक्टर व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी घेण्यात यावी, या व इतर मागण्यासाठी गेल्या आठ दिवसंपासून निवासी डॉक्टर व विविध शासकीय योजना राबविणारे शासन पुरस्कृत कर्मचारी संपावर असल्याने हॉस्पिटल मध्ये येत नाहीत. वास्तविक पाहता हा संप मिटला असून गोरगरीब व गरजू रुग्णांचे हाल थांबविण्यासाठी त्वरित या लोकांनी हॉस्पिटलमध्ये काम ावर रुजू व्हावे असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. तरीहि महात्मा फुले आरोग्य जनजीवन योजना राबविणारे कर्मचारी येत नाहीत. याचा मोठा विपरित परिणाम गोरगरीब रुग्णांवर होत असून सदर हॉस्पिटलमधील मुख्य डॉक्टर, आम्ही काय करणार, असा बचावात्मक पवित्रा घेत आहेत.

### लाभ मिळत नसल्याने नातेवाईक त्रस्त

राज्य तसेच केंद्र सरकारने कितीही चांगल्या योजना आणल्या तरीही या योजना राबविणारे लोक सहकार्य करीत नसल्याने खऱ्या व गरजू लोकांना याचा लाभ मिळत नाही, आता तर संप सुरू असून कोणीही नीट उत्तरे देत नसल्याचा विचित्र अनुभव गरजू व असहाय्य रुग्णांच्या नातेवाइकांना येत आहे.

# स्वयंम्, आधार योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**● लोककल्याणकारी योजनेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आजपासून तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ ऑगस्ट-**

**पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम योजना आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्यासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता उच्च शिक्षणाचे द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत तर प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालकांनी केले आहे.**




शासन मान्यता प्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विना अनुदानित विद्यालय, तंत्रनिकेतनामध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यां निवास व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी स्वतंत्र वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू केली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनेची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी या विभागांतर्गत असणाऱ्या योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनाने २५ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर याकाळात तालुकास्तरीय मेळावे आयोजित केले आहेत. जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास घटकातील सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी व सेवाभावी संस्थांनी आपापल्या तालुक्यातील मेळाव्यास



उपस्थित रहावे असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक मनिषा फुले सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील धनगर समाजाच्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात अर्ज करुनदेखील शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या मान्यता प्राप्त तंत्र शिक्षण संस्थेत तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यास क्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या व्यावसायिक तसेच बिगरव्यावसायिक धनगर व इतर मागास समाजातील विद्यार्थ्यां शिक्षण घेता आहेत अशा विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घण्यासाठी आवश्यक ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी शासनाने पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित अर्जाचा नमुना सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सोलापूर या कार्यालयात अर्जाची प्रत उपलब्ध आहे.

### ● तालुका स्तरीय मेळावा

- २५ ऑगस्ट रोजी बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सभागृह, नगरपालिक समोर, स.११ ते दु.३
- २८ ऑगस्ट रोजी सांगोला येथील पंचायत समिती, बचत भवन येथे सकाळी ११ ते दु. ३
- २९ ऑगस्ट रोजी दक्षिण सोलापूर,
- उत्तर सोलापूर येथील वालचंद इन्सिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालय सभागृह, अशोक चौक, सोलापूर येथे सकाळी१० ते दु.२
- ३० ऑगस्ट रोजी करमाळा येथील पंचायत समिती सभागृह येथे सकाळी ११ ते दु. ३
- ३१ ऑगस्ट रोजी अक्कलकोट येथील लोकापुरे मंगल कार्यालय, बुधवार पेठ, स.११ ते दु. ३
- २ सप्टेंबर रोजी माढा येथील जगदाळे मंगल कार्यालय, वैराग रोड येथे सकाळी १० ते दु. १ मोहोळ येथील शुभम मेमोरियल फंक्शन हॉल, मार्केट यार्डसमोर येथे सकाळी १ ते दु. ४
- ३ सप्टेंबर रोजी माळशिरस येथील पंचायत सिमती सभागृह, येथे सकाळी ११ ते ३ मंगळवेढा येथील रॉयल हॉल, सोलापूर रोड येथे सकाळी १० ते २ आणि पंढरपूर येथील सद्गुरु मंगल कार्यालय वाखरी येथे दु. १२.३० ते दुपारी ४:३०

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री. स्वामी समर्थ महाविद्यालय येथे विद्यापीठ वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२३ ऑगस्ट -**



श्री.स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, रुईभर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष कोळगे म्हणाले, उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाविद्यालयाने नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे अवाहन करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या उच्च शिक्षणातून समाजकार्य करावे, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, शिवसेना नेते राजनारायण कोळगे, माजी सरपंच बालाजी कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, उपप्राचार्य धनाजी भोसले, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए.डोंगरे प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### शबरी शहरी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण

**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

शबरी घरकुल योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आदिवासी समाजाकरिता मंजूर झालेल्या हक्काच्या घरकुलांचा लोकार्पण सोहळा सोमवार, २६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता पापनास नगर धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे यांच्या हस्ते घरकुलाचे लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ठाणे आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दीपककुमार मीना, धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष तर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, धाराशिवच्या तहसिलदार डॉ.सौ.मृणाल जाधव, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. धाराशिव शहरातील शासकीय दुध डेअरीच्या पाठीमागील पापनास नगर येथे होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे सहायक प्रकल्प अधिकारी विशाल सरतापे यांनी कळविले आहे.



### तेरणा महाविद्यालय परिसरात परिसर स्वच्छतेचे आयोजन

**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

तेरणा महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात परिसर स्वच्छतेचे आयोजन प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरातील स्वच्छता करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुशीलकुमार सरवदे, डॉ.अनघा तोडकरी, डॉ.तुळशीराम उकिरडे तसेच महाविद्यालयातील प्रा.उत्तरेश्वर तवले, डॉ.अरुणा सावरगावकर, डॉ.डी.बी.मोरे, डॉ.दीपिका देशमुख, प्रा.अर्चना तवले, प्रा.रोहिणी माने, प्रा.सुचिता कोल्हे, प्रा.छाया शिंदे, प्रा.बालाजी काकडे, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# भाविकांची नवरात्र काळात गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे

## शारदीय नवरात्र महोत्सव २०२४ : शारदीय नवरात्र महोत्सव पूर्व तयारीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

ऑक्टोबर महिन्यात दि. ३ ते १८ या कालावधीत श्री.तुळजाभवानी मतेचा शारदीय नवरात्र महोत्सव होणार आहे.यादरम्यान विविध विभागाकडून यात्रेत व्यवस्था करण्यात येते.ही यात्रा व्यवस्था उत्तम असण्यासह महोत्सवादरम्यान भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

श्री.तुळजाभवानी मंदीर संस्थान सभागृह, तुळजापूर येथे आगामी शारदीय महोत्सवासाठी २३ ऑगस्ट रोजी आयोजित आढावा बैठकीत डॉ.ओंबासे बोलत होते. यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलिस अधिक्षक संजय जाधव, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, अति.पोलिस अधिक्षक गौहर हसन, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख, तहसीलदार अरविंद बोळंगे, तुळजाभवानी मंदीर प्रशासकीय व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, सहाय्यक धार्मिक व्यवस्थापक सिध्देश्वर इंतुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.ओंबासे म्हणाले, येणाऱ्या भाविकांना विविध सुचना देण्यात येवून तुळजापूरकडे येणाऱ्या सर्व रस्त्यावर महामार्गावर तसे फलक लावण्यात यावे.शहरात अनेक रिक्षा अनधिकृत असून त्या गॅसवर चालविण्यात येतात. यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे.तसेच प्रवाशांची फसवणूक होणार नाही यासाठी रिक्षांचे दरपत्रक रिक्षा स्टँडवर लावण्यासह प्रवाशांची संख्या निश्चित करावी.

संभाव्य अपघाताच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाईच्या सुचना यावेळी त्यांनी सहाय्यक प्रादेशिक अधिकारी यांना दिल्या.

नगर परिषदेने शहरात बॅरेकेटींग लावणे, आवश्यक त्या ठिकाणी जंतूनाशक पावडरची फवारणी करणे,शहरातील अंतर्गत रस्ते दुरुस्त करुन स्ट्रीट लाईट लावणे,श्री घाटशीळ,पापनाश व महाव्दार परिसरात २४ तास स्वच्छता कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात यावी असे सांगून डॉ. ओंबासे म्हणाले, प्रधिकरणावेळी करण्यात आलेल्या कामामुळे पोल काढण्यात आले आहेत, अशा ठिकाणी पोल बसवून घ्यावे. शहरात फिरणारी मोकाट जनावरे,श्वान व वराह यांचा बंदोबस्त करावा.कोंडवाडयाची व्यवस्था करावी. तसेच जनावरे मालकाकडून दंड वसुल करावा असे निर्देश तुळजापुर नागरपालिकेला डॉ.ओंबासे यांनी दिले.

रस्त्यांच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागांनी आपआपली जबाबदारी पार पाडावी असे सांगून डॉ.ओंबासे म्हणाले की,तुळजापूर शहराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांची दुरुस्ती करुन घ्यावी,तसेच रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत काढून तात्काळ त्या ठिकाणी मुरुम टाकण्याची व्यवस्था करावी.भाविकांना मार्गदर्शनासाठी विविध स्वरुपाचे फलक लावावेत.

शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही या दक्षतेसह या काळात एक उपअभियंता व दोन वायरमन यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यासह मंदीरासाठी करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयाचा विजपुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देऊन डॉ. ओंबासे म्हणाले, ट्रान्सफार्मरवर येणारा लोड क्षमतेपेक्षा जास्त नसावा. शहरातील विजेचे केबल, बॉक्स, मेन बॉक्स उघडे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने बसेसची व्यवस्था करुन बसमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. इतर सर्व विभागांना नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करुन भाविकांची गैरसोय होणार नाही. यांची दक्षता घेण्याच्या सुचना यावेळी दिल्या.

यावेळी पोलिस निरीक्षक रवींद्र खांडेकर, तुळजापूरचे आगार व्यवस्थापक रामेश्वर शिंदे, मंदीर संस्थानचे अधिकारी - कर्मचारी तसेच विविध यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



### जिल्हाधिकारी यांनी केली चर्चा अन् सुटला प्रश्न

शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान स्थानिकांना आपल्या दुचाकी घराकडे नेण्याचा मोठा प्रश्न निर्माण होत होता. यामुळे सुवर्णेश्वर गणपती मंदीराजवळ अनेक वेळा वाद निर्माण होत होता. यामुळे येथे बॅरेकेटींग लावण्यासाठी या परिसरातील नागरिकांचा विरोध होता. या आढावा बैठकीत ज्या नागरिकांचा विरोध होता त्यांना बोलावून त्यांचेशी चर्चा केली. आता त्या ठिकाणी तात्पुरते बॅरेकेटींग झुलता पुल बसविण्यात येणार आहे.यामुळे स्थानिकांना येथे येणे-जाणेसाठी आता अडचण येणार नाही.

### बोगस पुजाऱ्यांवर होणार कारवाई

मंदीरात अनुचित प्रकार घडू नये,तसेच भाविकांची फसवणूक होवू नये यासाठी आता बोगस पुजाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.यासाठी तीनही पुजारी मंडळाच्या याद्यांची पुर्नतपासणी करण्यात येवून त्यांना क्यु आर कार्ड असलेले ओळखपत्र देण्यात येणार आहे.

### सिमोल्लंघानावेळी आता कुंकाऐवजी फुले

शारदीय नवरात्र महोत्सवाचा सिमोल्लंघन हा महत्वाचा उत्सव असतो. सिमोल्लंघनावेळी काहीजण मंदीरावर चढून पालखीवर पोत्याने कुंकू उधळल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.यामुळे आता पालखीवर कुंकूऐवजी फुले उधळण्यात येणार आहेत.

## संस्कृत विभागामार्फत रक्षाबंधन सण साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२४ ऑगस्ट -**

रक्षाबंधन सणानिमित्त अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृतच्या विद्यार्थीनींनी बहीण- भावाचे अतुट नाते सांगणारा रक्षाबंधन हा सण नळदुर्ग येथील पोलिस ठाण्यातील उपस्थित पोलिस बांधवांना राख्या बांधून व औक्षण करुन साजरा केला.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही संस्कृत विभाग प्रमुख प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊ बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण साजरा केला. पोलीस बांधवांना जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विषयाच्या प्रीती राजपूत, कोमल सराटे, ज्योति शंकरशेटे, शुभांगी लोंढे, दिपिका अक्कलकोटे, साक्षी मुळे, मुस्कान पठाण, पल्लवी मनशेट्टी, भक्ती होगाडे, प्रतिक्षा मनशेट्टी, राधिका गायकवाड, स्वाती निकंबे, श्रेया सोनटक्के, माधवी दळवे, कांचन दळवे, पल्लवी चौगुले, प्राची डोकडे आदी उपस्थित होते.

## भारतीय किसान संघ जिल्हा अध्यक्षपदी नितिन घुले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**



भारतीय किसान संघ जिल्हा संमेलन काल धाराशिव येथे नुकतेच पार पडले. या अधिवेशनासाठी भारतीय किसान संघ महाराष्ट्र प्रांतचे उप अध्यक्ष ॲड.रावसाहेब शहाणे, भारतीय किसान संघ जिल्हा सोलापूरचे अध्यक्ष नागाप्पा सिंदगी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी चालवलेली देशव्यापी व सामूहिक नेतृत्व असलेले गैर राजकीय संधटन म्हणून भारतीय किसान संघ देश भर ओळखला जातो. या भारतीय किसान संघाचे जिल्हा अधिवेशन धाराशिव येथे पार पडले.

या अधिवेशनात शेतकऱ्याच्या विविध समस्यांवर चर्चा होवून त्यावर काही ठराव संमत करण्यात येवून ते महाराष्ट्र शासनास सादर करण्याचे ठरले. त्यासोबतच भारतीय किसान संघ करीत असलेल्या देशभरातील कार्याची माहिती उपस्थित शेतकरयांना देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांमधून आगामी तीन वर्ष साठी भारतीय किसान संघ धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी नितीन घुले वाशी यांची एकमताने निवड करण्यात आली.

जिल्हा मंत्री म्हणून येवती येथील भूपाल गायकवाड यांची, जिल्हा युवा प्रमुख अमृत पाटील सिंदगाव, भारतीय किसान संघ तुळजापूर तालुका अध्यक्षपदी अभिजीत पांढरे सिंदफळ, लोहारा तालुका अध्यक्षपदी काशिनाथ लकडे जेवली, कळंब तालुका अध्यक्षपदी गणेश अडसूळ इटकुर, वाशी तालुका अध्यक्षपदी संग्राम नन्नवरे वाशी, धाराशिव तालुका अध्यक्षपदी सुधाकर केवळराम सुभा यांच्या नियुक्त्या केल्याची घोषणा भारतीय किसान संघ महाराष्ट्र प्रांत निवडणूक अधिकारी रावसाहेब शहाने पाटील यांनी केली.

## ग्रामीण भागातील युवकांची जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी : डॉ.प्रसाद देवधर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

ग्रामीण भागामध्ये सुद्धा आजच्या युवकांसाठी खूप काही करण्यासारखे आहे परंतु त्यासाठी जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी ,ग्रामविकासाच्या संकल्पनेत बायोगॅस निर्मिती मधून स्त्रियांचा स्वयंपाक करण्याचा वेळ वाचला व त्या वेळेमध्ये स्त्रियांना इतर गोष्टी बचत गटाच्या माध्यमातून शिकवण्यात आल्या त्यामुळे स्त्रिया स्वावलंबी झाल्या आहेत त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. अशी बायोगॅस निर्मिती प्रकल्पाची यशोगाथा त्यांनी विषद केली. असे सामाजिक कार्य करत असताना ते सुद्धा प्रोफेशनली केले पाहिजे. प्रत्येक कार्य करत असताना शास्त्रीय दृष्टिकोन व गणिताची सांगड घालून केल्यास यश प्राप्ती होते. ग्रामीण भागामध्ये सुद्धा आजच्या युवकांसाठी खूप काही करण्यासारखे आहे परंतु त्यासाठी जिद्द व अपार कष्ट करण्याची तयारी हवी. विद्यार्थ्यांनी आपला वेळ मोबाईल मध्ये वाया न घालता, त्या वेळेमध्ये नवीन गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत, असे मोलाचे मार्गदर्शन डॉ. प्रसाद देवधर यांनी केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचा ग्राम विकासामध्ये सहभाग या विषयावर डॉ. प्रसाद देवधर, भागीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार देविदास पाठक, सिनेट सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर हे अध्यक्ष म्हणून तर डॉ. जितेंद्र कुलकर्णी, विभाग प्रमुख जैवतंत्रज्ञान विभाग व डॉ. मकरंद चौधरी, जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव जिल्हा त्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदरील कार्यक्रम विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. पी.पी. दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा मध्ये देविदास पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून कार्य करावे. जे की ग्रामीण भागातील जनतेसाठी उपयोगी पडेल.

डॉ. प्रसाद देवधर सारखे व्यक्ती हे समाजाला प्राप्त झालेले रत्न आहेत. त्यांचा आदर्श ठेवून विद्यार्थ्यांनी समाजासाठी कार्य करावे. असे प्रतिपादन देविदास पाठक यांनी आपल्या मार्गदर्शना मध्ये केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेघश्याम पाटील यांनी केले. प्रास्ताविकानंतर भागीरथ ग्राम विकास प्रतिष्ठान च्या कार्यासंबंधी चित्रफीत दाखवण्यात आली. ज्या मधून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती मिळाली. डॉ. प्रसाद देवधर यांनी आपल्या विविध प्रकल्पान विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे आभार डॉ. जितेंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल खोब्रागडे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा भातलवंडे यांनी केले.

## महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन; अशोक जगदाळे यांची निवडणूकीची जोरदार तयारी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ ऑगस्ट -**

महाविकास आघाडीचे नेते तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक जगदाळे यांनी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली असुन त्यांनी तुळजापुर तालुक्यातील आठ जि.प.गटात सध्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या सिनेभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा खास महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करून आठ जि.प.गटातील ४० हजार महिलांशी संवाद साधला आहे. या कार्यक्रमास महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्यामुळे विधानसभा निवडणुकीत याचा अशोक जगदाळे यांना मोठा फायदा होणार असल्याचे दिसुन येत आहे.

येत्या एक, दोन महिन्यात महाराष्ट्रात विधानसभा निवडणुक होणार आहे या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांकडुन सध्या जोरदार मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. अनेक राजकीय पक्षांकडुन निवडुन येणाऱ्या उमेदवारची चाचपणी केली जात आहे. यावेळी आई तुळजाभवानीच्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातही अनेक इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीची जय्यत तयारी सुरु केली आहे. यामध्ये सर्वात पुढे महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे हे आहेत. मागच्या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच विधानसभेची निवणुक लढवितांना अशोक जगदाळे यांनी तब्बल ३७ हजार इतके मतदान घेऊन सर्वांनाच आश्चर्यचकीत केले होते. पहिल्यांदा निवडणुक लढविताना तुळजापुर विधानसभा मतदार संघात इतके मतदान आजपर्यंत कुणालाच घेता आले नाही ही वस्तुस्थिती आहे.



मागच्या विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव विसरून अशोक जगदाळे यांनी आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली आहे. सध्या हिंदु धार्मियांचा पवित्र श्रावण महिना सुरु आहे. या महिन्यात खास महिलांसाठी अशोक जगदाळे यांनी सिनेभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आतापर्यंत तुळजापुर तालुक्यातील अणदुर, सावरगाव, काटी, तामलवाडी, अपसिंगा, मंगरूळ, कटगाव आणि काक्रंबा या आठ जि.प.गटात हे कार्यक्रम झाले आहेत. याला महिलांचा प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

जवळपास ४० हजार महिलांशी संवाद साधला आहे. जुना तुळजापुर विधानसभा मतदार संघ जळकोट जि. प. गट वगळता आज अशोक जगदाळे यांनी अक्षरक्षा पिंजुन काढला आहे. अशोक जगदाळे यांनी केवळ महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करून थांबले नाहीत तर प्रत्येक कार्यक्रमात स्पर्धेतील अकरा विजेत्या महिलांना विशेष वस्तु भेट तर कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रत्येक महिलेला संसारात उपयोगी पडेल अशी एक चांगली वस्तु भेट दिली आहे.

## भाजपा देणार मुली, महिलांसाठी मोफत ज्युडो कराटे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ ऑगस्ट -**

समाजातील काही विकृत मानसिकतेमुळे मुली आणि महिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. परंतु अशा परिस्थितीमध्ये हिम्मत न हारता आत्मविश्वासाने सामोरे जाणे अत्यावश्यक आहे. या गोष्टीचा विचार करून आ.राणा जगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा धाराशिव नगरपालिकेचे माजी गटनेते युवराज नळे यांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून दि १ सप्टेंबर पासून सायंकाळी पाच ते सहा या वेळेत सर्व प्रकारच्या वयोगटातील मुली आणि महिलांसाठी त्यांच्यात शारीरिक आणि मानसिक कणखरता निर्माण करण्यासाठी दोन महिने मोफत कराटे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. युवराज नळे हे कराटे क्षेत्रातील जुने अनुभवी मुख्य प्रशिक्षक (ब्लॅक बेल्ट ३ डिग्री) असून इंडियन तायक्वांदो ॲन्ड किक बॉक्सिंग असोसिएशन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी यापूर्वी अनेक वर्षे कराटे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम केलेले आहे. यामध्ये इतरही काही असोसिएशन सहकार्य करणार आहेत.

सद्यस्थितीत महिला व मुलींच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हावा व त्यांना स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत, या उद्देशाने कराटे क्षेत्रातील सहकारी भास्कर ढगे, प्रविण गडदे, हरिदास रोकडे, रफिक शेख, सुनील शिंदे, रणजित कोकणे, तानाजी माने, हरिश सुर्यवंशी, वैष्णवी सरडे, अपूर्वा कुलकर्णी अशा काही ब्लॅक बेल्ट सहकाऱ्यांसह प्रशिक्षण देण्याचा हा निर्णय घेतला आहे. या प्रशिक्षण शिबिरात फिजिकल फिटनेस सह कराटे मधील स्वसंरक्षणाचे तंत्र, ज्युडो व लाठीकाठीचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

भाजपच्या वतीने आयोजित सदरच्या प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून दोन महिने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी ज्या महिला व मुलींना आत्मसंरक्षण व आत्मसन्मानासाठी कराटे प्रशिक्षण घ्यायचे आहे त्यांनी हरिदास रोकडे ७८४१०३४६२८, योगिनी फुगारे ९४०५६६०६०३ , ऋतुजा खरे ९३०७७८६७६५ व वैष्णवी सरडे ९४०३७०७५९१ या क्रमांकावर संपर्क साधून ३० ऑगस्टपर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन युवराज नळे यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

**परंडा येथील जिल्हा न्यायालय-१, परंडा अपीलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस,**

रेग्युलर दिवाणी अपिल क्र.३६/२०२३

Sukhadeo / Vitthal

Respondent :-

2.Dattau Nivrutti Diwate (Died) through his Lrs.2/2.Nita Balasaheb Yadav

Age-45 yrs

R/o.Sirsav Tal- Paranda Dist -Dharashi (Osmanabad)

तुम्हास नोटीस देण्यात येते की नियमीत दिवाणी दावा क्र १७/२००४ विठठल विरुध्द दत्तु या प्रकरणांतील हुकुमनाम्यावर/आदेशावर अपेलेन्ट सुखदेव निवृत्ती दिवटे यांनी अपील सादर केले असुन ते या न्यायालयात नोंदविण्यात आले आहे तथापि सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.**२. दत्तु निवृत्ती दिवटे** नयत झालेले आहेत त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस आपण असल्याचे या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला असुन सदरचा अर्ज मंजुर होवुन सदरील अपिलामध्ये आपणास प्रतिवादी म्हणुन समाविष्ठ केलेले आहे. करीता सदरील अपिलावर सुनावणीसाठी **दिनांक १९/०९/२०२४** रोजी हा दिवस निश्चित केला आहे. तरी उपरोक्त दिवशी सकाळी १०.३० या न्यायालयात हजर रहावे. तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा या अपीलाच तुमच्या तर्फे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिक केलेलेली कोणीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत त्या अपीलाची सुनावणी करून निकाल देण्यात येईल.

**आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**स्वाक्षरित /-**
**(अधिक्षक)**
**जिल्हा न्यायालय-१. परंडा**
**(आदेशावरून)**



नांदेड- विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची वाड झाल्याने शनीवारी सायंकाळी प्रकल्पाचे दोन दरवाजे उघडण्याज आले. या दरवाज्यातुन ८९६ क्युमेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग होत आहे.

# महिला पत्रकारास अपमानस्पद वागणूक दिल्या प्रकरणी मुदखेड पत्रकार संघाच्या वतीने निषेध

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,२४ ऑगस्ट -**



बदलापूर येथील महिला पत्रकार यांना धमकी तसेच अपमानस्पद वागणूक दिल्या प्रकरणी मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.

बदलापूर याठिकाणी वार्ताकन करण्यासाठी पत्रकार मोहिनी जाधव गेले असता माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी असभ्य भाषेत अपमान करत धमकी दिली व अर्वच्य भाषेत शिवीगाळ करणाऱ्या वामन म्हात्रे यांना तात्काळ अटक करून ठोस कारवाई करण्यात यावी. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणुन पत्रकार ओळखला जातो या प्रकारच्या घटनामुळे घटना म्हणजे लोकशाहीची पायमल्ली तसेच आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे.सदर प्रत पत्रकारांच्या भावना लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना पाठविण्यात यावी व शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पत्रकार मोहीनी जाधव यांना न्याय मिळवुन देण्यात यावे असे निवेदन तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक प्रताप देशमुख तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन साब, दिनेश शर्मा, अतिक अहेमद, साहेबराव हौसरे, शेख जब्बार, शेख शमशोद्दीन यासह आदि पत्रकार बांधव उपस्थीत होते.

# लोहा शहरात ओबीसीच्या एल्गार सभेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,२४ ऑगस्ट -**

मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या.ओबीसी प्रवर्गातून नको अशी भूमिका घेऊन. वडीगोद्री येथे ओबीसी उपोषणकर्ते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे ओबीसींची एल्गार सभा आयोजित केली आहे या सभेचे आयोजक व संयोजक समितीचे माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी, ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.संजय पवार यांनी माहिती दिली

लोहा शहरात २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे ओबीसींची एल्गार विराट सभा आयोजित केली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटिल यांनी पुन्हा उपोषण करुन ओबीसी मधुनच आरक्षणाची मागणी केली.मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावे अशी भूमिका घेऊन ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे उपोषण करून विरोध केला.यांच्या उपोषणाला मराठवाड्यातून भरभरून ओबीसी बांधवांनी प्रतिसाद दिला. ओबीसी समाजाची एकजुट व समाज एकत्रीकरणा साठी प्रा.लक्ष्मण हाके व वाघमारे यांनी मराठवाड्यात दौऱ्याला सुरुवात केली असुन यांची २७ ऑगस्ट रोजी लोहा शहरात ओबीसीची एल्गार सभा आयोजित केली आहे.

राज्यातील ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला पाठिंबा दर्शवत महाराष्ट्रात आरक्षण बचाव यात्रा काढली होती .त्याच अनुषंगाने २ऑगस्ट रोजी लोहा शहरात या यात्रेचे उत्स्फूर्तपणे ओबीसी समाजाने स्वागत केले. शहराच्या परंपरेनुसार खारीक खोबर्याचा हार घालुन भव्य सत्कार करण्यात आला या आरक्षण बचाव यात्रेमुळे ओबीसी समाज जागृत झाला त्यांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण आहे.

कंधार लोहा तालुक्यातील ओबीसी समाज एकवटला पाहिजे .या करिता गजानन सावकार सूर्यवंशी व डॉ.संजय पवार, चंद्रसेन पाटील सुरनर सातत्याने परिश्रम घेत आहेत. ओबीसीचा मोरक्या प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची एल्गार जाहीर सभा २७ ऑगष्ट रोजी राधाई मंगल कार्यालय येथे दुपारी १२ वा. होणार आहे. सभेपूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत शहरातून भव्य मिरवणूक निघणार आहे. शहरातील महामानवांना अभिवादन केल्यानंतर या मिरवणुकीचे जाहीर सभेत रूपांतर होणार आहे. या एल्गार सभेसाठी कंधार व लोहा तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आसे आहवान केले आहे..या पत्रकार परिषदेला माधवराव मुसळे, उत्तम चव्हाण, आंगत केंद्रे ,सुदरसीग जाधव, बि एस मुंडे , रमेश माळी ,युवराज वाघमारे ,दत्ताभाऊ शेटे,केरबा केंद्रे, प्रभाकर केंद्रे, डॉ विश्वनाथ राठोड, विश्वनाथ गरजे, विठ्ठल खाडे, अशोक गीते यांची उपस्थित होती.

# सुधाकर भोयर यांना हटविण्यासाठी हदगाव- हिमायतनगरचे पदाधिकारी एकवटले

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,२४ ऑगस्ट -**



हदगाव - हिमायतनगर भाजपा विधानसभा प्रवास प्रमुख पदी सुधाकर भोयर यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष उफळून आला होता तर दिवसेंदिवसे कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी उमटत होती. त्याच अनुषंगाने प्रथम हदगाव व त्यानंतर हिमायतनगर येथे स्वतंत्ररित्या बैठक घेऊन दुसऱ्यांदा सुधाकर भोयर यांना पदावरून पायउतार करण्याकरिता भाजपाचे दोन्ही तालुक्यातील पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते लवकरच ही मागणी घेऊन मुंबईत धडकणार असून या ठिकाणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदन देतील त्यानंतर जिल्हा पातळीवरील नेते खा. अशोक चव्हाण, माजी खा. प्रतापराव पा. चिखलीकर, विक्रांत पाटील, संघटन मंत्री संजय कौडगे, उत्तरचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, तसेच रामदास पा. सुमठाणकर यांना सुद्धा निवेदन देण्यात येईल. सदरील निवेदनावर दोन्ही तालुक्यातील पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत हिंगोली मतदारसंघात युतीच्या उमेदवारास इतर विधानसभापैकी हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात बरोबरीने मतदान करून घेण्यासाठी बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियर्स, भाजपाचे सर्व आजी - माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रचंड मेहनत घेतली. भाजपास या मतदारसंघात अत्यंत पोषक वातावरण असताना सुद्धा शंभर किलोमीटर दूर असलेल्या मतदारसंघातील व्यक्तीची निवड होणे ही बाब पदाधिकारी व कार्यकर्ते यांना रुचली नाही. तरी झालेली निवड रद्द करून स्थानिक तालुक्यातील एका सामान्य कार्यकर्त्यांची निवड करावी जेणेकरून त्याचा संपूर्ण फायदा पक्षाच्या संघटन वाढविण्यासाठी होईल म्हणून आमच्या भावना लक्षात घेऊन ही निवड तात्काळ रद्द करावी अशी ही मागणी यावेळेस करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली.

**सुधाकर भोयर यांचा कार्यकाळ राहिला वादग्रस्त**

सुधाकर भोयर हे यापूर्वी जिल्हाध्यक्ष पदावर असताना हदगाव-हिमायतनगर तालुक्यामध्ये पदाचा गैरवापर करून वरिष्ठांना विश्वासात न घेता स्वतःची मनमानी करून दोन्ही तालुक्यांमध्ये अंतर्गत गटबाजी केल्यामुळे ही गटबाजी आता कुठेतरी निवळत असताना पुन्हा त्याच व्यक्तीची निवड झाल्या असल्यामुळे संपूर्ण कार्यकर्त्यात असंतोष पसरला आहे.

# आ. भीमराव केरामांनी केली विकासकामांची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,२४ ऑगस्ट -**



किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार भीमराव केराम यांनी इस्लापूर परिसरात विकासात्मक कामाचा सपाटा लावला असून तब्बल एक कोटी ७५ लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी इस्लापूर या ठिकाणी देण्यात आली. त्यामध्ये समाज मंदिर रस्ते असे विविध कामे आमदार निधी व इतर योजनेच्या माध्यमातून टाकण्यात आली. विशेषतः गेल्या ३५ ते ४० वर्षापासून ग्रामस्थांकडून सातत्याने जिल्हा परिषद शाळेकडे गावातून जाणाऱ्या रस्त्याच्या मागणी पाठपुरावा केला होता पण अद्याप पर्यंत कुठल्याही लोकप्रतिनिधीने या बाबतीत लक्ष केंद्रित केले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुख्य रस्ता सोडला तर कुठल्याही रस्त्याने शाळेला जाता येत नव्हते. त्यामुळे मुख्य रस्त्यावर सारखी वर्दळ असायची त्यामुळे अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढले होते. सदरील कामावर प्रत्यक्ष जाऊन आमदाराने जातीने लक्ष वेधून या कामाची पाहणी केली.

या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला विद्यार्थ्यांचे चेहऱ्यावरील हास्य पाहूण आमदारांनी समाधान व्यक्त केले. सदरील काम दर्जेदार पद्धतीने व वेळेच्या आत पूर्ण केल्याने केल्यामुळे या कामाचे गुत्तेदार विजय घोगरे यांचे सुद्धा त्यांनी कौतुक केले. इस्लापूर परिसरातील सर्वच कामी दर्जेदार स्वरूपाची व्हावी ही अपेक्षा सुद्धा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. मतदारसंघांमध्ये कुठलेही विकासात्मक काम करताना मी जातपात बघितली नाही ना मला या गावातून किती मतदान पडले हे सुद्धा मी बघितले नाही मी लोकप्रतिनिधी असल्याने माझ्या मतदारसंघाचा विकास करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. विकासाच्या बाबतीत झालेल्या कामाची व शासनाच्या राबवण्यात येणारे योजनेची भाजपाच्या कार्यकर्त्यांनी माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावी व निराधार चे प्रश्न असो लाडली बहिणीचे प्रश्न असो सोडवावीत अशा सूचना सुद्धा याप्रसंगी आमदार भीमराव केराम यांनी दिल्या. या कार्यक्रमाच्या प्रसंगी किनवट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, आदिवासी नेते गोविंद अंकुरवाड, माजी उपसभापती कपिल करेवाड, सा. पोलीस निरीक्षक उमेश भोसले, अभियंता श्रीराम पाटील, कमलबाई देशमुख, तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुकाराम बोनगीर, मा.सरपच देविदास पळसपुरे, भाजपा सचिव काशिनाथ शिंदे, माधव बोंबले, राजलिंग चटणे पांडुरंग जाधव रमेश पडवळ, पेवे सर, सुर्यकांत बोधनकर, रवी कसबे, प्रकाश दंडे सरपंच प्रतिनिधी नारायण शिनगारे, ग्रामविकास अधिकारी शंकर गर्दसवार, श्रीधर रेड्डी, भूमेष किनी , संचालक सत्यनारायण जाधव, बालाजी काळे, यांच्यासह परिसरातील भाजपाचे अन्य पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अत्याचार करणाऱ्यांना तात्काळ फासावर द्या

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,२४ ऑगस्ट -**



बदलापूर जिल्हा ठाणे येथील आदर्श विद्या मंदिरात शिक्षण घेणारी चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतील सफाईगारांनी लैंगिक अत्याचार केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजले आहे.एका लहान निरागस बालिकेवर अशा पद्धतीने अत्याचार जर होत असेल, तर या पुरोगामी महाराष्ट्राला लाजीरवाणी गोष्ट म्हणावी लागेल.तसेच चाकूर जिल्हा लातूर येथे सुद्धा साडेचार वर्षाचा बालकेवर सुद्धा लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे.मौजे काजीखेड तालुका बाळापूर जिल्हा अकोला येथील माध्यमिक जिल्हा परिषद येथे शिक्षण घेणारे इयत्ता आठवी वर्गात असणारी मुलींला अश्लील व्हिडिओ दाखवत अत्याचाराचा प्रयत्न केला गेला आहे. अत्याचार करण्याचा प्रयत्न नराधम शिक्षक प्रमोद सरदार यांनी केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.या वाढत्या घटनांमुळे शहरासह तालुक्यात लहान मुलींवर व शालेय युवती,मुलींना शाळेत व शिकवणी वर्गाकडे कसे पाठवावे?अशी चिंता पालक वर्गांना वाटत असल्याने, वाढत्या घटनेवरुन मुलींचे कुटुंब भयभीत झालेआहे.दिवसेंदिवस महिला,युवती व लहान बालिकेवर मोठ्या प्रमाणात अन्याय,अत्याचार वाढतआहेत.यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनता भयभीत झालेली आहे. महाराष्ट्र राज्य कायद्याचे राज्य आहे की नाही?अशी भावना निर्माण झाली आहे.अत्याचार प्रकरणातील दोषीं नराधमाला कठोरातील कठोर फाशीची शिक्षा अतिजलद न्यायालयात प्रकरण चालवुन त्यांना लवकरात लवकर फाशी देण्यात यावी. अशी मागणी तालुक्यातुन आता समोर येत आहे.तसेच मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातुन शिक्षण घेण्यासाठी मुलीं,युवती शहरात येतआहेत. शहरातील परमेश्वर मंदिर देवस्थान परिसरात आणि हुतात्मा जयवंतराव पाटील विद्यालय, राजा भगीरथ विद्यालय,शासकीय आयटीआय परिसर, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी शाळा सुरु होताना व शाळा सुटल्यानंतर रस्त्यावर पोलीस स्टेशन कडून कडक बंदोबस्त लावून, रोडवर टवाळखोरी करणाऱ्या मुलांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यामुळे मुलीच्यां छेडछाडी, अत्याचार प्रकरणावरआळा बसेल,याची तातडीने दक्षता घेण्यात यावी.अशी मागणी एका निवेदनाद्वारे तहसीलदार पल्लवी टेमकर व पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या केली आहे.

यावेळी परमेश्वर गोपतवाड ,श्रीदत्त पवार सोनारीकर,विलास वानखेडे, संजय माने, धोंडोपंत बनसोडे, अँड ज्ञानेश्वर पंदलवाड,निलेश चटणे, पंडित ढोणे,भानुदास पोपुलवाड ,शिरफुले पाटील, जाधव, सह अनेक जण उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### पुण्यजागर परिवाराच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयां सोबत रक्षाबंधनाचे आयोजन

**अर्धापूर** -पुण्यजागार परिवार् व तालुका पत्रकार संघाच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयां सोबत रक्षाबंधनाचा कार्यक्रम रविवारी (ता २५) आयोजित करण्यात आला आहे. पुण्यातील भोई फाऊंडेशने नांदेड जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आहे.गेल्या आठ वर्षांपासून पुण्यजागर हा शैक्षणिक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.शेतकरी कुटुंबातील सदस्यांशी भावनिक व स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी दिवाळी, रक्षाबंधन, रंगोत्सव आदी सण उत्सव एकत्रित साजरे करण्यात येतात.यंदाचा रक्षाबंधनाचा कार्यक्रम नांदेड शहरातील श्री संत पाचलेगावकर महाराज अश्रामात रविवारी सकाळी अकरा वाजता होणार आहे.कार्यक्रमास भोई फाऊंडेशने अध्यक्ष डॉ मिलिंद भोई, महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे तांत्रिक अधिकारी हेमंत गोसावी, पल्लवी वाघ,गितांजली देगावकर, डॉ ज्योती पुरंदरे, बी आर कदम, बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, अँड किशोर देशमुख आनंद बोंढाकर, इंजिनिअर विश्वांभर पवार, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर टाक, दत्ता टोकलवाड यांची उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन पुण्यजागर. प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, नागोराव भांगे, गुणवंत विरकर, निळकंठ मदने.साबेर शेख यांनी केले आहे.

### बदलापूर घटनेचा निषेध

**भोकर**-देशासह महाराष्ट्रात महिला व बालिकांवर झालेल्या अमानुष अत्याचारा विरोधात भोकर महाविकास आघाडी तर्फे दि.२४ रोजी काळ्या फिती बांधून शासनाच्या विरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयापर्यंत मूक रॅली काढण्यात आली व तसेच बांगड्या फोडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. निवेदनाद्वारे दोषींना त्वरित फाशी देऊन पिडीतांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली.यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गोविंद पाटील गौड,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हा उपप्रमुख सतीश देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड.शिवाजी कदम,सुभाष पाटील किन्हाळकर,सुरेश बिल्लेवाड,आप्पाराव राठोड, भीमराव दुधारे,काँग्रेस शहराध्यक्ष तौसिफ इनामदार, निळकंठ वर्षेवार, अँड.परमेश्वर पांचाळ, शिवसेना शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार,रमेश महागावकर, आनंद चिट्टे,यशोदाबाई शेळके,शकूंतला कदम कमल नर्तावार,आनंदाबाई चुनगुरवाड,सुरेखा माळे आदींची उपस्थिती होती.

# विविध मागण्यांसाठी सोमवारी रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,२४ ऑगस्ट -**


संविधान रक्षक समितीच्या वतीने जनसामान्यांच्या विविध मागण्यांसाठी आजपर्यंत डझनभर निवेदन व दोन वेळा तहसिल कार्यालयावर हजारो नागरिकांचा मोर्चा काढून ही तहसील प्रशासन कुंभकर्णी झोपेचे सोंग घेत आहे. याच्या निषेधार्थ व तालुक्यातील तलाठी, मंडळाधिकारी, ग्रामसेवक सज्जावर मुक्कामी रहावे यासाठी सोमवार दि.२७ ऑगस्त रोजी तहसिल कार्यालयासमोर रास्ता रोको व बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे निवेदन माजी जि.प.सदस्य तथा समिती संस्थापक दशरथराव लोहबंदे यांनी तहसिलदार राजेश जाधव यांना दिले.

# खासदार सुपुत्र प्रा. रविंद्र पाटील हेच नायगांव विधानसभेचे उमेदवा :प्रल्हाद ढगे

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,२४ ऑगस्ट -**

नायगांव विधानसभा माजी आमदार तथा लोकसभेचे विदेमान खासदार यांचे सुपुत्र बुंडू पाटील उर्फ प्रा. रविंद्र चव्हाण यांना नायगाव मतदार संघात विद्यानसभेचे तिकीट मिळणार असून तेच योग्य आहेत असे प्रतिपादन उमरी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद पाटील इज्यतगावकर यांनी प्रतिक्रीया दिली आहे.

प्रल्हाद पाटील ढगे पुढे म्हणाले की नामगाव विधानसभा २०२४ ची निवडणूक प्रा.रविंद्र चव्हाण हेच लढविणार असून. कांही राजकीय महत्वाकांक्षी लोक खा.वसंतराव चव्हाण यांचा प्रकृतीचा विषय घेऊन नायगांव मतदार संघात वेगळी चर्चा करीत असल्याचे कळते, कोणीही राजकीय व्यक्ती असो त्यांच्या प्रती अशा दूख:द प्रसंगी समाजामध्ये माणुसकीला न-शोभणारी वक्तव्य करुन टपोरी राजकारण करणाऱ्यांना नेत्याना जनता कधीही माफ करणार नाही अनेक दू:ख पचविण्याची शक्ती चव्हाण परिवार नायगांवकर यांचेकडे ईश्वराने अगोदरच दिली असल्याने या प्रसंगातूनही सूखरूप बाहेर येतील अशी हजारो जनसमुदायाच्या प्रार्थनेतून नक्कीच बरे होतील. असा ठाम विश्वास आहे. खा.वसंतराव चव्हाण यांच्या प्रकृतीत दैनंदीन सूधारणा होत आहे.



येणाऱ्या नायगांव विधानसभा मतदार संघाची निवडणूक प्रा.रविंद्र चव्हाण हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार असतील व निवडणूक लढवतील. तेव्हा सध्याच्या आडचनीच्या प्रसंगाच्या माध्यमातून राजकीय पोळी भाजू पहाणाऱ्या कावेबाज दुबळया प्रकाराला कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता बळी पडणार नाही आणि चव्हाण परिवारावर प्रेम करणारा लाखो जनसमुदाय कोणत्याही प्रसंगी यांच्या सोबत खंबीरपणे उभा राहील यात काही शंका नांही असा विश्वास प्रल्हाद पाटील इज्जतगावर यांनी केला आहे . मतदार संघातील सर्व कार्यकर्ते चव्हाण परिवारांच्याच पाठीशीच आहेत असा ठाम विश्वास व्यक्त करतो असे ही म्हणाले

प्रा.रविंद्र वसंतराव चव्हाण हे दि. २५ व २६ ऑगस्ट रोजी नायगांव येथे कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी उपस्थीत रहाणार आहेत. असे खा.वसंतराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय नायगांव यांच्या वतीने कळविण्यात आले आहे प्रतिक्रीया दिली आहे.

# सकल मुस्लिम समाजाच्या वतीने नरसी बंदला चांगला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,२४ ऑगस्ट -**



महम्मद पैगंबर यांच्या बद्दल रामगिरी महाराज यांनी अपशब्द वापरून दोन समाजात तेढ निर्माण केल्याबद्दल त्यास त्वरित अटक करा असे सकल मुस्लिम समाजाच्या वतीने आज दि. २३ ऑगस्ट रोजी शुक्रवारी सकाळी नरसीतील सर्व बाजारपेठ बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पोलीस व मुस्लिम समाजात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

नायगाव तालुक्यातील नरसी चौकात सकल मुस्लिम समाजाच्या वतीने बाजारपेठ बंद करण्यासाठी शंभर ते दीडशे लोकांनी पुढाकार घेऊन बाजारपेठ बंद करण्यासाठी पुढे आले होते यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यास स्वयंस्फूर्तीने जो कोणी दुकाने बंद ठेवत असेल त्यांना ठेऊ द्या ज्यांना चालू ठेवायची असतील त्यांना चालू ठेवू द्या असे म्हणाले असता मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांत व पोलीस यांच्यात काही वेळ तणाव निर्माण झाला होता.

सपोनी श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांना जो तुम्ही आज बंद ठेवून निषेध करत आहात तो ऑलरेडी गुन्हा दाखल झालेला आहे जर तुमच्या आणखी काही मागणी असतील तर मी तसे वर कळवतो असे म्हणाले, तुम्ही आज बाजारपेठ बंद करण्यासाठी आलात ज्यांना बंद करायचा असेल ते स्वंयस्फुरतीने बंद करतील आणि ज्यांना चालू ठेवायचा असेल त्यांना चालू ठेवू द्या दमदाटी करायची नाही असे म्हणताच मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांनी आज आम्ही बाजारपेठ बंद करत असताना आम्हाला तुम्ही का करू देत नाही आणि दुसरा समाज कोणता जर त्यांच्या हक्कासाठी निषेध व्यक्त करण्यासाठी आमची दुकाने बंद ठेवायला सांगतात त्यावेळेस आम्ही बंद ठेवतो आज तुम्ही त्यांची दुकाने चालू ठेवा असे का मनत आहात, यावेळी सपोनि श्रीधर जगताप यांनी सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्तास आपल्या आणखी काही मागण्या असतील तर ते आपण रितसर निवेदन द्यावे आम्ही वर कळवतो अशी समज देऊन आपण करत असलेला बंद व निषेध रीतसर करावा असे म्हणाले तेव्हा सकल मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. व महंमद पैगंबर यांच्याविषयी अपशब्द वापरल्यामुळे सकल मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत त्यासाठी रामगिरी महाराज यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच लवकर अटक व्हावी अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी बंद दरम्यान सपोनि जगताप यांनी नरसी चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## संक्षिप्त वृत्त



### येरोळ जिल्हा परिषद प्रशालेत शालेय साहित्य वाटप

**शिरूर अनंतपाळ, दि. २४ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला येरोळ येथील शाळेचे माजी विद्यार्थी येरोळ गावचे सुपुत्र पद्माकर निळकंठराव कुलकर्णी यांचे चिरंजीव अभिलाष कुलकर्णी हे अमेरिकेतील गूगल या नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनीयर या पदावर कार्यरत आहेत तर त्यांनी आपले वडील ज्या शाळेत शिकले त्या शाळेसाठी फुल ना फुलाची पाकळी म्हणून काही तरी करण्याची इच्छा आहे , अश्या प्रकारची इच्छा व्यक्त केली असे कुलकर्णी कुटुंबियांचे मित्र जिजामाता विद्यालयाचे प्रा.अभय येरोळकर यांनी विद्यार्थ्यांसमोर मनोगत व्यक्त करताना सांगितले, तसेच अभिलाष कुलकर्णी यांनी लगेच कौटुंबीक मित्र प्रा.अभय येरोळकर यांच्या माध्यमातून ५०,००० हजार रुपयाचे शैक्षणिक साहित्य ज्यामध्ये २०,००० हजार रुपयांचे स्टडी टेबल, १५,००० रुपयांचे १० फॅन, १०,००० रुपयांचे साऊंड सिस्टीम संच त्याबरोबरच गरजू विद्यार्थ्यांना ५००० रुपयांचे शैक्षणिक साहित्य ही त्यांनी शाळेला दान दिले. या शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक डी.एन.निचळे, व प्रमुख पाहुणे म्हणून येरोळ गावचे माजी सरपंच प्रा.अभय येरोळकर , रमेश दिवाणजी कुलकर्णी, ओबीसी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.प्रभाकर चोचंडे, मोहन गंभीरे, मतिसागर कंदीले, राजेंद्र साकोळकर, नंदू पाटील, नंदकिशोर साकोळकर, शादुल मुजेवार, शालेय समितीच्या उपाध्यक्षा शिल्पा पाटील,उद्धव वाघमारे,पत्रकार नितेश झांबरे व प्रशालेतील सर्व शिक्षक स्टाफ उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक शेख यांनी केले व आभार शाळेचे मुख्याध्यापक निचळे डी.एन यांनी मानले व या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी पालक व गावकरी मंडळी उपस्थित होते तसेच सर्व विद्यार्थ्यांनी कुलकर्णी कुटुंबीयांचे आभार मानले व त्यांच्या या शालेय साहित्य वाटपाच्या मौलिक कार्याबद्दल सर्व स्तरांतून कौतुक ही होताना दिसून आले.



### चन्नबसवेश्वर महाविद्यालयात थॅलेसेमिया आजारावर जनजागृती

**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसेमिया जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी व्याख्याते डॉ. मंगेश कुलकर्णी, संचालक सिट्रस डायग्नोस्टिक्स प्रा. लि., लातूर उपस्थित होते. डॉ. कुलकर्णी म्हणाले, सदोष जनुकांमुळे होणाऱ्या या आजाराचं निदान काही चाचण्यांद्वारे केलं जातं. माणसाच्या रक्ताच्या तपासण्या व त्यानंतर जनुकीय चाचणीतून त्याचं निदान होतं. जर माता आणि पिता या दोघांनाही थॅलेसेमिया मायनर असेल तर त्यांच्या अपत्यालाही तो होण्याची शक्यता असते. तसेच दोघांपैकी एकाला थॅलेसेमिया मेजर असेल तर त्यांच्या अपत्याला तो होण्याचा धोका असतो. सूत्रसंचालन प्रसाद मेनकुदळे तर आभार प्रदर्शन श्री. चेतन पंढरीकर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनचे डॉ. अभिजीत मुगळीकर, चेतन पंढरीकर, गिरीश पेंसलवार, किशोर दाताळ, विष्णुदास तोष्णीवाल, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. विवेक पंचाभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, प्रा. सुनील हिंडोळे, रा.से.यो. समन्वयक प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. भीमाशंकर हूच्चे उपस्थित होते.


### शास्त्री विद्यालयात सखी सावित्री समिती गठन करण्यासंदर्भात बैठक

**उदगीर, दि. २४ ऑगस्ट-**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात राज्यातील मुला मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी शाळा स्तरावर 'सखी सावित्री समिती' गठन करण्याबाबत शासन निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यालयात मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शिक्षक, महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुढील काळात मुला मुलींच्या सुरक्षेतेसाठी व निकोप वातावरण रहावे यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका यांच्यात चर्चात्मक बैठक झाली.आगामी काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये भयमुक्त व निकोप वातावरणासाठी वेगवेगळ्या शिक्षक व शिक्षिकांनी आपआपली मते मांडली. उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नेमट यांनी समिती गठीत करण्यासंदर्भात मौलिक सूचना मांडल्या. तर मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांनी सर्वांना तातडीने पुढील काळात' सखी सावित्री समिती' गठन करण्यासंदर्भात कार्यवाही कशी करावी?.या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

### कमलादेवी कर्वा यांचे निधन

**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**



सामाजिक कार्यकर्ते सत्यनारायण कर्वा यांच्या पत्नी आणि प्रेमा ईश्वरचंद्र बाहेती यांच्या मातोश्री कमलादेवी कर्वा (९०) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवारी सकाळी १० वा. त्यांच्या निवासस्थानापासून (सिंधू अपार्टमेंट, देशिकेंद्र विद्यालयाजवळ, लातूर ) निघून मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार संपन्न होतील. त्यांच्या पश्चात पती, राजगोपाल करावा, श्रीकांत कर्वा, ही दोन मुले, दोन विवाहित कन्या, लक्ष्मीकांत, योगेश हे पुतणे, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# महाविकास आघाडीतर्फे महिला अत्याचाराच्या घटनांचा काळ्या फिती लावून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २४ ऑगस्ट-**



महाविकास आघाडी व सामाजिक संघटनेच्या वतीने शनिवार दि २४ ऑगस्ट रोजी निलंगा येथील उपविभागीय कार्यालयासमोर प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस चे प्रदेश सचिव अभय साळुंके, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधीर मसलगे, शिवसेनेचे हरिभाऊ सगरे, माजी सभापती अजित माने,यांच्या प्रमुख उपस्थितीत काळ्या फिती लावून बदलापुरसह राज्यात घडलेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनेचा व राज्य सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना अशोकराव पाटील-निलंगेकर म्हणाले की, सध्याचे सरकार हे कुचकामी सरकार आहे. हे राज्य बलात्काराचा अड्डा बनला असून नराधमांना तात्काळ फाशी द्यावी. या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. प्रदेश सचिव अभय साळुंके म्हणाले की, देशात व राज्यात भाजप सरकार जातीय तेढ निर्माण करीत आहे. तसेच शिवसेनेचे हरिभाऊ सगरे म्हणाले की,हा महाराष्ट्र एकसंघ राहण्यासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे. हा महाराष्ट्र कोणी तोडण्याचा प्रयत्न केला तर आम्ही कदापिही ते होऊ देणार नाही.

यावेळी माजी नगराध्यक्ष हमीद शेख, दयानंद चोपणे,शहराध्यक्ष अजित नाईकवाडे,राष्ट्रवादी सेलचे जिल्हाध्यक्ष इस्माईल लदाफ,शहराध्यक्ष इफरोज शेख, अशोक शेटकार, अमोल सोनकांबळे, प्रशांत वांजरवाडे, मुजीब सौदागर,उपाध्यक्ष सोनाजी कदम, पंकज शेळके, सुधाकर पाटील, गोविंद सुर्यवंशी, शब्दर कादरी, समद टेलर, डिसीसीचे व्यंकटराव शिंदे, अनिल अग्रवाल, उपाध्यक्ष वीरभद्र आग्रे, शरणाप्पा मूळे, बालाजी शिंदें, महेश चिकराळे, शिवाजी चव्हाण, संतोष चव्हाण, गोविंद धुमाळ, तुराब बागवान, गफारभाई लालटेकडे, सोहेल शेख, आवेज शेख, फैसल शेख, मुगळे दाजी, रोहन सुरवसे, शुभम कांबळे, बालाजी ढगे, निजाम शेख ,नसीम तांबोळी, शहीद चाऊस तसेच काँग्रेस,राष्ट्रवादी व शिवसेना आणि सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, महिला कार्यकर्ते, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



## विकास कामांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

लातूर तालुक्यात ३१ डिसेंबर २०२१ रोजी नवनिर्मित झालेल्या काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीस काही राजकीय नेते मंडळींची व प्रशासकीय अधिकाऱ्यांची नजर लागली असल्यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता धारकांच्या मालमत्तेच्या विशेषतः खुल्या प्लॉटच्या नोंदी घेते वेळी संबंधित ग्रामसेवक व प्रशासक हे अकृषी परवाना/ गुंठेवारी ले आउट किंवा मंजूर ले आउट याची खातरजमा न करता बेकायदेशीरपणे नोंदी घेऊन संबंधितांकडून लाखो रुपये रकमा वसूल करून भ्रष्टाचार करत आहेत, तसेच काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत हद्दीत गरज नसलेल्या ठिकाणी ग्रामपंचायतीचा निधी खर्च करून आवश्यक ठिकाणी रस्ते व इतर सुविधा पुरविण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. तरी याबाबत आम्ही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना याबाबत चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कडक कार्यवाही करावी, हि मागणी केली आहे. सदरील मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला. सदरील निवेदनावर ॲड.किरण बडे, ॲड.प्रभाकर केदार, विष्णू शिंदे, महादेव जमादार, प्रकाश शिंदे, ड.सतिष धायगुडे, भास्कर लहाने, इरफान पठाण, वसिम पठाण, ड.प्रविण भोसले, विशाल सुर्यवंशी, उदय भैय्या गोजमगुंडे, ड.किशोर बडे, बदरुद्दीन सातभाई, माधव येनाकफळे, गोविंद बडे, संग्राम केळे, आकाश जमादार, अभिजीत मद्दे, बाबुराव ढाकणे, गिरी महाराज, आशिष व्यवहारे, ॲड.सचिन भताने, प्रल्हाद मुरकुटे, प्रताप गोरे, प्रविण मुरकुटे यांच्या सह्या आहेत.



## समर्थ विद्यालयात इको क्लबची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २४ ऑगस्ट-**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या मनात शालेय जीवनात पर्यावरणाबद्दल जाणीव जागृती व्हावी म्हणून गुरूवारी इको क्लबची स्थापना करण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्था सचिव प्राचार्य प्रमोद चौधरी उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, प्रा. बी. एस. बाबळसूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. इको क्लबचे अध्यक्ष म्हणून सार्थक गोविंदराव जाधव यांची निवड जाहीर करून त्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख संरक्षक म्हणून मुख्याध्यापक प्रमोद व्यंकटेश चौधरी हे काम पहाणार आहेत. तर प्रभारी शिक्षक म्हणून प्रदीप अण्णाराव केंद्रे असणार आहेत. प्रास्तविक रसूल पठाण यांनी केले. सूत्रसंचलन इको क्लबची सदस्या मोनिका उत्तम काबळे या विद्यार्थिनीने केले. तर आभार नेहा राजकुमार कांबळे हिने मानले.

# औसा शहरात व्यापारी संकुलासाठी १० कोटींचा निधी

## न्यायालयासमोरील पालिकेच्या आरक्षित जागेवर होणार उभारणी

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २४ ऑगस्ट-**

औसा शहरातील पालिकेच्या आरक्षित जागेवर झालेले सर्व अतिक्रमण काही महिन्यांपूर्वी काढण्यात आले. या दरम्यान शहरातील रस्ते विकास व दळणवळणाच्या दृष्टीने केलेल्या कारवाईनंतर विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे पुनर्वसन करण्याचा शब्द आ अभिमन्यू पवार यांनी दिला होता. याची पूर्तता म्हणून पहिल्या टप्प्यात औसा न्यायालया समोरील पालिकेच्या आरक्षित जागेवर १० कोटींचे व्यापारी संकुल उभारले जाणार असून अतिक्रमण मोहिमेतील विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे पुनर्वसन केले जाणार आहे.



औसा शहराची लोकसंख्या ५० हजारांहून अधिक झाली आहे. शाळा, कॉलेज, शासकीय काम व खरेदी - विक्री अशा कामासाठी शहरात दररोज येणाऱ्या नागरिकांची संख्याही खुप मोठी आहे. शहर अतिक्रमणाच्या विळख्यात अडकल्याने हजारो नागरिकांना, वाहनचालकांना दररोज याचा त्रास होत होता. शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी शहर प्रशासनाच्या वतीने शहरातील अतिक्रमणे काढण्यासाठी काही महिन्यांपूर्वी मोहीम राबविली गेली. पण या कारवाईमुळे कांही लहान मोठ्या व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांपुढे अडचणी निर्माण झाल्या .अशा अडचणीत आलेल्या लहान मोठ्या व्यवसाईकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने आ अभिमन्यू पवार यांनी औसा शहरातील कोर्टासमोरील आरक्षित शासकीय जमिनीवर भव्य व्यापारी संकुल उभारण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत १० कोटी रु. निधी मंजूर करून घेतला आहे . शहर प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या अतिक्रमणमुक्त औसा शहर अभियानात विस्थापित झालेल्या लहानमोठ्या व्यापाऱ्यांचे आणि दुकानदारांचे व्यापारी गाळ्याच्या माध्यमातून हक्काच्या जागेत पुनर्वसन करता येणार आहे. पहिल्या टप्प्यात भव्य व्यापारी संकुलासाठी १० कोटींचा निधी मंजूर झाला असून या निधीतून सहा महिन्याच्या आत भव्य व्यापारी संकुल उभारले जाणार आहे. यामध्ये प्राधान्याने अतिक्रमण मोहिमेतील विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे पुनर्वसन केले जाणार आहे. यानंतरही वेगवेगळ्या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून त्या माध्यमातून आणखी व्यापारी संकुल उभारले जाणार असून औसा शहराच्या व्यवसाय विकासासाठी एक मोठी उपलब्धी ठरणार आहे.

गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत आ अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे औसा शहराच्या विकासासाठी चारशे कोटींच्यावर निधी प्राप्त झाला आहे . या निधीतून शहराच्या विविध भागात विकासकामे होताना दिसत आहे. या व्यापारी संकुल उभारणीतून शहराच्या व्यवसायात वाढ होणार आहे. संकुलासाठी निधी मंजूरीत भरीव सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आ. अभिमन्यू पवार यांनी आभार मानले आहेत.

## लातूर जिल्हा सत्र न्यायालयाने अरविंद खोपे मृत्यूप्रकरणातील आरोपीचा जामीन फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. २४ ऑगस्ट-**

लातूर शिक्षण पॅटर्नला काळीमा फासणा-या भाजपा पदाधिकारी माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर हे अध्यक्ष असलेल्या जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळाद्वारा (जेएसपीएम) संचलित येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ वसतिगृहात इयत्ता ७ वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या १३ वर्षीय अरविंद खोपे याचा संस्थेच्या वस्तीगृहात संशयास्पद मृत्यूच्या घटनेत पोलीसांनी पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असेलेल्या दोन्ही आरोपींचा जामीन मागणीचा अर्ज लातूर जिल्हा सत्र न्यायालयाने गुरुवारी फेटाळला.

येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ वसतिगृहात अरविंद खोपे या अल्पवयीन मुलाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना मंगळवार दि. २९ जुलैच्या रात्री घडली होती. मुलाचा खुन करण्यात आल्याचा आरोप चिमुकल्या अरविंदच्या पालक व नातेवाईकांडून केला जात आहे.

याप्रकरणी सदरील गुन्हा दाखल असलेल्या एमआयडीसी पोलीसांनी स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ वसतिगृहातील कर्तव्यावर असलेल्या वस्तीगृह व्यवसथापक विठ्ठल सुर्यवंशी व विनायक टेकाळे नामक व्यक्तीना अरविंदच्या मृत्यूचा पुरावा नष्ट केल्या प्रकरणी गजाआड केले होते. या आरोपींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती. या आरोपींनी जिल्हासत्र न्यायालयाकडे जामीन मागणीचा अर्ज केला होता. या जामीन अर्जावर दि. २१ ऑगस्ट रोजी सुनावणी पार पडली.

या जामीन अर्जावर जिल्हा सत्र न्यायालयाने दि. २२ ऑगस्ट रोजी सदरील २ आरोपिंचा जामीन अर्ज आज फेटाळल्याचा निर्णय दिला. सुणावणी दरम्यान सरकार पक्षातर्फे ॲड. लक्ष्मण शिंदे यांनी तर फिर्यादी पक्षातर्फे ॲड. प्रतिक कांबळे, ॲड. रमक जोगदंड, ॲड. प्रितम कांबळे, ॲड. महेबुब घंटे यांनी बाजू मांडली आहे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वकील फोरम लातूरचे सर्व पदाधिकारी यांनी मार्गदर्शन केले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या शिलेदारांसोबत लातूर जिल्ह्यात दुजाभाव

**सन्मानाची वागणूक द्या; शिवसैनिकाचे मंत्री संजय बनसोडेंना पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. २४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्यात महायुतीच्या माध्यमातून महिला, पुरुष,युवक, अपंग, दुर्बल, शेतकरी, शेतमजूर, कामगार अशा अनेक घटकांसाठी विविध योजना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महायुतीच्या माध्यमातून प्रभावीपणे राबवत आहेत तसेच अनेक कार्य जलदगतीने होत असतानाच लातूर जिल्ह्यात निधी वाटपावरून महायुतीमधील मतभेद चव्हाट्यावर आला आहे. क्रिडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्यावर जिल्ह्यातील शिवसैनिक व पदाधिकारी नाराज असल्याचे पत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ग्रामीण जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांनी बनसोडे यांना लिहले आहे.



महायुतीच्या घटक पक्षातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना सन्मानपूर्वक वागवा अशा आशयाचे पत्र शिवसेना ग्रामीण जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांनी संजय बनसोडे यांना पत्र देऊन मागणी केली आहे.जिल्हा प्रमुख गोपाळ माने यांनी पत्रात असे नमूद केले आहे की,शिवसेनेतील पदाधिकार्यांसोबत मंत्री बनसोडे दुजाभाव करीत आहेत.आमचे प्रेम त्यांच्यावर आहे पण त्यांचे प्रेम आमच्या वर नाही त्यामुळे आमचे एकतर्फी प्रेम काय कामाचे असा प्रश्न माने यांनी उपस्थित केला आहे. तसेच आपण लातूर जिल्ह्यासाठी कोट्यावधीचा निधी खेचून आणलात मात्र त्यातील ऐंशी टक्के निधी स्वतःच्याच मतदार संघासाठी खर्च केलात. तसेच जिल्ह्यात होत असलेल्या शासकीय किंवा महत्वाच्या बैठकीस शिवसैनिक व पदाधिकारी यांना बोलवले जात नाही.हा अतीशय क्लेशदायक प्रकार लातूर जिल्ह्यात जाणीवपूर्वक केला जात आहे. आगामी काळात आमचे एकतर्फी प्रेम समजून घेऊन लातूर जिल्ह्यात महायुतीच्या अस्तित्वासाठी आम्हा शिवसैनिकांना सन्मानाची वागणूक देऊन महायुतीचा धर्म पाळा असा विनंती वजा सल्ला पत्रातून शिवसेना जिल्हाप्रमुख व पदाधिकारी यांनी संजय बनसोडे यांना दिला आहे.

# 'विकासाची वारी...जनतेच्या दारी' पदयात्रेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २४ ऑगस्ट-**

माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेचा तालुक्यातील माकणी थोर येथून शुभारंभ झाला. विकासाची वारी... जनतेच्या दारी या पदयात्रेच्या शुभारंभ कार्यक्रमाला पंचक्रोशीतील हजारो नागरिक व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. अध्यक्षस्थानी मधुकर आण्णा माकणीकर होते. यावेळी माजी खा.श्रीमती रूपाताई पाटील निलंगेकर, बसवकल्याणचे आमदार शरणू सलगर,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, युवानेते अरविंद पाटील निलंगेकर, माजी खा. डॉ सुनील गायकवाड, भगवानराव पाटील तळेगावकर, माजी आमदार शिवाजीराव पाटील-कव्हेकर, राहूल केंद्रे, मिलिंद



लातूरे, प्रेरणा होनराव, देविदास काळे, संजय दोरवे, शेषेराव ममाळे, दगडू सोळुंके, गोविंदराव चिलकुरे तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, मंगेश पाटील, काशीनाथ गरीबे यांच्यासह हजारो कार्यकर्ते या पदयात्रेत सहभागी होते.

आ. निलंगेकरांनी प्रथम जाज्वल्य देवस्थान माकणीचे ग्रामदैवत हनुमानाची पूजा करुन दर्शन घेतले. यावेळी आ. निलंगेकर यांची शेकडो महिलांनी राखी बांधून औक्षण केले. आ.निलंगेकर यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. माकणी ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच, उपसरपंच, चेअरमन, ग्राम पंचायत सदस्य यांनी आ. निलंगेकर यांचा भव्य सत्कार केला. माजी खा.रूपा पाटील-निलंगेकर यानी जनसन्मान पदयात्रेनिमित्त निलंगा मतदार संघाची पायी परीक्रमा करण्यासाठी निघालेल्या आ.निलंगेकर याना आशीर्वाद दिला. तसेच गावात विविध विकास कामांचा शुभारंभ झाला. माकणी, कोयाचीवाडी चन्नाचीवाडी, सावरी, माने जवळगा शेळगी येथील शेकडो महिलांना लाडकी बहिण योजनेच्या पात्र महिलांना प्रत्यक्ष आ.निलंगेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. निलंगा तालुक्यातील शेळगी येथे या जन सन्मान पदयात्रेचा मुक्काम असून येथील गावक-यांशी आ.निलंगेकर संवाद साधणार आहेत. गाव, वाडी , वस्ती येथील नागरिकांचा विकासाची वारी.. जनतेच्या दारी या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### पदयात्रेवर जेसीबीने पुष्पवृष्टी

निलंगा तालुक्यातील माकणी थोर येथे विविध विकास कामाचा आ.निलंगेकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर पद यात्रेला सुरुवात झाली. कोयाचीवाडी आणि चन्नाचीवाडी येथील नागरिकांनी गावात आगमन होताच पदयात्रेवर जेसीबीने पुष्पवृष्टी केली. निलंगा मतदार संघात निघालेल्या आ.निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेस मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जाहीर सहभागी होऊन पाठींबा दिला.

लातूर
# दिनांक
लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## उत्कृष्ट ग्रंथालय, कार्यकर्ता, सेवक पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावेत

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयाकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार देण्यात येतो. तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामागृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठी २५ सप्टेंबरपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार रुपये, रुपये ५० हजार रुपये, रुपये २५ हजार रुपये सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र , ग्रंथभेट आणि रोख रक्कम देवून गौरविण्यात येते.

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी २५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथभेट आणि रोख रक्कम देवून गौरविण्यात येते. सन २०२३-२०२४ या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छूक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २५ सप्टेंबरपर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत.



### संक्षिप्त वृत्त



## जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत समर्थ विद्यालयाचा संघ प्रथम

**उदगीर, दि. २४ ऑगस्ट-**


जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ विद्यालयाचा संघ १७ वर्ष वयोगटात प्रथम आला असून विभागीय स्पर्धेत हा संघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. लातूर येथील क्रिडा संकुलावर जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. यात समर्थ विद्यालयाचे मृणाल नितीन पोद्दार, दिव्यांका अमोल भोसले, श्रुती गोविंद रंदवे, रूपाली कालिदास वाडकर व ज्ञानेश्वरी बालाजी गोदाची यांच्या संघाने १७ वर्ष वयोगटात जिल्हास्तरावर प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. यशाबद्दल संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण, क्रिडा समन्वयक किरण हाळीघोंगडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



## अशोक पाटील-निलंगेकर यांचा जनसंवाद अभियान दौरा

**देवणी, दि. २३ ऑगस्ट-**

तालुक्यातील देवणी(खुर्द), बटनपूर, लासोना गौडगाव(विजयनगर) येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते अशोकराव पाटील-निलंगेकर यांच्या नेतृत्वात नियोजित आभार व जनसंवाद अभियान दौरा झाला. यावेळी दत्त मंदिर (सद्गुरू शेषनाथमहाराज) देवस्थान, लासोना येथे अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते महाआरती व मनोभावे दर्शन घेण्यात आले. तसेच देवणी(खुर्द)येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अशोक पाटील निलंगेकर पुष्पगुच्छ अर्पण करत अभिवादन केले. गेल्या लोकसभा निवडणुकीत अहोरात्र कष्ट घेतल्याबद्दल देवणी (खुर्द.),बटनपूर, लासोना,गौडगाव(विजयनगर) गावातील बूथप्रमुख आणि गावातील काँग्रेस पक्षाचे नेते, कार्यकर्ते यांचे अभिनंदन अशोकराव पाटील-निलंगेकर यांच्याकडून करण्यात आले. यावेळी जि.प.उपाध्यक्ष भगवान पाटील विजयनगरकर, देवणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अजित बेळकूने, युवक प्रदेश सचिव गजानन भोपणीकर, देवणी सेवादलाचे अध्यक्ष सुभाष पाटील, माजी सरपंच देविदास पतंगे, शहराध्यक्ष जावेद तांबोळी, पत्रकार प्रताप कोयले,एस.टी.कामगार डी. एल. कांबळे, सरपंच सुरेश पाटील, परमेश्वर बोरूळे, अशोकराव पाटील बटनपूरकर, चेअरमन विरशेट्टी बिराजदार, लासोना गावचे सरपंच धनराज मठपती, चेअरमन हरिभाऊ माने, बालाजी बिराजदार, मुराळे, चेअरमन निलेश बिराजदार, चेअरमन हरिभाऊ माने, दत्ता पाटील लासोनकर, प्राचार्य उमेश पाटील उपस्थित होते.



## ग्रामविकास समितीच्या उपाध्यक्षपदी प्रकाश बनसोडे यांची निवड

**शिरुर अनंतपाळ, दि. २४ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथे शासकिय नियमावली प्रमाणे सहा समित्या ग्रामपंचायत कार्यालयास विकास कामे करताना मदत व्हावी यासाठी या समित्या स्थापन केल्या जातात व या समित्या मार्फत गावकरी मंडळीच्या अडचणी मांडून त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करत असतात त्यामूळे ग्रामपंचायत कार्यालयास येणारा अधिक कार्याचा भार कमी होण्यास या समित्या सहकार्य करत असतात तर त्या सहा समित्या पैकी एक ग्रामविकास समिती स्थापित करण्यात आली. व त्या ग्रामविकास समितीच्या अध्यक्ष पदी येरोळ गावचे उपसरपंच सतिष शिंदाळकर यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष पदी प्रकाश बनसोडे व सचिवपदी ग्राम विकास अधिकारी संदिप शिरुरे यांची निवड करण्यात आली तसेच सदस्यपदी नवनाथ जाधव, अंकुश लोंढे, भागवत मुंजाळे, सतिष झांबरे, नारायण कळसे, विजयकुमार बनसोडे, मिरा भोई, रंजना ज्ञानोबा बालवाड, कांता बनसोडे, कुसुम लोंढे, रंजना राम बालवाड, धनराज बसपुरे, निर्मला लोंढे, नितेश झांबरे आदी निवड करण्यात आली यावेळी येरोळ गावचे उपसरपंच सतिष शिंदाळकर, ग्रामविकास अधिकारी संदिप शिरूरे, ग्रामपंचायत कर्मचारी विनोद लोंढे, बालाजी झटे, तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते.

## विधानसभेच्या दृष्टीने आमची तयारी सुरु

### माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

२०२४ च्या विधानसभा निवडणुकांची तयारी आम्ही सुरू केली असून, जवळपास ९८ हजार १०० बूथ रचना,संयोजन,मतदार यादी वाचन व दुरुस्ती याची जबाबदारी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आम च्यावर टाकण्यात आली असल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत गरड यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

प्रवीण साले हे बूथ समन्वय समितीचे प्रमुख असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणुक २०२४ च्या कामाचे भारतीय जनता पार्टीच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. केंद्रात मोदी सरकारच्या वतीने चार सेक्टरवर काम करण्यात आले असून त्यात महिला, शेतकरी,युवा,गरीब यांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या धर्तीवरच महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार काम करत असून महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेला सशक्त बनवण्याचे काम महायुती सरकार करत असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.

नुकतीच महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबवण्यास सुरुवात केली आहे, या अगोदर उत्तर प्रदेश सरकारने ही योजना यशस्वी केल्यानंतर, आता महाराष्ट्रातही ही योजना पुढची पाच वर्षे चालणार आहे. विरोधी पक्षाकडून या योजनेसंदर्भात संभ्रम निर्माण केला जात असून, फेक नरेटीव सेट करण्याचा प्रयत्नही ते करत असल्याची टीका डॉक्टर भागवत कराड यांनी केली. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधकांनी संविधान बदलणार असा फेक नरेटिव्ह सेट केल्यामुळे भाजपला लोकसभा निवडणुकीत फटका बसला असल्याचेही ते म्हणाले. देशाचे प्रधानमंत्री कुठल्याही कामाची सुरुवात करताना राज्यघटनेला वंदन करूनच करतात असेही ते म्हणाले. युती सरकारकडून तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याची योजना सुरू आहे, राज्यातील युवकांना प्रशिक्षण देत असताना मानधन देण्याची योजना, देशातील बेरोजगार युवांना मुद्रा लोन योजनेच्या माध्यमातून पूर्वी दहा लाख रुपये अर्थसाह्य दिले जायचे, परंतु त्यामध्ये वाढ करून आता वीस लाख रुपये देण्यात येणार आहेत.

दरम्यान येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती सरकारने केलेल्या कामाच्या जीवावरच राज्यात जवळपास १८० ते २०० च्या आसपास जागा निवडून येतील असेही ते म्हणाले.यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, दिलीपराव देशमुख भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष, प्रवीण कस्तुरे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## काळ्या फिती बांधून बदलापूर घटनेचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. २४ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ महाविकास आघाडीच्या वतीने बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाऱ्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव तथा तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक महादेव आवाळे यांच्या नेतृत्वात बस्वेश्वर चौक, शिरूर अनंतपाळ येथे निषेध व्यक्त करण्यात आला.

या वेळी महाराष्ट्र राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवर सतत अत्याचारात वाढ होत असून राज्यातील महायुतीचे सरकार या अत्याचारांना पाठिशी घालत असून त्यामुळे अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या नराधम ांना कायद्याची भिती वाटत नाही त्यामुळे आज संबंध राज्यात म हिलांच्या सुरक्षेतेचा प्रश्न निर्माण झाला असून अशा होणाऱ्या घटनेला राज्य सरकार जबाबदार असून या घटनेची तात्काळ दखल घेऊन महामहीम राज्यपाल महोदय यांनी महाराष्ट्र राज्याचे निष्क्रिय गृहमंत्री यांचा राजीनामा घ्यावा, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी व्यक्त केली.

या वेळी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा मिना बंडिले, उपाध्यक्षा ललिता शिवणे, शहराध्यक्षा करूणा पारशेट्टे, शिवसेनेच्या जिल्हा उपाध्यक्ष सरोजा गायकवाड, तालुका प्रमुख सुलभा हत्ते, सचिव महानंदा वाघमारे, माजी चेअरमन शिवराज धुमाळे, शहराध्यक्ष व्यकंट हांद्राळे, शहरप्रमुख सतीश शिवणे, नगरसेवक सुधिर लखनगावे,शहर कार्याध्यक्ष संदिप धुमाळे,गुरूनाथ अचवले, विश्वनाथ हांद्राळे, युवक शहराध्यक्ष शैलेश वलांडे, जेष्ठ नागरिक बापूराव पाटील शेंद, तानाजी वलांडे, संभाजी पारशेट्टे, काशिनाथ उर्फ पप्पु धुमाळे, चंद्रकांत हत्ते आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.

## लातूर जिल्हा होमगार्ड भरतीसाठी शारीरिक क्षमता चाचणीचे वेळापत्रक जाहीर

**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

जिल्हा होमगार्डमधील रिक्त असलेल्या १४३ जागा भरण्याकरिता होमगार्ड नाव नोंदणीचे (भरतीचे) आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी पुरुष व महिला उमेदवारांसाठी शारिरीक क्षमता चाचणीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

लातूर पथकामधील २ हजार १६० उमेदवारांची २६ ऑगस्ट २०२४ रोजी, उदगीर व निलंगा पथकातील २ हजार ७४ उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी २७ ऑगस्ट २०२४ रोजी आणि लातूर, औसा, उदगीर, अहमदपूर व निलंगा या सर्व पथकांमधील ७०४ महिला उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी २८ ऑगस्ट २०२४ रोजी होणार आहे.

लातूर जिल्ह्यातील ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांनी शारिरीक क्षमता चाचणीकरिता बाभळगांव पोलीस मुख्यालय येथे वेळेत हजर रहावे, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा होमगार्ड समादेशक अजय देवरे यांनी केले आहे.

## आरक्षणासह सर्व रेल्वे तिकिटांसाठी ऑनलाईन पेमेंटची सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

रेल्वे तिकीटाचे आरक्षण करताना अथवा इतर तिकिटे काढताना अनेक रेल्वे प्रवाशांना रोख रकमेचा व्यवहार करताना अडचणी येत असल्याचे लक्षात घेऊन लातूर रेल्वे बुकिंग केंद्रावर ऑनलाईन पेमेंट करण्याची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे अशी माहिती मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी दिली.

लातूर रेल्वे स्टेशन मार्गे धावणाऱ्या रेल्वे गाड्यात सातत्याने वाढ होत आहे आणि दिवसेंदिवस रेल्वेचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. प्रवास सुलभ व्हावा यासाठी बहुतांशी रेल्वे प्रवासी तिकिटाचे आरक्षण करतात. तात्काळ व इतर तिकिटे काढण्यासाठी आलेल्या अनेक प्रवाशांना रोख रकमेचा व्यवहार करणे अवघड होत आहे असे सांगून चंद्रकांत कातळे म्हणाले की, प्रवाशांची अडचण लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाच्या वतीने लातूर रेल्वे स्थानक, लातूर येथील जुने रेल्वे स्थानक येथील आरक्षण केंद्र यासह औसारोड, ढोकी, येडशी, उस्मानाबाद, पांगरी, बार्शी, शेंद्री या सर्व रेल्वे स्थानकावर ऑनलाईन पेमेंट करिता क्यूआर कोडची व्यवस्था करण्यात आली आहे.

सध्या सर्वत्र ऑनलाईन पेमेंटची सुविधा झाल्याने सर्वसामान्य जनतेतून ऑनलाईन व्यवहाराला मोठी पसंती दिली जात आहे. रेल्वे स्थानकावर ऑनलाइन पेमेंटची व्यवस्था नसल्याने अनेक वेळा प्रवाशांना अडचणींना तोंड द्यावे लागत होते. प्रवाशांची ही अडचण लक्षात घेऊन रेल्वे प्रवाशांना तिकीट खरेदीसाठी आता फोन पे, गुगल पे, पेटीएम, विविध बँक द्वारा पेमेंट करून तिकीट खरेदी करता येणार आहे. नव्याने सुरू केलेल्या या ऑनलाइन सुविधेमुळे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रवाशांसाठी ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल मध्य रेल्वे प्रशासनाचे क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## लातूर मनपात दोन सहाय्यक आयुक्त रुजू

### क्षेत्रीय अधिकारी म्हणून पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २४ ऑगस्ट-**

लातूर महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्तांच्या रिक्त जागांवर दोन अधिकारी शुक्रवारी (दि.२३ ) रुजू झाले आहेत.दोघांनीही पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना लागलीच क्षेत्रीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली.

लातूर महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्तांची सात पदे मंजूर आहेत परंतु त्यापैकी सहा पदे रिक्त होती.या रिक्त पदांवर शासनाकडून दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती शुक्रवारी करण्यात आली. अजित गणपत ढोपे व निर्मला नेताजी माने हे दोघे शुक्रवारी रुजू झाले. मुख्याधिकारी संवर्गातील गट ब मधून या दोघांची नियुक्ती झालेली आहे. विशेष म्हणजे दोघांचीही ही प्रथम नियुक्ती आहे. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना तातडीने नियुक्ती दिली.निर्मला माने यांना क्षेत्रीय अधिकारी 'अ' झोन व अजित ढोपे यांना 'ड' झोनचे क्षेत्रीय अधिकारी म्हणून पदभार देण्यात आला.सहाय्यक आयुक्तांच्या रिक्त जागांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यामुळे आता म नपाचे कामकाज अधिक गतिमान होणार आहे. पदभार स्वीकारल्यानंतर दोन्ही अधिकाऱ्यांचे मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## नवमतदारांनी लोकशाही बळकट करावी

### घनश्याम अडसूळ; 'विश्वेश्वरय्या'मध्ये नवमतदार नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२४ ऑगस्ट-**

प्रत्येकांना मतदानाचा अधिकार मिळून लोकशाही बळकट व्हावी . यासाठी निवडणुक आयोगाने मतदार नोंदणी अभियानाची सुरुवात केली आहे. यामध्ये नवमतदारांनी नोंदणी करुन सहभाग नोंदवून आगामी निवडणुकीत मतदान करुन लोकशाही बळकट करावी, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार घनशाम अडसूळ यांनी केले आहे.




तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शैक्षणिक संकुलातील विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयात भारतीय निवडणुक आयोग, मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, लातूर, तहसील कार्यालय, औसा व श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयात नव मतदार नोंदणी अभियान २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी तहसिलदार घनशाम अडसुळ उद्घाटन प्रसंगी बोलत होते .नायब तहसिलदार इंद्रजित गरड, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, केंद्रीय मतदान अधिकारी एस. के. स्वामी, प्रदीप चव्हाण, सुभाष ठाकुर, कोरे मॅडम, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे उपस्थित होते .

प्रा. योगेश पाटील म्हणाले , विद्यार्थ्यांनी नोंदणी पव्दारे ऑनलाईन पध्दतीने मतदार नोंदणी कशी करावी याबद्दल सखोल अशी माहिती दिली.तसेच विद्यार्थ्यांनी पवर मतदार नोंदणी करून घेऊन मतदानाचा हक्क चुकवू नये असे आवाहन केले.

यावेळी या अभियानात अनेक विद्यार्थ्यांनी नवमतदार नोंदणी केली . तर या नवमतदार नोंदणी अभियानामध्ये विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील जवळपास २४२ विद्यार्थ्यांनी नवमतदार नोंदणीत सहभाग नोंदविला. यावेळी साचिव बसवराज धाराशिवे यांनी प्रास्ताविक केले .प्रा.परमेश्वर खंडागळे यांनी सुत्रसंचालन केले तर प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी आभार मानले.

## शिरूरअनंतपाळ ग्रामीण रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा वादाच्या भोवऱ्यात

### महाविकास आघाडीच्या वतीने निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. २४ ऑगस्ट-**

शिरूरअनंतपाळ तालुक्यातील जनतेला आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने माजी मुख्यमंत्री स्व. डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या शिफारशीनुसार व तत्कालीन लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. संभाजीराव पाटील शिरूर अनंतपाळकर यांच्या प्रयत्नातून २०१४ साली ग्रामीण रुग्णालयाची निर्माण झाले आणि गेली दहा वर्षे हे रुग्णालय चालू झाले नाही म्हणून अनेक वेळा महाविकास आघाडीच्या वतीने महादेव आवाळे, आबासाहेब पाटील, भागवत वंगे आदी मंडळी यांनी अनेक वेळा आंदोलन केले निवेदन दिले. दि. २१ ऑगस्ट रोजी निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा संपन्न केला असता या शासकीय कार्यक्रमासाठी शिरूर अनंतपाळ तालुक्याचे भुमि पुत्र व लातूर जिल्ह्याचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर नसल्याने महाविकास आघाडीच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला व जाब विचारला असता अधिकारी यांनी हा कार्यक्रम अचानक पणे झाल्यामुळे आम्हाला पत्रीका तयार करायला वेळ मिळाला नाही असे उत्तर दिले असता महाविकास आघाडीच्या



अनेक राजकीय कार्यकर्त्याकडून हे उत्तर समाधानकारक नाही म्हणून तिव्र निषेध करण्यात आला या वेळी लवकर लातूर जिल्ह्याचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत जाहीर कार्यक्रम घेण्याचे व लावलेला शिलालेख बदल करून डॉ शिवाजी काळगे यांचे नाव समाविष्ट करण्याचे ठरले यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने आमदार यांच्या एकतर्फी व शासकीय नियम धाब्यावर बसवून कार्यक्रम घेण्याच्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव अभयदादा साळुंके, काँग्रेस पक्षाचे नेते डॉ अरविंद भातांब्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, माजी सभापती अजित माने, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भागवत वंगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यकंट हांद्राळे, तानाजी वलांडे, सतीश शिवणे, महेताब शेख उपस्थित होते.